।। श्रीगुरुदेव दत्त ।।
श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे ।
हे नाथ नारायण वासुदेव ।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ ।
मुकुन्द विष्णो भगवन्नमस्ते ।।
योन्तः प्रविश्य मम वाचमिमां प्रसुप्तां
संजीवयत्यखिलः शक्तीधरः स्वधाम्ना ।
अन्यांश्चहस्तचरण श्रवण त्वगादिन्
प्राणान्नमो भगवते पुरुषाय तुभ्यम् ।।
मुकं करोति वाचालं
पंगूम् लंघयते गिरीम् ।
यत्कृपा तमहं वन्दे
परमानन्द माधव ।।
आपदामप हर्तारम् दातारम् सर्व संपदां
लोकाभिरामम् श्रीरामम् भूयो भूयो नमाम्यहम् ।।
यत्र यत्र रघुनाथ कीर्तनम् ।
तत्र तत्र कृतमस्तकांजलिम् ।
बाष्पवारि परिपूर्ण लोचनम् ।
मारुतिं नमत राक्षासान्तकम् ।।
पुस्तक जप वट हस्ते वरदाभयचिन्ह चारु बाहुलते ।
कपूरामल देहे वागीश्वरि चोद्याशु मम वाचे ।।

श्री गणेशाय नमः ।
श्रीगुरुचरणारविन्दाभ्याम् नमः ।

भगवान श्रीकृष्णांच चरित्र महर्षि वेदव्यासांनी रचलेले आहे. भागवतामध्ये स्वतंत्र दहावा स्कंध ह्या करता आहे. नव्वद अध्यायांच चरित्र आहे. हेही चरित्र पूर्ण झालेलं आहे असं नाहीये. जरी वेदव्यासांनी रचना केली असली तरीसुध्दा, ईश्वराचं चरित्र किती तरी अनंत आहे. मार्गदर्शन करण्यासारख्या काही काही स्थूल गोष्टी जेवढ्या असतील तेवढ्याच चरित्रात लिहिल्या आहेत.

श्रीकृष्णांचा गृहस्थाश्रम फार मोठा होता, हेही त्यात दाखवलेलं आहे. कर्मयोग, ज्ञानयोग हे सगळेही त्यांच्या चरित्रामध्ये आहेत. अर्जुनासारख्या योद्ध्यावर पांडवांची सर्व भिस्त होती. भीष्म, द्रोण जरी प्रतिपक्षाच्याकडे राहिले तरी अर्जुन आपल्या बाजूला आहे. हा विश्वास सर्वही पांडव मंडळींना होता. आणि आता ऐन युद्धाच्या वेळी तो हात पाय गाळून स्वस्थ बसला आहे. "मला युद्ध करायचं नाही. माझेच लोक मी मारायचे? त्यापेक्षा भिक्षा मागून कुठेही रानावनात जाऊन मी राहीन." असं तो बोलायला लागला. आणि अशा वेळेला त्याला उपदेश केला भगवंतांनी. अर्जुनाची मोठी योग्यता होती. मोठा ईश्वरभक्त, गुरुभक्त होता. द्रोणाचार्यांनी आपली सगळी विद्या अर्जुनाला दिली; किंवा त्याने घेतली. अश्वत्थामा जरी द्रोणाचार्यांचा प्रत्यक्ष मुलगा होता तरी त्यालासुद्धा ती विद्या घेता आली नाही. त्यांनी मुलाला दिली नाही असा त्याचा अर्थ नाही.

सांसारिक ज्या काही अडचणी आहेत त्या सर्वांनाच येतात. अर्जुनावर प्रसंग आला तसा सर्वांवरच येतो. म्हणून अर्जुनाला निमित्त करून भगवंतांनी गीता सर्वांच्या करताच सांगितली. कितीही मोठा माणूस असला तरी अनेक वेळा तो गोंधळून जातो. अशा स्थितीमध्ये आपलं कर्तव्य काय आहे? याची पूर्ण जाणीव ठेवून ते कर्तव्यकर्म कसं करावं एवढं त्यांनी सांगितलेलं आहे.

तर हा ज्ञानयोग आहे. भगवंतांच्या जवळ पूर्ण ज्ञान आहे आणि पूर्ण क्रियाशक्तीही आहे. इच्छाशक्तीही बलवत्तर आहे. दुर्योधनाने पुष्कळ प्रयत्न केला. चौदा वर्ष राज्य त्याच्या ताब्यात होतं. पांडव तर वनामध्ये गेले होते. प्रयत्न करण्यासारखं त्यांच्या जवळ काहीच नव्हतं. सत्ता नाही, पैसा नाही, काही नाही. उलट दुर्योधनाजवळ सगळं होतं. परंतु गोपालकृष्णांवर पांडवांची निष्ठा होती. गोपालकृष्णांची शक्ती साक्षात ईश्वराची शक्ती आहे; ही जाणीव त्यांना होती. गोपालकृष्ण म्हणजे आपला मामेभाऊ आहे; एवढीच जाणीव नव्हती. अशी आतेभाऊ, मामेभाऊ नाती पुष्कळ असतात. पण नात्यापेक्षाही गोपालकृष्ण ईश्वररूप आहे, परमेश्वर आहे ही जाणीव त्यांच्या मनामध्ये होती, विश्वास होता, आणि त्याचं फल त्यांना मिळालेलं आहे. गीतेच्या अकराव्या अध्यायात वर्णन केल्याप्रमाणे विश्वरूप दाखीवलं भगवान श्रीकृष्णांनी आणि अर्जुनाला शेवटचं बजावलेलं आहे, "तू जरी निघून गेलास तरी कौरवांपैकी कोणीही जिवंत राहणार नाही. तसा माझा संकल्प झालाय. या सर्वांचा संहार होणार आहे." ही आपली इच्छाशक्ती त्यांनी बोलून दाखवली. कर्तव्य करायचं असेल तुला, विजयी व्हायचं असेल, धर्माचरण करून जर काही ईश्वराची कृपा संपादन करायची असेल, तर कर म्हणाले. अर्जुन गेला म्हणून हे जिवंत राहतील; असं बिलकुल नाही म्हणून सांगितलं. भगवान गोपालकृष्णांची इच्छाशक्ती फार मोठी आहे. लहानपणापासून ती काय शक्ती आहे; याची कृष्ण चरित्रामध्ये पदोपदी जाणीव करून दिलेली आहे. ती शक्ती ओळखायला पुष्कळ वेळ लागतो.

लहानपणापासून अनेक घटना त्यांच्या चरित्रात घडल्या आहेत. लहानपणी अमुक राक्षसीचा नाश केला, तमक्या राक्षसाचा नाश केला हे इतरांना काय खरं वाटणार आहे? लहान मुलगा असं करू शकतो काय कुठं? लहान मुलाच्या रुपामध्ये ते आहेत. बाह्यरूप कसही असलं तरीसुध्दा ईश्वरी शक्ती मोठी आहे. इच्छाशक्ती ज्याला आपण म्हणतो. आपली इच्छाशक्ती अगदी दुर्बल आहे. पुष्कळ इच्छा वाटेल तशा करतो आपण, मनोरथ रचतो. ते काही पूर्ण होत नाहीत, काही नाही. भगवंतांच्या इच्छाशक्तीने अनेक राक्षसांचा, दुर्जन, अतिरेकी लोकांचा संहार त्यांनी कसा केला? याचीही उदाहरणे वेदव्यासांनी दिलेली आहेत.

मोठी मोठी राक्षस मंडळी होती. राक्षस मंडळीसुद्धा काही फक्त युद्ध करण्या पुरतीच नव्हती. मंत्र, तंत्र, तपश्चर्या हे प्रयोग करून त्यांनी आपलं सामर्थ्य वाढीवण्याचा प्रयत्न केलेला आहे. आणि देव–दैत्य यांचा संघर्ष पहिल्यापासून आहे. उपनिषदांमध्ये देव–दैत्याची कल्पना निराळी दिलेली आहे. प्रत्येक मनुष्यामध्ये चांगल्या वासना आणखी वाईट वासना दोन्ही असतात. 'हेच ते देव–दैत्य' म्हणाले. एखाद्या वेळी चांगल्या वासनेचा विजय होतो. म्हणजे देवांचा विजय होतो. वाईट वासनांच्या आहारी जाऊन पापकर्म मनुष्याकडून घडतं तेव्हा दैत्यांचा विजय झाला असं म्हणतात.

बाहेर व्यवहारामध्ये ईश्वर आणि जीव असे दोन विभाग आहेत. जिवाची शक्ती परिमित आहे पण ती अपरिमित होणे शक्य आहे असंही शास्त्रकार सांगतात. मर्यादित शक्ती जिवाची आहे. कोणीही असो मग. राष्ट्रपती जरी असला तरी त्याची शक्ती मर्यादित आहे. इच्छाशक्ती, ज्ञानशक्ती, कर्मशक्ती सगळंही मर्यादित आहे. परंतु जिवाने शास्त्रीय प्रयत्न, प्रयोग केला, शास्त्राप्रमाणे वागला तर त्याची शक्तीसुद्धा अपरिमित होऊ शकते, तो ईश्वर होऊ शकतो. "नर करनी करे, सो नर का नारायण हो जाए" म्हणतात हे काही नुसतं सुभाषित नाहीये. सत्य आहे. असे मोठे मोठे महात्मे पूर्वीही होऊन गेले भारतामध्ये. पुष्कळ आहेत, आजही असतील. त्यांचीही चरित्रं पुष्कळ आहेत. तर सर्व सामान्य जिवांची शक्ती ही मर्यादित का राहाती? ती आणखी अमर्याद कशी करता येईल? वाढीवता कशी येईल? हाही विचार आणखी सर्व शास्त्रकारांनी, प्राचीन महर्षिंनी मुद्दाम केलेला आहे. त्यांच्याजवळ ती शक्ती होती. अनुभवाने त्यांनी ते प्रयोग त्यात दिलेले आहेत. तर शक्ती मिळवणारे जे आहेत, ते ती शक्ती कशी मिळीवता येते हे सांगू शकतात. तर याप्रमाणे जिवात्मा जरी आणखी परिमित शक्तीचा असला तरी आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये निराशा नाहीये.

कर्मयोग म्हणून जो भगवंतांनी सांगितलेला आहे, त्याचं रामावतारामध्ये त्यांनी आचरण करून दाखवलेलं आहे. रावणाने सीतेला नेलं. कोणी नेलं याचा पत्ता लागायलाच वेळ लागला. जटायू भेटल्यानंतर रावणाने नेलं एवढं समजलं. कुठं राहतो तो? काय त्याची शक्ती आहे? हे सगळं

समजल्याशिवाय प्रतिकार तरी कसा करायचा? परंतु त्या दोघा बंधुंनी न्याय मार्गाने जाऊन प्रयत्न करून आपण यशस्वी होऊ शकतो; हा विश्वास जगाला दाखवलेला आहे. तर कर्तव्यकर्म जे आहे, ते व्यवस्थितपणे, उत्साहाने जर केले, तर त्याच्यामध्ये यश मिळू शकते. आरंभाला जरी आपलं काही सामर्थ्य नाही असं वाटलं तरीसुध्दा तो जिवात्मा सामर्थ्यसंपन्न होऊ शकतो, यशस्वी होऊ शकतो. आत्मज्ञान, ब्रह्मज्ञान ज्या ज्या काही आणखी मोठ्या मोठ्या उच्च भूमिका आहेत; त्या भूमिकेवरही तो जाऊ शकतो.

तर वैदिक संस्कृती बुद्धिवादी आहे. आता आम्हाला त्याच्याबद्दल विश्वास वाटत नाही म्हणून आम्ही आपलं ते सोडून देतो. ही गोष्ट वेगळी आहे. परंतु त्यांनी तो बुद्धिवाद वापरलेला आहे. शास्त्रीय प्रयोगाने संस्कृत झालेली बुद्धी, ही उत्तम कार्य करू शकते. म्हणून रामावतारात किंवा कृष्णावतारामध्ये हेच त्यांनी दाखीवलेलं आहे. अशक्य काही नाही. उत्साह, शक्ती पाहिजे, निश्चय पाहिजे ज्ञानाचा ध्येयसिध्दी निश्चित होणार; करणार आपण; ही निश्चित बुद्धी पाहिजे. आमची तशी होत नाही.

आरंभाला अर्जुनाने केवळ निश्चयाने शंकरांना प्रसन्न करून घेतलं, इंद्रादिक देवांना प्रसन्न करून घेतलं; स्वर्गलोकामध्ये पाच वर्षे राहून सर्व देवांची अस्त्रविद्या शिकून आला तो. उत्साह होता, ध्येय त्याचं ठरलेलं होतं आणि ऐन युद्धाच्या वेळेला ती बुद्धी बदलली. आमची बुद्धी अनिश्चित आहे. ती निश्चित करण्यातच किती काल जातो. आपल्या बुद्धीची अनिश्चित स्थिती कळून येत नाही. निश्चित बुद्धीचे लोक भेटतात आपल्याला. पण त्यांच्यापासून मार्गदर्शन घेण्याची इच्छा होत नाही आपल्याला. आपल्या स्वतःच्या अहंकार–बुद्धीने आपला मार्ग आपण शोधू शकतो, आमच्या बुद्धीने आमचं आम्ही सगळं चालवून घेऊ शकतो, असं आपण समजतो. दुसऱ्याच्या मार्गदर्शनाची अपेक्षासुद्धा आपल्याला वाटत नाहीये.

तर कृष्णचरित्र ही पाच हजार वर्षांपूर्वीची कथा आहे. भगवान गोपालकृष्णांचा अवतार झालेला आहे. वैकुंठ लोक भगवंतांचा आहे. त्या वैकुंठ लोकामध्ये त्यांचा निवास आहे. संपूर्ण विश्वाचं संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांनी पत्करलेली आहे. त्या संरक्षणाकरता म्हणून प्रत्येक वेळी निरनिराळे अवतार धारण करून त्यांना यावं लागतं. अवतरण करावं लागतं. वैकुंठ लोकातून भूलोकावरती त्यांना यावं लागतं. ब्रह्मादिक देव आहेत सगळा विचार करणारे. त्याचप्रमाणे भूदेवी आहे. भूमीवरून फक्त भौतिकदृष्टीनेच आपण सगळीकडे पाहायला शिकलो आहोत. भारताचे संस्कार असे नाहीयेत.

पंचमहाभूते म्हणजे प्रत्येक भुताच्या ठिकाणी एकेक मोठा जिवात्मा आहे. तो ईश्वर नाहीये, परंतु इतर जिवापेक्षा त्याची शक्ती मोठी आहे. पृथ्वी, जल, तेज, वायू आणि आकाश हे जिवात्मे असल्याचे शास्त्रकारांनी सांगितले आहे. इंद्रियांच्या देवता स्वतंत्र आहेत. ईश्वराच्या सृष्टीमध्ये हे सगळे विभाग आणखी काय काय आहेत? हे सगळंही वेदव्यासांच्या ग्रंथांवरून आपल्याला कळून येतं. पौराणिक भूगोल कसा आहे? आणि आधुनिक भूगोल कसा आहे? याचा पुष्कळ विचार करण्यासारखा आहे. आपल्याला जेवढी खंड माहिती आहेत, त्याच्यापेक्षा जास्त खंड नाहीत; असं वाटतं. आपल्याला जेवढा भूगोल माहीत आहे तेवढाच भूगोल आहे. त्याच्यापेक्षा अधिक काही नाही. अशी समजूत करून घेऊन आम्ही आपले स्वस्थ झालो. काही नाही, कशावरून? आज माहीत असलेली खंड काही वर्षांपूर्वी सापडली, त्याच्या पूर्वी त्यांना त्या बद्दल काही माहीत नव्हते.

सापडल्यानंतर सांगू लागले भूमीवर इतकी खंड आहेत. पण याच्याहीपेक्षा आणखी किती तरी अज्ञात भूखंड/भूभाग असू शकेल. आकाशात असंख्य तारका आहेत; असं वैज्ञानिकही म्हणतात त्या पैकी किती तरी तारकांचे अद्यापि संशोधन व्हायचंय.

तर वैकुंठ लोकातून भगवान विष्णू मुद्दाम या लोकामध्ये येत असतात. त्या पैकी हा एक कृष्णावतार आहे. कृष्णरूप त्यांनी धारण केलं आहे. शक्ती तीच आहे. परंतु या लोकामध्ये यायचं म्हणजे तशा प्रकारच्या अधिकारी महात्म्यांच्या वंशामध्ये जन्म घ्यायचा. त्या ठिकाणी कार्य करायचं. हा वंशाचाही विचार आहे. त्याचप्रमाणे माता पितरांच्या पुण्याईचाही विचार आहे. पाप किंवा पुण्य हे जे कर्माचे

विभाग केलेले आहेत ते काही काल्पनिक नाहीयेत. तर्काने, युक्तिवादानेसुद्धा त्याची सिद्धी होऊ शकते. शास्त्रप्रमाण तर आहेच आहे.

तर भूमीला ज्या वेळेला भार झाला, याचा अर्थ अत्यंत दुर्जन उत्पन्न झाले, त्यांचीच संख्या जास्त वाढायला लागली, त्यावेळी -समर्थांनासुद्धा अशा दुर्जनांच्या वाढीचे वाईट वाटले. असं हे दुर्जनांच राज्य उपयोगी नाही, चांगलं राज्य झालं पाहिजे. असं त्यांनाही वाटलं. 'अहिंसा परमो धर्मः' असं नुसतं करत बसले नाहीत ते स्वस्थ! तशा प्रकारची राजशक्ती पाहिजे, तरच काही दुर्जनांना शासन होऊ शकतं. त्यांच्या मनात काही तरी भीती निर्माण होऊ शकते. संपूर्ण विश्वामध्ये फार दूरवर भारतीय संस्कृती पसरली होती त्या वेळेला. आजही परदेशात पुष्कळ ठिकाणी देवळे सापडतात. किती काळ गेलेला आहे. त्यामुळे त्या वेळची स्थिती किती बदललेली आहे. त्यामुळे आपली संस्कृती किती विशाल होती; याची कल्पनाही बरोबर येऊ शकत नाही.

तर त्या भूमीला भार झाला याचा अर्थ या दुर्जन लोकांचीच संख्या अधिकाधिक वाढू लागली. आणि त्याला शासन करण्याची शक्ती जिवांच्यामध्ये दिसून येत नाही. म्हणून ऋषीमुनींनी विचार केला. सर्व जगाचं संरक्षण करणारी जी विष्णूशक्ती आहे, तिलाच त्यांनी आवाहन केलं. भगवान विष्णूंनी त्यांना आश्वासन दिलं आणि त्याकरता स्वतः या भूलोकावर आले. मथुरा राजधानीमध्ये त्यांचा जन्म झालेला आहे. त्या वेळी कंसाची राजसत्ता होती. कंसाचा बाप जिवंत आहे, सगळं आहे. पण त्या बापाला सुद्धा तुरुंगामध्ये ठेवून कंसाने आपल्या हातात सगळी सत्ता त्या वेळेला घेतली होती. त्यामुळे त्याला अनुमोदन देणारे, त्याचे समर्थन करणारे अनुयायी तेवढे मथुरेमध्ये राहू शकले. बाकीच्या सगळ्यांना निर्वासित होऊन दुसऱ्या प्रांतात जावं लागलं. कंसाची सत्ता मान्य करा नाही तर चला. घरदार सोडून त्यांना जावं लागलं आहे.

औरंगजेबाने आपल्या बापाला तुरुंगात टाकलं एवढं आपण ऐकतो, वाचतो. पण या कंसानेसुद्धा टाकलेलं आहे. कृष्णावतार होण्यापूर्वी म्हणजे त्याच वेळेला जवळ जवळ अशी स्थिती होती. राजसत्ता धर्मविरोधी झाली होती. कंसाला अनुयायीही पुष्कळ होते. यादव जरी पराक्रमी होते तरी कंसाच्या पुढे त्यांचे काही चालले नाही. हुकुमशाही ज्याला आपण म्हणतो. तो जसं सांगेल त्याप्रमाणे वागायचं. कंसाची जशी इच्छा असेल तसं घडून आलं पाहिजे. अशा स्थितीमध्ये विष्णूंना अवतार धारण करून यावं लागलं. म्हणून कृष्णावतार म्हणजे साक्षात विष्णूंचा पूर्णावतार आहे, असं सांगतात. मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह असे दहा अवतार आहेत, असे आपण ऐकतो. पण दहापेक्षाही पुष्कळ अवतार आहेत. आणखी किती तरी वर्णन केलेले आहेत. या अवतारांच प्रयोजन धर्मस्थापना करायची हे आहे.

यदा यदाही धर्मस्य ग्लानीर्भवति भारत ।<br>अभ्युत्थानम् अधर्मस्य तदात्मानम् सृजाम्यहम् ।।

ही त्यांची प्रतिज्ञा आहे. विश्वाचं आणि धर्माचं संरक्षण हे झालं पाहिजे, हा शास्त्र सिद्धान्त आहे. ऋषींचा सिद्धान्त आहे. समर्थांनी तोच सिद्धान्त मान्य करून प्रयत्न केलेला आहे. त्यात जातियता वगैरे काही नाही. हे काल्पनिक आहे. आपण आपलं जे कर्तव्यकर्म आहे, ते केलं पाहिजे अशा रीतीने सांगणं, त्याप्रमाणे प्रयत्न करणं, मार्गदर्शन करणं, यात जातियतेचा काय संबंध आहे? हा इतका जो मोठा दोष दाखीवला जातो बुद्धिवाद्यांकडून, हा काय खरा दोष आहे काय? प्रतिबंध निर्माण करणं, याचा अर्थ संघर्ष निर्माण करणं असा होत नाही. संघर्षाकरता म्हणून धर्माची स्थापना किंवा धर्मार्थ संघर्षाकरता नाहीये, हे मूळ लक्षात घेतलं पाहिजे. पण व्यर्थ जर कोणी संघर्ष करू लागले तर आपल्या कर्तव्यकर्माचं, धर्माचरणाचं संरक्षण करण्याकरता तो संघर्ष अपरिहार्य आहे, राजकीय दृष्टिनं. आपला मुलूख घेतला दुसऱ्या प्रतिस्पर्ध्याने, शत्रूने तर आपण काय स्वस्थ राहू का? त्या करता युद्ध होतातच की नाही? आजपर्यंत झालीच की युद्ध! आपली राजसत्ता ज्या प्रदेशात आहे, ती जर आणखी कुणी दूर करण्याचा प्रयत्न करील तर त्या करता युद्ध होणारच. ह्यात काय जातियता आहे? हे कर्तव्यकर्मच आहे ना! संतोषवृत्ती ही क्षत्रियाला बिलकुल उपयोगी नाही, असं शास्त्रकारांनी सांगितलंय. संतोष हा गुणही आहे, दोषही आहे. संतोष हा ब्राह्मणांना

गुण आहे. 'असंतुष्टः द्विजानष्टः' म्हणून शास्त्रकार सांगतात. द्विजाने जर असंतोष बाळगला तर त्यांच जे कार्य आहे ते त्यांना करता येणार नाही. द्विजाने तपःसिद्धीने आपली शक्ती वाढवायची आहे. जिवभाव अमर्याद करायचा आहे. जिवशक्ती मोठी करायची आहे. ज्ञानशक्ती मोठी करायची आहे. उच्च भूमिका मिळवायची आहे. तेव्हा असंतोष हा त्यांचा दोष आहे. संतुष्ट राहणारे क्षत्रिय शेवटी नष्ट होऊन जातात, असं नीतिशास्त्रकार सांगतात. तो कोणी संतोष मानायचा? कशाकरता मानायचा? किती मर्यादित मानायचा? हा सगळा विचार करणं बुद्धीचं काम आहे. संतोष–असंतोष कुठं व्यक्त करायचा? हे बुद्धीचं काम आहे. त्याकरता बुद्धी आहे. नीतिशास्त्र वगैरे शास्त्र त्याकरता सांगितली आहेत. आर्य चाणक्यांनी त्याकरता अर्थशास्त्र सांगितलं आहे. त्या दृष्टीनेही पुष्कळ विचार त्यांनी मांडलेले आहेत.

तेव्हा भगवान गोपालकृष्णांच्या समोर हा विचार आलेला आहे आणि ते आलेत. ते येण्यापूर्वीच देवांनी ही बातमी कंसाला दिली आहे. देवकीचा विवाह झाल्यावर वरात निघाली असताना त्या देववाणीनं सांगितलं आहे की, "कंसा, या देवकीचा आठवा मुलगा तुला मारणार आहे." ती माहिती मिळाल्याबरोबर कंसाचे प्रयत्न सुरू झाले. असु याचा अर्थ प्राण. आपले प्राण सुरक्षित राहण्याकरता प्रयत्न करायचा. त्याकरता दुसऱ्या कोणाचे प्राण घ्यावे लागले तरी हरकत नाही. यालाच 'असुर' असं म्हणतात. असुरी वृत्ती, असुरी संपत्ती. स्वतःचा स्वार्थ. स्वतः सुरक्षित राहण्याचा प्रयत्न करायचा बाकी काही नाही. त्याकरता आपल्या हातून कितीही दोष, अपराध घडले तरी हरकत नाही, त्याचा विचार केला जात नाही. तशा वृत्तीचा तो कंस होता. त्याचे अनुयायी सगळे त्याला तसे मिळालेले आहेत. देवकीला सुद्धा त्याने मारायची तयारी केली होती पण वसुदेवाने त्याला वचन दिले की, "हिला मुलगा झाल्यावर तुझ्याजवळ आणून देईन." त्याचा विश्वास बसला. "बरंय" म्हणाला. पहिला मुलगा झाल्याबरोबर वसुदेव घेऊन गेला त्याला कंसाकडे. मथुरा राजधानी वसुदेवाने सोडली नाही, हे विशेष आहे. कंस जरी विरोधी असला तरी आपलं जे काही कर्तव्यकर्म आहे, ते आपण धैर्याने करीत राहायचे. केव्हा तरी अनुकूल काल येईल. दुसरा मुलगा झाल्यावर तो ही राजवाड्यावर नेऊन दिला. कंसाच्या मनावरही परिणाम झालेला आहे. तो म्हणाला. हा काही माझा शत्रू नाही. याला घेऊन जा. आठवा मुलगा तेवढा मला द्या. घेऊन आला. वसुदेवही राजाची वृत्ती कशी आहे? हे जाणून होता. अस्थिर वृत्ती आहे. राजसेवा फार कठीण आहे म्हणतात. प्राणावर केव्हा प्रसंग येईल याचा काही नेम नाही. आणि झालं तसंच.

नारदांनी येऊन त्या कंसाला सांगितलं की, "तुमचे जसे प्रयत्न चाललेत तसे देवांचेही प्रयत्न चाललेत. सगळ्या देवांनी विष्णूंना सहाय्य करण्याकरता यादवकुलामध्ये जन्म घेतला आहे. सगळे यादव म्हणजे देव आहेत." ही माहिती नारदाकडून मिळाली कंसाला. वसुदेवही देवच आहे. त्याचा पहिला मुलगा काय, अन् दुसरा मुलगा काय. सगळे देवच आहेत. या कल्पनेने कंसाने देवकीची सगळी मुले मारली. सहाच्या सहा मुलं. जन्माला आल्याबरोबर मारायची. काय त्या माऊलीची स्थिती झाली असेल! वसुदेव कदाचित धैर्याने राहीला असेल, पण त्या देवकीच्या मनाची काय अवस्था झाली असेल! बंधू आहे कंस तिचा. पण स्वार्थापुढे बंधू–भगिनी हे काही नात नाहीये. ही पहिल्यापासून मनःस्थिती आहे.

ह्या मानसिक स्थितीची गोपालकृष्णांना सुधारणा करायची आहे. दैत्यांचा नाश करायचा म्हणजे त्यांची मानसिक स्थिती बदलण्याचा प्रयत्न आहे. त्या करता दंड हा मुख्य उपाय त्यांनी मानलेला आहे. केवळ साममार्गाचा काही ठिकाणी अवलंब केला. काही असुरांच्या बरोबर साममार्गानेही वागले श्रीकृष्ण. पण सर्वांबरोबर आणखी सांत्वन नाहीये. दंड हाच शेवटचा उपाय आहे. बुद्धी सुधारायची आहे. तर संरक्षण होईल. पापकर्म करण्याकडे बुद्धी जाते आमची आणि अशा वृत्तीच्या लोकांची संघटना तयार होते. म्हणजे पाप हेच धर्म कर्म आहे, अशी स्थिती त्या संघटनेमध्ये येऊन जाती. पाप करणं म्हणजे काही दोष नाहीये. तर ही जर वृत्ती वाढत गेली, तर समाजाचं, विश्वाचं संरक्षण कसं होईल? 'धर्मोहि विश्वस्य जगत् प्रतिष्ठा' म्हणून सूत्रकार सांगतात. संपूर्ण जगाला स्थैर्य, प्रतिष्ठा जर पाहिजे असेल, तर धर्म पाहिजे. जास्तीत जास्त अनुयायी असले तर उत्तमच आहे. तशी कालगणनाही केलेली आहे – कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग. जास्तीत जास्त सात्त्विकवृत्तीने राहणारे धर्मशील लोक कृतयुगामध्ये असतात. त्यात अधर्माने वागणारे नसतात, असा अर्थ नाही. आणि

कलियुगात सर्वच अधार्मिक आहेत, स्वार्थी आहेत असाही अर्थ नाही. कमी जास्ती प्रकार असतो. कैकेयीने रामाला वनवासात पाठवले. असं त्या युगातच झालं ना! कैकेयी त्या युगातच होती ना! आपल्या मुलाला राज्य मिळालं पाहिजे. या लोभाने रामालाही वनवासात पाठवणारी कैकेयी पूर्वीच्या युगातच झालेली आहे. म्हणजेच ही बुद्धी जास्ती जास्ती वाढू नये, हा (रामावतार होण्यामागे) प्रयत्न दिसतो. जास्ती जास्त स्वार्थ बुद्धीचा प्रसार झाला तर ईश्वराकडून संरक्षण नाहीये. जगाचं रक्षण होणार नाही, स्थैर्य येणार नाही. अराजकता सगळीकडे वाढून उपयोगाची नाही. म्हणून हा विचार करावा लागतो. सीतेला रावणाने नेले म्हणून रावणाचा नाश केला असा अर्थ नाहीये. तर रावण जी एक अनिष्ट संस्कृती निर्माण करत होता तिचा नाश केला. बिभीषणाने उपदेश केला, "अरे!, ती परस्त्री आहे देऊन टाक त्याची ती रामाला." तर रावण म्हणाला, "आम्हाला परस्त्री कोणचीच नाही. आम्ही राक्षस आहोत. जगातल्या वाटेल त्या स्त्रिला आम्ही आणू शकतो आणि आणणार."

ही संस्कृती जर वाढली असती तर काय झालं असतं? कोणत्याही स्त्रिला पळवून आणायला कोणाची भीती आहे? ही संस्कृती वाढू द्यायची का? हा विचार बुद्धिमान व्यक्तीने केला पाहिजे. तो केला नाही कुणी, तर त्यांची बुद्धी ठिकाणावर आणण्याकरता ईश्वरशक्तीला प्रयत्न करावा लागतो. त्याप्रमाणे कृष्णावतार होण्यापूर्वी देवकीची सहा मुलं त्या कंसाने मारली आहेत. सातव्या मुलाच्या वेळेस गर्भातच बदल झाला. देवकीचा गर्भ त्या रोहिणीच्या गर्भात गेला, ईश्वराच्या योगमायाशक्तीने. नंतर भगवान देवकीच्या गर्भामध्ये आलेले आहेत. आणि त्या वेळी कंसाने मोठी दक्षता घेतली आहे. वसुदेव–देवकीला तुरुंगातच टाकले. त्याने विचार केला या दोघांच्या बाजूचेही लोक आहेतच. त्यांना वाटणार मुलगा झाल्याबरोबर आपल्या ताब्यात यावा. आपण जर त्याचा लगेच नाश केला, म्हणजे आपण अजरामर झालो. ही समजूत खरी आहे की नाही कोणास ठाऊक? अजरामर जगात कोणीच नाही ना! दुसऱ्याला मारलं म्हणजे आपण अजरामर होतो हे कसं शक्य आहे? कुणीही स्थिर नाही. पण या तत्त्वज्ञानाचा विचार कोण करतोय सध्या? फक्त अर्थ–कामाची योजना आपल्याला पाहिजे आहे सध्या; आणि आम्ही अजरामर आहोत अशी आमची कायमची समजूत आहे. शेवटपर्यंत आणखी आपण अजरामर आहोत असचं वाटत असतं आपल्याला. आपल्यासुद्धा हा देह सोडून जायचंय, असं कुणालाही वाटत नाही. औषध देणारा, औषध घेणारा, कुणीही असो. त्यामुळे सगळेही अनर्थ घडून येतात. संघर्ष घडून येतात. हा पक्ष चांगला, तो पक्ष वाईट. धार्मिक अधार्मिक, अस्तिक नास्तिक हे सगळे आणखी घडत चाललेलं आहे. बुद्धीचा खेळ आहे हा सगळा. तो बुद्धीचा खेळ कसा करायचा? त्या बुद्धीलाही प्रेरक अशा प्रकारची ईश्वरशक्ती आहे.

यादवांच्या कुळातच कंस जन्मला. पण तो असुर निघाला. अनुयायीही त्याला पुष्कळ मिळाले. त्या वेळेला यादव निर्वासित होऊन गेले. म्हणून गोपालकृष्ण जन्म झाल्याबरोबर वसुदेवाला सांगून गोकुळात जाऊन राहिलेले आहेत. नंदाचं राज्य आहे तिथे. गोपालांचा राजा आहे. पुष्कळ गोधन आहे. पण सात्त्विक संस्कार आहेत. धर्मशीलता आहे. असुरांचा संसर्ग जास्ती नाहीये. ती मंडळी मथुरा राजधानीमध्ये होती. पण त्यांच्या असुरी प्रवृत्तीचा प्रसार गोकुळासारख्या लहान गावात, निरनिराळ्या खेडोपाडी झालेला नव्हता अद्यापि. चांगली ज्ञानशक्ती असणारी पुष्कळ ऋषीमंडळी आहेत. ईश्वराचे आवाहन करणारी मंत्रशक्ती त्यांच्या जवळ आहे. मंत्रशक्तीने ईश्वराचे आवाहन होऊ शकतं. हे समजलेली मंडळीही त्या काळात होती.

कर्नाटक प्रांतात चिदंबर दीक्षित नावाचे मोठे सिद्ध पुरुष होऊन गेले. ते लहान असताना त्यांच्या वडिलांना शिवगौरीची पूजा करण्यासाठी एका यजमानांनी बोलावले. यांच्या वडिलांनी यांना पाठवलं. साक्षात शिवाचा अवतारच होते ते. त्यांनी सगळी पूजा केली आणि विसर्जन करायचं ते विसरून गेले. पूजेतला तो हत्ती घरभर फिरायला लागला. मग पुन्हा जाऊन मंत्राक्षता टाकून त्याच विसर्जन करून आले. मातीचा हत्ती पण मंत्राने आवाहन केल्यावर सजीव झाला. अशा पुष्कळ अद्भुत गोष्टी आहेत. आणि त्या सगळ्याही खोट्या आहेत अशी पक्की कल्पना आमची झाली आहे. हा आमचा बुद्धिवाद आहे. सगळ्या अद्भुत गोष्टी खोट्या असतात. का खोट्या म्हणायच्या? काही आवाहन शक्ती, विसर्जन शक्ती अशी काही आहे की नाही! प्रयोग आहेत ते.

नंदादि गोपाल गोकुळामध्ये राहत होते. पुष्कळ गाई असायच्या. गायींचे संरक्षण होण्याची योजनाही

शास्त्रकारांनी करून ठेवली आहे. मोठी अरण्ये, डोंगर, वन, उपवन यांच्या वर कोणाचंही स्वामित्व नाही. राजाचं सुद्धा नाही. त्या ठिकाणी कितीही गाई चरायच्या. त्यांना तृण मिळायचं. आता प्रत्येक झाडावर नंबर पडलेत. तरीसुध्दा त्यांचं मिळावं तेवढं उत्पन्न मिळतच नाही. कुठं जातं कोणास ठाऊक. गायींचं संरक्षण करणं हे पुण्यकर्म आहे. गायींच्या दुधापासून दूध, लोणी, तूप वगैरे मिळतं. त्याचा आहारशुद्धीसाठी म्हणून उपयोग होतो. मोठमोठ्या गोपालांपैकी नंदराजा एक होता. त्यांच्या गोकुळामध्ये भगवान गोपालकृष्ण येऊन राहिले. बलरामजीही तिथेच राहिले होते. वसुदेवाच्या आणखी काही स्त्रिया होत्या. देवकीला आणि वसुदेवाला कंसाने तुरुंगात ठेवलं पण अगोदरच वसुदेवाने आपल्या काही स्त्रिया आपल्या मित्रांकडे राहायला पाठवून दिल्या होत्या. कंस कोणच्या वेळेला काय करेल याचा काही नियम नाही. म्हणून ती रोहिणी तिथे राहत होती. तिचा मुलगा बलरामही तिथंच राहत होता. भगवान श्रीकृष्णही तिथेच राहायला लागले. त्यांच्या अवताराचं कार्य म्हणजे – परित्राणाय साधुनाम् विनाशायच दुष्कृताम् – साधूंच परित्राण करणं आणि दुष्कृत्य करणाऱ्यांचा विनाश करणं एवढंच काम आहे. जास्ती विचार नाही. फाशीची शिक्षा सुप्रीम कोर्टानं दिल्यानंतरसुद्धा फास लावायचा का दुसऱ्या कोणी द्यायचा? यातच किती तरी महिने निघून जातात याला काय विचार म्हणायचे? सुप्रीम कोर्टाची शक्ती आहे. मग त्याने दिलेल्या निर्णयावर पुन्हा विचार कसला? तर इथे विचार नाहीये.

जे साधू आहेत, त्यांची स्थिर बुद्धी आहे. ते आपलं कर्तव्यकर्म कधीही सोडत नाहीत. पुष्कळ आणखी दुःख सोसतात. त्यांच साधुत्व हे निकषाने सिद्ध झालेलं आहे. त्यांचं संरक्षण करायचं आणि त्यांना त्रास देणारे, विरोधी वृत्तीचा प्रसार करणारे, अधर्माचा प्रसार करणारे जे लोक आहेत, केवळ स्वतःच्या स्वार्थ, संरक्षण, त्यांना शासन करायचं. 'विनाशय' हा शब्द मुद्दाम घातलाय. दुर्जनांचा नाशच करायचाय. मृत्युदंडाशिवाय त्यांना दुसरी शिक्षा नाही. त्याला सुरुवात झालेली आहे. श्रीकृष्णांचा जन्म झाला त्याच वेळी यशोदेला मुलगी झालेली होती. गोपालकृष्णांना वसुदेवाने बरोबर घेतलं. बाहेर निघाल्यावर दरवाजे आपोआप उघडलेले आहेत. पहारेकरी झोपलेले आहेत. वसुदेव बाहेर आलेला आहे. यशोदेच्या पुढे पलंगावरती तो मुलगा ठेवला, तिला नुकतीच झालेली मुलगी घेतली. कुणीही जागे नाही. सगळ्यांना गाढ झोप लागलेली आहे. हे ईश्वराच्या मायाशक्तीचं निदर्शन म्हणून शुकाचार्यांनी सांगितलं आहे. ती मुलगी मायादेवीचा अवतार घेऊन आली होती, ईश्वराच्या आज्ञेने.

नंतर कंसाला समजलं, सगळे पहारेकरी जागे झाले. आठवा मुलगा झाला म्हणाले. सांगत गेले. कंस धावत आला. ती मुलगी घेतली त्याने मारण्याकरता, उचलली. ती आकाशात निघून गेली. देवीच्या रुपामध्ये प्रगट होऊन म्हणाली, 'तुला मारणारा तुझा शत्रू जन्माला आलाय कुठे तरी.' म्हणजे आठवा मुलगा झालाच नाही मग असं कसं? प्रत्यक्ष आठवा मुलगा झाला, वेळेवर त्याची रवानगी झाली, सगळं झालं. परंतु याची कल्पना ही आठवी मुलगीच देवकीला झाली. ती मुलगी देवीच्या रुपाने सांगून गेली की तुला मारणारा शत्रू जन्माला आलेला आहे. पण त्याचा शोध कसा करायचा?

त्याची सगळी मित्रमंडळी त्याच्या सारखीच होती. अशा लोकांमध्ये अधिकाधिक पापकर्म करण्याची ज्याची बुद्धी आहे, तो श्रेष्ठ ठरला जातो. एक समुदायच असतो त्यांचा. जास्तीत जास्त हिंसा, जास्तीत जास्त पापकर्म, क्रूर कर्म, जास्तीत जास्त स्वार्थसिद्धीला उपयुक्त अशा प्रकारचे विचार जो मांडतो, तो त्यांच्यामध्ये बुद्धिमान. कंसाच्या मित्रांनी सांगितलं, उपाय अगदी सोपा आहे. दहा दिवसाच्या आत जन्माला आलेली सगळीच मुलं जर आम्ही मारली, तर तुमचा शत्रू जाईलच की! झालं, त्यांना राजाची अनुज्ञा मिळाली. त्यावेळी 'पूतना' नावाची राक्षसीण गोकुळातली लहान मुलं ठार मारायची. तिला हा मुलगा देवकीचा आहे, हे माहीत नव्हते. तो यशोदेचा मुलगा म्हणून प्रसिद्ध झाला गोकुळामध्ये. देवकीला आठवा मुलगा झाला हे फक्त वसुदेव व देवकीलाच माहीत होते. पण शेवटपर्यंत ते काही बोलले नाहीत. वसुदेव मंत्री होता. मंत्री शब्दाचा अर्थ गुप्त ठेवणं, जास्ती व्यक्त न करणं. सगळंच व्यक्त करून टाकणाऱ्याला मंत्री म्हणता येत नाही, शास्त्रीय दृष्टीने. संस्कृत भाषेप्रमाणे तो मंत्री होऊ शकत नाही. आता सगळे निर्णय अगोदरच प्रसिद्ध होतात. वर्तमान पत्रात वाचतो आपण.

तर सगळी मुलं मारायची. बालहत्या म्हणजे भ्रूणहत्या, केवढा दोष आहे! पण दोषांचा, गुणांचा विचार करण्याची त्यांची बुद्धीही नाहीये. गुणदोषांचा विचार करून, केवळ दुसऱ्याचे दोष न पाहता आपल्या बुद्धीमध्ये कोणचे दोष आहेत याचा प्रथम विचार करून ते दोष दूर करण्याचा प्रयत्न करणारे ते खरे साधू आहेत, श्रेष्ठ पुरुष आहेत. आणि त्यांचं आणखी कल्याण होऊ शकतं. दुसऱ्याचे नुसते दोष पाहून काय करायचंय?

इकडे पूतना राक्षसी सुंदर स्त्रिचा वेष घेऊन आलेली आहे. सर्वांना वाटलं कोणी तरी श्रीमंताच्या घरची स्त्री आलीये. उत्तम भरजरी वस्त्र नेसलेली आहे, दागदागिने घातलेले आहेत. "मुलाला पाहायला आले आहे." म्हणाली, "या!" त्यांच्यापैकी कोणाला कशाला कल्पना येईल की ही राक्षसी आहे. त्या मुलाला तिने मांडीवर घेतले आणि स्तनाला लावून पाजायला लागली. सगळ्यांना वाटलं बाईला मुलाचं वेड जास्ती असेल. घेतलं म्हणून काय बिघडलं? इथपर्यंत त्यांचा विश्वास आहे. मनुष्याची खरी ओळख पटायला फार वेळ लागतो. काही काळ जावा लागतो त्या शिवाय खरं खोटं समजत नाही. त्या स्त्रिने आपल्या स्तनांना जे विष लावलं होतं, ते त्या बालकाने सगळं शोषून घेतलं आणि रक्त शोषायला आरंभ केला. ती स्त्री कासावीस होऊन ओरडायला लागली आणि शेवटी आपलं मूळचं राक्षसी रूप धारण करून गतप्राण होऊन पडली. गोपी धावत गेल्या आणि त्या राक्षसीच्या छातीवर पडलेल्या बालकाला घेऊन आल्या. आता त्या राक्षसीला मारलं कोणी ह्याचा कोणालाच पत्ता नाहीये. मनुष्यरूप धारण करून आलेल्या राक्षसीचा नाश झाला. पण कोणी केला? कोणाची शक्ती आहे ती? याचा मात्र त्या गोप स्त्रियांना पत्ता लागला नाही. बालकाला आणून निजवलं पाळण्यात.

ईश्वरशक्ती मानणारी मंडळीही पुष्कळ होती त्या वेळेला. ईश्वर दिसत नाही म्हणून ईश्वर मानायचा नाही हा बुद्धिवाद त्या वेळेला नव्हता. पूर्ण नास्तिक होणंही कठीण आहे म्हणा. ते शक्य नाही. लोकमान्यांचे पुण्यात कोणी गुरू होते म्हणतात. ते ईश्वर नाही, पाप नाही, पुण्य नाही, काही नाही असं सांगायचे. आणि एकदा लोकमान्य त्यांच्या घरी गेले असता ते म्हणे विष्णूसहस्रनाम म्हणत बसले होते. लोकमान्यांनी त्यांना विचारले, अहो, तुम्ही ईश्वर मानत नाही मग विष्णूसहस्रनाम कशाला म्हणता? ते म्हणाले, होय बाबा, ईश्वर नाहीये. पण कदाचित असला तर काय करावं? म्हणून आपलं मी म्हणतो. ह्याला काय नास्तिक म्हणायचं? तर त्या वेळेलासुद्धा ईश्वरशक्ती मानणाऱ्या मंडळींना देखील त्या मुलाने राक्षसीला मारलं हे पटलं नाही. एक महिनासुद्धा झाला नाही या मुलाला हा कसा मारेल एवढ्या मोठ्या राक्षसीला?

तेव्हा त्या राक्षसीचा नाश प्रथम झाला आहे. भगवंतांनी पूतना राक्षसीचा नाश केला. ईश्वराची शक्ती दाखीवण्याकरता नाहीये. हे ही तितकच खरं आहे. समजेल तेव्हा समजेल समजणाऱ्याला. त्या पूतना राक्षसीला श्रीकृष्णांनीच मारलं हा उल्लेख वेदव्यासांनीच केला आहे. भगवद्भक्त जे आहेत, ते जाणू शकतात ईश्वराची शक्ती आणि त्याप्रमाणे ते निश्चित सांगू शकतात. सामान्य लोकांची मात्र हा लहान मुलगा राक्षसीला मारणं शक्य नाही अशीच शेवटपर्यंत कल्पना आहे.

आणखी एक चरित्र सांगतात. नंदादिक गोपाल एकदा मथुरेला गेले. मथुरा राज्य म्हणजे त्यांच्या वरचे राज्य आहे. नंद वगैरे सगळे मांडलिक राजे होते. वर्षाला काही खंडणी वगैरे देण्याकरता जात होते. नंदाने कंसाला भेटून कर वगैरे सगळा दिला. गावाबाहेरच्या उपवनामध्ये बैलगाड्या सोडलेल्या होत्या. वसुदेव त्याला भेटायला आला. दोघे मित्रच होते. वसुदेवाने एवढंच सांगितलं, "नंदा!, तुला आतापर्यंत काही मुलगा नव्हता. या वयामध्ये तुला मुलगा झालेला आहे असं मी ऐकलं बरं झाल, बाबा. संसारातलं सुख तुला मिळाल." नंदही म्हणाला, "तुझी सगळी मुलं कंसाने मारली. एक मुलगी राहिली होती तीही आकाशामध्ये निघून गेली. काय करायचं! काय अरिष्ट आहे! दुर्दैव आहे!" अशा शब्दात एकमेकांचं समाधान केले. आणि नंतर नंदाला वसुदेवाने सांगितले की आता शक्य तितक्या लवकर तू गोकुळामध्ये जा. तिथं काही अनर्थ होण्याचा संभव आहे. वसुदेवाला सगळं माहीत होतं. श्रीकृष्ण हा काही नुसता आपला मुलगा नाही, हा कोणीतरी ईश्वरी अवतार आहे याची वसुदेवाला कल्पना होती.

तर आपला मुलगा प्राण संकटातून वाचला म्हणून नंदाला समाधान वाटलेले आहे. नंदाने पुत्रजन्माचा उत्सव पुष्कळ मोठ्या प्रमाणावर केला. सगळ्या ऋषिमंडळींना बोलावले. आवश्यक ते शास्त्रीय संस्कार केले.

भगवंतांनी अर्जुनाच्या बुद्धिवादाला महत्त्व दिलं नाही. "तू दैवी संपत्ती घेऊन जन्माला आला आहेस," अशी जरी प्रशंसा केली तरीसुध्दा, "शास्त्र हे तुला प्रमाण मानावं लागेल," असं सांगितलं. "मी सांगतो ते ऐक", असं कधीही श्रीकृष्णांनी सांगितलं नाही. "शास्त्र असं म्हणतंय" असं सांगितलं.

त्या वेळेला पुष्कळ गायी असायच्या. राजे, समाजातील धनिक मंडळी गायी दान करीत. ब्राह्मणांना, ऋषिंना पैशापेक्षा गोधन जास्त मिळायचं. त्यांच अर्थार्जनाकडे लक्ष नसायचं. त्यांची मोठमोठी गुरुकुल असायची. समाजातल्या मुलांना उपनयन झाल्याबरोबर गुरुकुलात ज्ञानार्जनासाठी पाठवत. ऋषी आलेल्या मुलाच्या बुद्धीची परीक्षा करीत. मंद आहे? की मध्यम आहे? की अगदी उच्च दर्जाची बुद्धी आहे? ही सगळी परीक्षा व्हायची. त्यांच्या बुद्धीचे उत्तम संवर्धन करण्याकडे ऋषी लक्ष देत. ते कसं करावं यासाठी काही शास्त्रीय प्रयोग आहेत. धारणा शक्ती मोठी आहे ना! ऐकल्यानंतर बुद्धीमध्ये त्याचं धारण व्हायला पाहिजे. ते मनामध्ये स्थिर व्हायला पाहिजे. तर त्या ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्याला स्वतःलाही होईल, आणखी समाजालाही होईल. तर अशा रीतीने गुरुकुलामध्ये पुष्कळ विद्यार्थी असायचे. गायींचा उपयोग त्या करता व्हायचा. विद्यार्थ्यांना भरपूर दूध तूप मिळण्याची व्यवस्था होती. आहारशुद्धी, निसर्गाच सान्निध्य. त्यांच्या बुद्धीकडे जास्त लक्ष आहे. सौख्य वगैरे जे काही शब्द आहेत व्यवहारातले ते शब्द इथे अगदी पोकळ ठरतात. सौख्य शब्दाचा अर्थच आपल्याला समजत नाहीये. कशाने सुख मिळेल याचा निर्णयही आमच्या बुद्धीने केला जात नाही. अमुक मिळालं म्हणजे त्यात सुख आहे म्हणायचे, आणि ते मिळाल्यानंतर त्यात काही नाही असही म्हणायचं. दुसरं मिळालं म्हणजे सुख मिळेल अस समजून त्याच्या पाठीमागे लागायचं. अस्थिर बुद्धीचं लक्षण आहे हे. कोणचाच निर्णय नाही. सुखाचाही निर्णय नाही, दुःखाचाही निर्णय नाही. तो निर्णय करणारी बुद्धी कशी स्थिर पाहिजे. स्थितप्रज्ञाची उच्च भूमिका भगवद्‌गीतेच्या दुसऱ्या अध्यायात अर्जुनाला मुद्दाम सांगितली. स्थितप्रज्ञ कसा असू शकतो त्याची बुद्धी कशी असू शकते?

तर नंदाने श्रीकृष्णजन्माच्या सोहळ्यात पुष्कळ ऋषीमंडळींची संभावना केली, आदर सत्कार केला. यशोदेला मुलगा झाल्याचा आनंद सर्व गोप स्त्रियांना झाला. एकदा श्रीकृष्णांना स्तनपान देऊन यशोदेने खाली ठेवले. इतक्यात भयंकर मोठा वारा सुटला. वाऱ्याच्या रुपाने चक्रवाक नावाचा असुर आला. धुरळा उडाला. सर्वांनी डोळे झाकून घेतले. आणि वायुरूपी असुर त्या मुलाला आकाशात घेऊन गेला. धुरळा कमी झाल्यावर यशोदा डोळे उघडून बघते तो मुलगा नाही. कुठे गेला? वारा शांत झाला. त्या चक्रवाकाचा कोणीतरी गळा दाबतो आहे असं त्याला वाटलं आणि प्राणोत्क्रमण होऊन तो खाली जमिनीवर पडला. ह्या गोपींनी पाहिलं त्या असुराच्या छातीवर तो मुलगा आहे. घेऊन आल्या त्याला. सर्व शक्ती एकवटून दैवीशक्तीचा नाश करायचे असुरांचे प्रयत्न चालूच आहेत. पण असा त्रास होतो म्हणून खेडेगांव, घरदार सोडून लोक शहरात राहायला आले नाहीत. खेडेगांवात संरक्षण होत नाही, शहरात संरक्षण होत हीच कल्पना आता होऊन बसली आहे.

क्षमाशीलतेचा, समदृष्टीचा अभ्यास पूर्ण झाला पाहिजे. नुसती वाचिक अहिंसा उपयोगी नाही. शरीराने तर दुसऱ्याला पीडा द्यायची नाहीच पण मनानेसुद्धा द्यायची नाही. दुसऱ्यांकडून करवायची नाही. दुसरा हिंसा करीत असेल तर त्याला अनुमोदन द्यायचं नाही. अशी कितीतरी प्रकारची अहिंसा आहे. ह्या सगळ्याही अहिंसेचा विचार करून आणि त्याप्रमाणे काया, वाचा, मनाने ज्याची अहिंसा वृत्ती सिद्ध झालेली असेल, त्याने अहिंसेचा पुरस्कार करायला हरकत नाही. कारण त्याचा प्रयत्न सिद्ध झाला आहे ना! योगसूत्रकार पतंजली सांगतात ज्याची अहिंसा सिद्ध झालेली आहे त्याच्या सान्निध्यात येणाऱ्याच्या मनातलंसुद्धा वैर जाते. पूर्वी ऋषींच्या आश्रमात गाय आणि वाघ एकत्र पाणी पित होते. साप व मुंगूस एकत्र राहत होते. ही प्रेमभावना निर्माण होण्याकरता राजशासनाचा काही उपयोग नाही. दुसऱ्याच्या हिंस्त्र बुद्धीवर परिणाम करणारी आधी आपली अहिंसा बुद्धी तयार झाली पाहिजे ना! तरच दुसऱ्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. ती बदलू शकते. तो एक प्रयोग आहे.

"ती फक्त अतिशयोक्ती आहे. असं कसं शक्य आहे?" एवढं समजून आम्ही आपले गप्प बसतो. आमचा हाच मर्यादित बुद्धिवाद! जास्त विचारच करायचा नाही.

तर अशारीतीने एकेक राक्षस मारले जाऊ लागले. त्यामुळे त्यांना वाटतंय हा मुलगा कोणीतरी विशेष असावा. गोकुळातल्या लोकांना या मुलामध्ये शक्ती आहे; ही कल्पना नाहीये. राक्षस मेला म्हणजे तो हिंस्त्र होता. सगळ्यांचा नाश करणारा होता. तो त्याच्याच दोषामुळे मेला. आणि हा मुलगा सुदैवी आहे, त्याच्या एकंदर योग्यतेमुळे त्याचं संरक्षण झालं, असेच सर्व गोप समजताहेत. राक्षसांना मात्र या मुलाची शक्ती कळून चुकलेली आहे. आणि ती मंडळी त्या मुलाच्या नाश करण्याकरता प्रयत्नशील झालेली आहेत.

रामकृष्णांच्या बाललीलांच पुष्कळ वर्णन निरनिराळ्या ग्रंथात केलेलं आहे. चालायला यायला लागल्यावर ते घरात राहीनात. निरनिराळ्या गोपींच्या घरात जायचे. त्यांच्या घरातले दूध, दही, लोणी सगळं वाटून टाकावं. भांडी, डेरे फोडून टाकावेत. असं चाललेलं आहे. एक दिवस सगळ्या गोपींनी यशोदेच्या वाड्यात येऊन कृष्णाची गाऱ्हाणी सांगितली. "हा रोज येतो. आमचा सगळा गोरस वाटून टाकतो. मित्रमंडळी नको म्हणाली तर टाकून देतो. राजपुत्र आहे. त्याला आम्ही कसं बोलायचं?"

पण यशोदेचा विश्वास बसेना. ही त्या गोपींना म्हणाली, तुम्ही खोटं सांगता. कारण श्रीकृष्ण दुसऱ्यांच्या घरात जाऊन ह्या खोड्या करीत, स्वतःच्या घरात त्यांनी हे प्रयोग केले नव्हते. त्यामुळे यशोदेला वाटलं आपला मुलगा चांगला आहे. त्या गोपी काय सांगताहेत. तरी पण मी त्याला शिक्षा करते वगैरे काही तरी सांगून त्यांचं समाधान करून पाठवलं. श्रीकृष्णांचे हे चातुर्य आहे. आणि एक दिवस तो प्रसंग तिच्यावरच आला. ती राणी होती. पुष्कळ नोकर चाकर होते. पण म्हणून स्वतःचं काम स्वतः करणं हे काही पाप नाही. सर्वस्वी नोकरांवरती विसंबून राहिलं पाहिजे असं नाही. त्या दिवशी यशोदा स्वतःच दही घुसळण्याचं काम करीत होती. आणि एवढ्यात गोपालकृष्ण बाहेरून धावत धावत आले. रवी हाताने घट्ट धरली. दही घुसळण्याचं काम बंद झालं. त्यांना स्तनपान करायची इच्छा होती. यशोदेने त्यांना मांडीवर घेतलेलं आहे. पण कितीही दूध प्यायले तरी त्यांची तृप्ती होईना. इतक्यात यशोदेने आतल्या चुलीवर तापत ठेवलेले दूध उतू गेलं. त्या बरोबर तिने लगेच त्यांना खाली ठेवलं आणि ती आत गेली. म्हणजे तिचं लक्ष दुधाकडे आहे तर! मग मात्र ह्यांनी ठरीवलं की आज यशोदेच्या वाड्यात दूध दही काही शिल्लक ठेवायचं नाही.

अनन्यश्चिंतयन्तोमां – अनन्य झाल पाहिजे. अन्य ठिकाणी मन असेपर्यंत ईश्वराचे दर्शन होणार नाही. ईश्वर आहे ही आस्तिक्यबुद्धी. श्रद्धा निर्माण होणार नाही. श्रीकृष्ण म्हणाले, वैकुंठ लोकातून या मातेकरता मी इथं आलो आणि हिचं लक्ष दुधाकडेच जास्त आहे. आज घरात काही शिल्लक ठेवायचं नाही. सगळ्या मित्र मंडळींना इशारा दिलेला आहे. सगळे जमले. एक दगड आणून तो डेऱ्यावर टाकला, तो डेरा फुटून गेला. ते लोणी वगैरे सगळं सांडलं. आणि हे दुसऱ्या रस्त्याने बाहेर गेले. यशोदा बाहेर येऊन बघते तो डेरा फुटलेला. कृष्णाचंच काम, म्हणाली. कुठं आहे कृष्ण? पाहते तो कृष्ण एका मोठ्या उखळावर चढून शिंक्यामध्ये असलेलं दही, लोणी मित्रांना देतोय. शरीर प्रकृती त्या वेळेला सगळ्या मुलांची लहानपणापासून चांगली असायची. सात्त्विक आहार आहे ना! चिंता नाही कसली. धान्य कमी पडेल, अमुक कमी पडेल असं काही नाही. इकडे श्रीकृष्णांनी दही, दूध सगळं सर्वांना वाटून टाकलेलं आहे. यशोदा हातात काठी घेऊन आली. त्या बरोबर त्यांनी एकदम उडी मारली आणि बाहेर पळाले. ती म्हणाली, "गोपी म्हणतात ते खरं आहे. मी उगीच त्यांना म्हणाले गोपालकृष्ण चांगला वागतो, घरात त्याने कधी त्रास दिला नाही. त्यांच म्हणणं बरोबर आहे."

त्यांना धरण्याकरता ती मागे धावते आहे. दमली बिचारी. मग ते थांबले. काठी टाकून दिली तिने आणि त्यांना एका उखळाला बांधायचं ठरीवलं. ईश्वराला बांधायची तिची इच्छा आहे. भक्ताची इच्छा आहे. ते दावं आणलं. त्या उखळाला बांधलं आणि दुसऱ्या बाजूने ह्यांच्या कमरेला बांधू लागली. ते दोन बोट कमी पडलं. दुसरं आणलं, तेही कमी पडलं. पुन्हा तिसरं आणलं, असं चाललंय. सगळ्या

गोपी पाहताहेत. हे काय चाललंय? ही शक्ती कोणाची आहे? दोन अंगुलेच का कमी पडतं? एक कमी पडेल पण त्याला दुसरं जोडल्यावर ते सुद्धा कमी कसं पडतं? किती मोठं आहे ते? तर पुष्कळ वेळा असं झाल्यावर दमली ती बिचारी. मग शेवटी भगवंतांनी बांधून घेतलं स्वतःला. ईश्वर म्हणजे सर्वलोक महेश्वरम् म्हणून म्हणतात त्याला. सर्वांचा नियामक आहे.

जगामध्ये अनंत जीव आहेत अगदी ब्रह्मदेवापर्यंत. ब्रह्मदेवांची शक्ती फार मोठी आहे. सर्वही एकंदर जिवांना निर्माण करण्याच कार्य ब्रह्मदेवांच्याकडे भगवंतांनी सोपीवलेलं आहे. सगळ्यांना जन्माला घालायचं म्हणजे किती कठीण काम आहे! नुसतं नवीन शरीर द्यायचं नाही, तर त्या जिवाची कर्मं कोणची आहेत? त्या कर्माप्रमाणे कोणच्या शरीरामध्ये त्याच्या कर्मांचं फल त्याला भोगायला मिळेल? हा सगळा विचार करून, त्या त्या शरीरामध्ये त्या त्या जिवात्म्याची योजना करायची आहे. ही मोठी शक्ती हे ब्रह्मदेवांची. तरी ते सुद्धा एक जीवच आहेत. पण जीव असले तरी पूर्ण ज्ञानी आहेत.

तर अशा प्रकारे सर्वांचा नियामक असलेल्या ईश्वराने स्वतःला उखळाला बांधून घेतले. सर्वांचा नियामक यशोदेचा नियम्य झालेला आहे. जीव भक्तीच्या सहाय्याने ही शक्ती मिळवू शकतो. ही भक्ती, प्रेमशक्ती फार मोठी आहे. त्या प्रेमशक्तीने स्वतःच्या बुद्धीचीही सुधारणा होऊ शकते, इतरांच्याही बुद्धीची सुधारणा करता येते आणि ईश्वरालासुद्धा आपल्या हृदयामध्ये ठेवता येतं. "हृदय बंदिखाना केला" जनाबाईनं जे सांगितलंय त्याप्रमाणे खरोखर हे भक्त करू शकतात.

कुबेर जो लोकपाल आहे, उत्तरदिशेचा अधिपती, त्याची दोन मुलं जलक्रीडा करण्याकरता स्त्रियांसहवर्तमान नदीमध्ये गेलेली आहेत. अंगावर वस्त्र नाही, मद्यपान केलेले आहे. नारद महर्षि त्या रस्त्याने निघालेले होते. त्या स्त्रिया लगेच वर आल्या, वस्त्र परिधान करून खाली मान घालून उभ्या राहिल्या. या मुलांना काही भान नाहीये. उन्मत्त झालेले आहेत. मग नारदांनी त्यांना सांगितलं, "कुबेराचे पुत्र म्हणून तुमचा जो काही अधिकार आहे, तो पर्यंत तुमची सुधारणा होणार नाही. हे तुमचं सुख गेलं पाहिजे. म्हणजे तुमचे डोळे उघडतील." आणि त्यांना नारदांनी शाप दिला की, "तुम्ही वृक्षयोनीत जाल." वृक्ष ही सुद्धा एक जिवांची योनी आहे. ज्यांच्याकडून जास्तीत जास्त पाप कर्म झालंय त्यांना वृक्षशरीर मिळतं. वृक्ष हा एक जिवात्मा आहे; हे संशोधन पूर्वीच्या शास्त्रकारांचं आहेच आहे. पण अलीकडे बोसांनी हा शोध लावला आणि सगळ्या शास्त्रज्ञांनी तो मान्य केला म्हणतात. नारदांनी पुढे सांगितलं की आता तुम्ही वृक्षयोनीत जा, पुढे भगवान गोपालकृष्ण तुमचा उद्धार करतील.

तेव्हा त्यांचा उद्धार करण्याकरता भगवान गोपालकृष्ण त्यांना बांधलेलं उखळ ओढीत ओढीत निघाले. दोन झाडं अगदी जवळ जवळ होती. त्यांच्यामधून ते पलीकडे गेले आणि ते उखळ तिथे अडकले. थोडासा धक्का मारल्या बरोबर ती दोन्ही झाडे उन्मळून पडली आहेत. सगळे लोक धावून आले. कोणची झाडं पडली? कोणच्या अंगावर पडली? मुलगा कोणी सापडला काय? वगैरे. कारण नेहमीच असे प्रसंग यायचे. त्यांना वाटलं परत कोणी राक्षस आला की काय?

त्या मुक्त झालेल्या दोन्ही कुबेर पुत्रांनी श्रीकृष्णांची क्षमा मागितली. प्रार्थना केली. आणि भगवंतांनी अनुज्ञा घेऊन ते कुबेर लोकाला निघून गेले. तिथे असलेल्या बालगोपालांनी प्रौढांना सांगितलं की गोपालकृष्ण त्या दोन झाडांच्या मधून जाताच ती उन्मळून पडली. पण प्रौढांचा विश्वास बसला नाही. ते म्हणाले गोपालकृष्णांच ईश्वराने संरक्षण केले. श्रद्धा आहे ईश्वरावर पण ती अशी श्रद्धा आहे. समोर ईश्वर असताना त्याची शक्ती मानायला तयार नाहीत ते. पण त्या बालबुद्धीला ती शक्ती मान्य आहे. त्यांचा पूर्ण विश्वास आहे. रागद्वेषरहित बुद्धी बालकांची आहे. म्हणून मोठ्या माणसांनीसुद्धा बालबुद्धीने राहावे असं उपनिषदांमध्ये सांगितले आहे. ज्ञान झाल्यानंतर बालवृत्तीने राहावे असे सांगितले.

सगळ्यांना बरं वाटलं. गोपालकृष्ण किंवा आणखी कोणी मुलगा त्या झाडाखाली सापडला नाही. सगळी मुलं सुरक्षित राहिली ही देवाची कृपा आहे म्हणाले. तेही मोठं संकट दूर झालं. अजून पर्यंत खरी परिस्थिती काय आहे याची कल्पना नाहीये.

गायी व वासरांना घेऊन मुले गावाबाहेर जवळच चरायला जायची. अशीच एकदा गाय वासरे चरायला नेली असता एका वासराचा वेष घेऊन एक दैत्य त्यांच्या मध्ये घुसला. कोणचं वाटेल ते रूप धारण करण्याची शक्ती दैत्यांनी मिळवलेली होती. पण त्याचा उपयोग मात्र ते असा करीत. त्या सामर्थ्याचा उपयोग स्वतःच्या स्वार्थ साधण्याकरता, सत्शील मंडळींना त्रास देण्याकडे करीत. शक्ती काय कोणीही मिळवू शकतो. देवही मिळवतील, दैत्यही मिळवतील. त्यात काय मोठसं! कारण प्रयोग आहे तो. तपश्चर्यारुपी प्रयोगाची सिद्धी कोणीही करून घेऊ शकेल. पण त्याची मूळ जी वासना आहे, मूळ जी बुद्धी आहे ती जर अशीच कायम राहिली – असुरी संपत्ती – मग त्याचा काही उपयोग नाही. त्यालाही नाही आणि इतरांना तर नाहीच नाही. त्या असुरांना शासन करण्याकरता हा अवतार झालेला आहे. तर त्या वासरांच्या वेषात आलेल्या राक्षसाला भगवंतांनी ओळखलंय. त्याला वर उचलून खाली आपटले आणि त्याचा नाश केला.

तिथून ती बालगोपाल मंडळी नदीतीरावर आली. इतक्यात बक नावाचा असुर बगळ्याच्या वेषात तिथे आला आणि त्याने श्रीकृष्णांना उचलून गिळूनच टाकले. म्हणजे केवढा मोठा बगळा असेल! सगळी मुलं घाबरली. एवढ्यात त्या बगळ्याला आपल्या घशामध्ये काही अग्नी लागल्यासारखं वाटलं. त्या बरोबर त्याने बाहेर टाकून दिलं श्रीकृष्णांना; आणि चोचीने मारण्याकरता म्हणून तो आला असता श्रीकृष्णांनी त्याच्या दोन्ही चोचींना धरून फाडले आणि त्याचा विनाश केला.

ही कार्य सहजतेने सगळीकडे होताहेत. मुलांच्या दृष्टीला पडताहेत आणि मुलांची श्रद्धा, विश्वास आहे की श्रीकृष्णांनीच मोठ्या बगळ्याला, वासराला मारलं. पण मोठ्या गोपालांना मात्र याची कल्पना नाहीये. एवढा लहान मुलगा असं कसं करील असंच म्हणायचे ते. ईश्वरबुद्धी अद्याप उत्पन्न झालेली नाहीये. आणि सामर्थ्य असेल तर ईश्वराचं आहे असं मानणं ही सुद्धा बुद्धी कमीच आहे.

आपल्या भारतवर्षामध्ये द्वादश ज्योतिर्लिंगे आहेत. ती स्वयंभू, स्वतःच प्रगट झालीयेत. ते सुद्धा एक अवतार आहेत ईश्वराचे. ज्या स्थानांमध्ये अशा प्रकारच्या मूर्ती म्हणा, आहेत त्या ठिकाणी लक्षावधी लोक जातात की नाही? कोण तिथं काय प्रचार करतात? त्या देवळांचा कुणी प्रचारक आहे का? प्रचार करायलासुद्धा सध्या पैसा लागतो. राष्ट्रीय संत म्हणून निर्माण झालेत. संतांमध्येसुद्धा राष्ट्रीय–अराष्ट्रीय असे प्रकार आहेत सध्या. समर्थ हे जातीयवादी आहेत म्हणतात, सगळे मंत्री. बाकीचे मात्र जातीयवादी नाहीत समतावादी आहेत काय? काय समता म्हणजे काय? अन् जातियता म्हणजे काय? निरूपण करता येत नाही. मूर्तीसुद्धा ईश्वराचे स्वरूप आहे असं मानणारे होते नामदेव. "नाही घडविली, नाही बैसविली" म्हणत होते ते. ही काय घडीवलेली मूर्ती आहे? प्रत्यक्ष पांडुरंग आहे. म्हणून आईनं ताट वाढून दिलं की पांडुरंगांच्या जवळ घेऊन जायचं, "देवा जेवण करा" म्हणायचे ते. नुसता नैवेद्य दाखवून ताट परत आणीत नसत. स्वतःच मग खायचा तो नैवेद्य असं नाहीये. देवाला नैवेद्य खायला लावत होते. पण इथपर्यंत आमची बुद्धी जाऊच शकत नाहीये. ईश्वर प्रत्यक्ष त्या ठिकाणी आहे ही कल्पनाच नाही ना. एक मूर्ती आहे भौतिक दृष्टीने फक्त. भौतिकतेच्या पुढे आमची बुद्धी गेलेलीच नाही. मग तिथे ईश्वरशक्ती काय समजणार आम्हाला?

पूतना राक्षसीला दोन बंधू होते, एक बकासूर आणि अघासुर. आणखी एक होता वासरांसारखा दिसणारा वत्सासूर. त्या पैकी बकासुराचा आणि वत्सासुरांचा या पूर्वीच श्रीकृष्णांनी नाश केला होता. असुरांना कल्पना आलीये की हा श्रीकृष्णच आपले राक्षस मारतोय. त्यांचा त्यावर विश्वास बसला. म्हणजे श्रीकृष्णांची शक्ती मान्य केली असुरांनी. त्या गोपालांच्या करता प्रत्यक्ष वैकुंठपती भगवान श्रीकृष्णांच्या रुपाने गोकुळामध्ये येऊन राहिले. पण त्या गोपालांना ह्याची अद्यापि कल्पना नाहीये. आपल्या सारखीच ह्याने देखील शक्ती मिळीवली असेल असा असुर विचार करत आणि अशा वैर बुद्धीने ते श्रीकृष्णांचा नाश करायचा प्रयत्न करत. तर त्या अघासुराने एका मोठ्या अजगराचे रूप घेतले आणि ज्या बाजूला गोपालकृष्ण व त्यांची बालमित्रमंडळी गायी वासरे घेऊन गेली त्या गोवर्धन

पर्वताजवळ येऊन बसला. वरचा ओठ वरती, खालचा ओठ जमिनीला लागलेला आहे. ती जीभ आत दिसते आहे. पण या मुलांना वाटलं ही मोठी गुहाच आहे गोवर्धन पर्वतावरची. आणि ती जीभ म्हणजे त्या गुहेत जायचा रस्ता. त्या मुलांना असंही वाटलं खरोखर अजगर असला तर तो काही करू शकणार नाही. आपला पाठीराखा गोपालकृष्ण आपल्या बरोबर आहे. भगवान गोपालकृष्णांच्याकडे पूर्ण शक्ती असून ते आपले संरक्षक आहेत ह्याची त्या बालकांना पूर्ण जाणीव आहे. म्हणून तर गोपालकृष्ण आई–बापांना सोडून इथं येऊन राहिलेले आहेत. त्या गोपालांचं शुद्ध प्रेम, विश्वासयुक्त प्रेम आहे.

ती मुलं म्हणायला लागली, बघूया आत जाऊन; ही गुहा किती लांब आहे. आणि ती पुढं जायला लागली. पाठीमागून गोपालकृष्ण त्यांना ओरडून सांगताहेत, "अरे, थांबा! जाऊ नका!" पण तो पर्यंत ती मुलं आत गेली. तरी त्या असुराने अजून तोंड मिटलेलं नाही. कारण कृष्णांची वाट पहातोय तो. कृष्णाला मुख्य मारायचंय. आले भगवान. त्या सगळ्या मुलांचं संरक्षण करायचं आणि या असुराचा नाश करायचा, ही दोन्हीही कामं करायची आहेत त्यांना. तर एकदम त्यांनी त्याच्या मुखामध्ये पाऊल ठेवलं आणि ते आत जायला लागले. त्या अजगराने हळू हळू आपला जबडा बंद करायला सुरुवात केली. ह्यांनीही आपलं शरीर वाढवायला सुरुवात केली. त्यामुळे त्या अजगराला श्वास घेता येईना. त्याचा श्वास कोंडला गेला आणि थोड्याच वेळात त्याचे प्राण गेले. सगळी मुलं, वासरं त्याच्या विषारी श्वासोच्छ्वासामुळे गतप्राण झाली होती. त्यांना जिवंत करून बाहेर आणलंय श्रीकृष्णांनी. त्या अघासुराच्या शरीरातून एक दिव्य तेज बाहेर पडले आणि श्रीकृष्णांच्या शरीरात गेले. म्हणजे त्याचाही उद्धार केला आहे ईश्वराने. सगळ्या असुरांचा उद्धार झालेला आहे. कारण कृष्णांना शत्रू समजून जरी ते वागत असले तरी हा मोठा बलवान आहे, हा आपल्या सगळ्या राक्षसांचा नाश करणार आहे, ह्याचा वेळीच आपण नाश केला नाही तर फार जड जाईल; अशा विचाराने का होईना, पण कृष्णांची मूर्ती त्यांच्या मनामध्ये होती. कसं मारायचं? काय मारायचं? अशा सततच्या विचारांमुळे त्यांचं मन नकळत का होईना, परमेश्वराच्या स्वरुपाच्या ठिकाणी राहिल्यामुळे त्यांचा उद्धार झाला. ईश्वराची समदृष्टी ही अशी आहे. ते असुर शत्रू असतील, माध्यम त्यांचं वैरभाव, द्वेष असेल, परंतु द्वेषाच्या माध्यमातून त्यांचं अंतःकरण हे श्रीकृष्णांच्या ठिकाणी स्थिर झालेलं आहे. कृष्णस्वरुपाशी त्यांचा संबंध आला म्हणून त्यांचा उद्धार झालेला आहे.

याप्रमाणे अघासुराचा नाश झाल्यावर ती मुले वाळवंटात गेली. भूक लागली आहे. सगळ्यांनी शिदोऱ्या सोडल्या. वासरं पाणी प्यायली आणि डोंगरावर चरायला निघून गेली. सगळ्या मुलांना चिंता वाटायला लागली. गोपालकृष्ण म्हणाले तुमचं जेवण चालू दे, मी वासरं घेऊन येतो. आणि ते वासरं आणायला डोंगरावर निघालेले आहेत.

त्या वेळेला असं झालं की अघासुराचा नाश झाल्यामुळे स्वर्गलोकामध्ये देवांनी मोठा उत्सव केला. त्यांना समजलं हा अजगर, अजगर नाही, हा अघासुर आहे. कृष्णाने त्याला मारलेलं आहे. म्हणून वाद्य वगैरे वाजवून सर्व देवांनी श्रीकृष्णांचा जयजयकार केला. हे ब्रह्मदेवांना समजलं. कोण आहे हा कृष्ण? तर नंद–यशोदेचा मुलगा आहे. त्यांच्या मनामध्ये हे विचार आले. आता काय म्हणायचं? कृष्णाने अघासुराला मारलं हे त्यांनाही समजलं. पण हा कोणी जिवात्मा आहे की काय? हाच संशय उत्पन्न झाला. कृष्ण भगवान जरी पोटी आलेले असले तरी "हा आपला मुलगा आहे!" असं वसुदेव समजत होता. बाकीचे यादव समजत होते हा आपल्या पैकीच एक, आपला पुढारी आहे. उत्तम पराक्रमी, उत्तम मुत्सद्दी आहे, यशस्वी आहे, शूर आहे. एवढीच कल्पना आहे. ईश्वर म्हणून कल्पना कोणाचीच नाहीये. एखादे उद्धवजींच्या सारखे कोणी असतील त्यांना कदाचित वाटत असेल. त्यामुळे आपल्या समोर जे काही स्वरूप आहे, आपल्याप्रमाणेच यांचंही शरीर आहे. हे ही शरीरधारी म्हणजे आपण आणि यांच्यामध्ये काय अंतर आहे? संतांच्या बद्दल, प्रत्यक्ष ईश्वर आला असला तरी त्या ईश्वराच्या बद्दलसुद्धा हीच कल्पना येणार. त्यामुळे आपलं कल्याण करण्याची शक्ती ज्यांच्याजवळ आहे ती आपणच नाकारली आहे. हा ईश्वर नाहीये असं आपणच समजतो आहोत मग त्यांना काय जरुरी आहे? मी तुमचं कल्याण करणार असा ते आग्रह करतात काय? तुम्ही जर आत्मीयतेने, प्रेमाने जर जवळ आलात तर कल्याण होऊ शकेल. त्याप्रमाणे ब्रह्मदेवांच्या मनामध्येसुद्धा मोह उत्पन्न झाला. या कृष्णाची परीक्षा पाहिली पाहिजे. हा कोण आहे?

म्हणजे बुद्धीमध्ये बदल कसा होतो मोठ्या मोठ्यांच्या सुद्धा हं! सामान्य माणसाची बुद्धी बदलेल यात काय आश्चर्य आहे? बुद्धी स्थिर असणं हे फार मोठं साधन आहे. तेच आणखी सिद्ध होऊ शकत नाही. त्याच्या करता कितीतरी जन्म घालवावे लागतात. स्थिर बुद्धी व्हायची आहे. एकदा एका मार्गाने निघालेली बुद्धी ही बदलायची नाही.

प्रल्हादजींचं चरित्र सांगितलेलं आहे. शुद्ध सात्त्विक बुद्धी आहे, स्थिर झालेली बुद्धी आहे. हिरण्यकश्यपू सारखा त्रैलोक्याची सत्ता ताब्यात ठेवणारा पिता हा ठार मारण्याचा प्रयत्न करतोय. हरिचं भजन करायचं नाही. प्रल्हादजींनी सांगावं, मी भजन करीतच नाही. हरिची शक्ती त्यांनी ओळखलेली आहे. तो सर्वांच्या अंतर्यामी आहे. सर्वांच्याही बुद्धीला प्रेरणा देण्याची ज्याची शक्ती आहे, त्यामुळे माझी बुद्धी त्याच्याकडे आपोआप लागली आहे. भजन तो करवून घेतोय, मी करत नाहीये. म्हणजे इतकी त्यांची बुद्धी स्थिर आहे. आपला भक्तीधर्म शेवटपर्यंत त्यांनी केव्हाही सोडला नाही. हे धैर्य त्यांच्या जवळ आहे. म्हणजे हे स्थिर बुद्धीचे लक्षण आहे. धैर्य आहे, वैराग्य आहे. स्थिरता बुद्धीची झाल्याशिवाय हे गुण उत्पन्न होत नाहीत. आणि त्यांना त्याचा लाभही होत नाही.

ब्रह्मदेवांनी काय केलं, तर जी वासरं शोधायला श्रीकृष्ण बाहेर पडले, ती सर्व उचलली आणि ब्रह्मलोकामध्ये नेऊन ठेवली. वासरं सापडली नाहीत. पुन्हा परत निघाले गोपालकृष्ण. आपल्या मित्र मंडळींना जाऊन सांगूया की "वासरं मिळत नाही बाबांनो, पाहू या आपण." इकडे ते येण्यापूर्वी त्या सगळ्या गोपालांना उचलून आपल्या ब्रह्मलोकामध्ये ब्रह्मदेवांनी नेऊन ठेवलं, आपल्या योगमायेने. तिथं ती सगळी गाढ झोपेमध्ये निमग्न झाली. आता ब्रह्मदेवांची शक्ती आहे हं, ह्यात काही असुरांची शक्ती नाही. पूर्वी असुरांच्या शक्ती बरोबर हे करावं लागलं देवाला. आता ब्रह्मदेवाची जी शक्ती आहे, ती सर्वोच्च, सर्व श्रेष्ठ आहे. सृष्टीकर्ते म्हणून त्यांना अधिकार मिळाला आहे. पण अशी ज्ञानशक्तीसुद्धा मोहीत झालेली आहे. ईश्वर स्वरुपाचा पडदा पडला आहे. कृष्ण म्हणजे कोण आहे? ते तरी बघू या म्हणाले.

गोपालकृष्णांनी ते जाणलेलं आहे. आणि आता गोकुळामध्ये जायचं कस? एकही मित्र बरोबर नाही, एकही वासरू बरोबर नाही. आणि असे आपण गेलो तर त्या गोपी काय म्हणतील? आमची मुलं कुठे आहेत? त्या गाईंना काय वाटेल आपली वासरं कुठं गेली? म्हणून त्या वेळी गोपालकृष्णांनी सर्व गोपालांची, वासरांची रुपे घेतली. ते जसे खरे होते तसे हे रूप होते. त्यांच्याप्रमाणेच ह्यांची वस्त्रे, स्वभाव, काठ्या वगैरे. सगळी वासरंसुद्धा तशी निर्माण झाली. म्हणजे सगळी सृष्टीच झाली ना. ब्रह्मदेवांना सृष्टीकर्ता म्हणजे मीच, मलाच फक्त सृष्टी करता येते, असा अभिमान झालेला दिसतोय. सर्वं विष्णुमयं जगत् म्हणून जे म्हणतात त्याप्रमाणे त्या वेळेला सर्व गोपाल मंडळी आणि सर्व वासरांच्या रुपाने गोपालकृष्णांनी गोकुळामध्ये प्रवेश केलेला आहे. सगळ्यांनी आपापली वासरे आपल्या गोठ्यात नेऊन बांधलेली आहेत. आपण स्वतः गोपालांचं रूप घेऊन त्या त्या घरामध्ये प्रवेश केला. वासरं गायींचे दूध पिताहेत; म्हणजे प्रत्यक्ष गोपालकृष्णाच दूध पिताहेत. मातांचं दुग्धपान गोपालरुपी श्रीकृष्णाच करताहेत. एक वर्षपर्यंत असा कार्यक्रम चाललेला आहे. कोणालाही ओळख लागली नाही.

ब्रह्मदेवांचा अगदी अल्पकाळ गेलेला आहे. त्यांची कालगणना फार मोठी आहे. नंतर काय झालं पाहण्याकरता ते आलेले असताना पाहताहेत तो ती वासरं, ते गोपाल सगळे आहेत. आणि मग पुन्हा मोह उत्पन्न झाला. आपण जी ब्रह्मलोकामध्ये वासरं नेऊन ठेवली आणि गोपाल नेऊन ठेवले ते खरे का हे खरे? झालं, आपणच मोहात पडले. श्रीकृष्णांची परीक्षा घेणारे ब्रह्मदेव स्वतःच्या शक्तीने, मायेमध्ये स्वतःच मोहीत होऊन गेले. इतक्यात ते दृश्य बदललं. सगळेही विष्णूंच्या चतुर्भुज रुपात दिसायला लागले. सगळी वासरं, सगळे गोपाल शंख, चक्र, गदा, पद्म रुपामध्ये आणि पुन्हा तेही नजर नाहीसं झालं. इकडे गोपालकृष्ण इकडे वासरांचा तिकडे गोपालांचा शोध करतायत असं दिसू लागलं. मग मात्र त्यांची खात्री पटली. हंसवाहनावरून उतरून साष्टांग नमस्कार गोपालकृष्णांना केलेला आहे. पुष्कळ स्तुती ब्रह्मदेवांनी केलेली आहे. मग त्यांना जाणीव झाली. म्हणजे मोठमोठ्या लोकांच्या मनामध्येसुद्धा असा मोह उत्पन्न होऊ शकतो. अर्जुनाला मोह उत्पन्न झाला. ब्रह्मदेवांना मोह उत्पन्न झाला. अशा रीतीने हे चरित्र शुकाचार्य महाराजांनी मोठ्या प्रेमाने,

भक्तीने सांगितलेले आहे. ब्रह्मदेव एक वर्षानंतर खरी वासरे घेऊन – त्या वेळेला ती मुलं वाळवंटात जेवायला बसली होती; ज्यांना सांगून वासरं आणतो म्हणून गोपालकृष्ण निघाले होते. एक वर्षानंतर ते आले खरी वासरे घेऊन, त्या वेळेला ती मुलं म्हणायला लागली, "लवकर ये बाबा! तुझी वाट पाहत आम्ही बसलो. आम्ही एक घास सुद्धा खाल्ला नाही." एक वर्षाचा काळ उलटून गेलाय याचं विस्मरण झालेलं आहे. "मत्तः स्मृतिर्ज्ञानममोहलं च" भगवंतांच्या शक्तीचा उल्लेख वारंवार भगवान करताहेत. स्मृती राहणं किंवा स्मृती आच्छादीत होऊन जाणं, मंद होणं हे सगळं आणखी माझ्या शक्तीचं कार्य आहे; हे भगवान मध्ये मध्ये दाखवतात परंतु त्याच्यावर आपला विश्वास बसत नाहीये. ईश्वराच्या शक्तीने बुद्धिमोह होणं शक्य आहे, बुद्धिमोह दूर होणंही शक्य आहे. ह्याची काहीच आपल्याला कल्पना नाही. केवळ 'आमची बुद्धी कार्यकारी आहे; आमच्या बुद्धीनं सगळी कार्य होऊ शकतात;' हा मात्र अहंकार जास्ती जास्ती वाढतो आहे, त्यामुळे बुद्धीची शक्ती किती मर्यादित आहे, हे सुद्धा कळत नाही. अमर्याद शक्ती मिळवली पाहिजे इकडंही लक्ष नाहीये. अशी आमची स्थिती झालेली आहे.

पुढे सहा सात वर्षांचे झाले राम–कृष्ण मग मात्र गाई घेऊन वनांत जायला लागले. इतके दिवस वासरांना घेऊन जात होते. आता गाई घेऊन वनात लांब लांब जायला लागले. एकदा गोपालकृष्ण लवकर उठले. सगळ्या मुलांना उठीवलं. आपल्या गाई, सगळ्या मित्रांच्या गाई घेऊन निघाले. बलरामांना काही सांगितले नाही. ते घरीच राहिले. उन्हाळ्याचे दिवस होते. यमुनेच्या डोहाचं पाणी ते गोपाल, सगळ्या गायींनी प्यायलं आणि एकदम सगळी मंडळी मरून पडली. त्या डोहामध्ये कालिया नावाचा नाग येऊन राहिला होता. पृथ्वीची जी रचना सांगितली आहे त्यात शेवटचे रमणक द्वीप सांगितलं आहे. ते नागांचं स्थान आहे. नागालय म्हणतात त्याला. हे आत्ताचे नागालय नाही हं! कोणची नावं कोणालाही देतो आम्ही सध्या. नागांचं आलय म्हणजे स्थान आहे. त्या रमणक द्विपामध्ये सगळे नाग राहातात. हा कालिया नागही तिथंच राहत होता. तिथल्या मंडळींना या नागाचा त्रास होऊ नये, भीती वाटू नये, म्हणून त्याला रोज अन्न बली द्यायचं ठरीवलं. माणसांना जशी नागांची भीती तशी नागांना गरुडांची भीती आहे. भीतीने सगळं जग भरलेलं आहे. आणि भीतीने चालतंय. भीती जर कमी झाली तर जग चालणार नाहीये.

तर तो कालिया नाग जरा अहंकारी होता. रागीट होता. तो म्हणाला, मला दिलेलं अन्न मी गरुडांना काय म्हणून देणार? तो गरुडाला दंश करायला गेला. गरुडाने थोडासा आपल्या पंखाचा तडाखा मारला त्याला. गरुडाच्या शक्तीपुढे नागाचं काय चालणार? तो नाग आपलं ते स्थान सोडून इथं यमुनेच्या डोहात येऊन राहिला. गरुड एक दिवस तिथे येऊन पाणी प्यायला, मासे वगैरे खायला लागला. त्या यमुनेच्या डोहामध्ये एक ऋषी तपश्चर्या करीत बसले होते. जलस्तंभन विद्या दुर्वास ऋषींनी पांडवांना, दुर्योधनालासुद्धा दिलेली होती. जलस्तंभन करुन पाण्यामध्ये दुर्योधन विश्रांती घेण्याकरता राहिला होता. अशी महाभारतामध्ये कथा आहे. या सगळ्या विद्या, सगळे प्रयोग, नाहीसे झालेत आता. सामान्य विद्या आहेत ह्या. त्यात काय विशेष? तर त्या डोहातल्या माशांच्या राजाला गरुडाने मारले. ऋषींना राग आला सगळे मासे दुःखित झाले. म्हणून ऋषींनी गरुडाला सांगितले, तू जर याच्यापुढे या ठिकाणी येऊन मासे खाशील, तर तुझा प्राण जाईल. त्या वेळेपासून गरुडाने तिथे येण्याचे सोडले.

यमुनेच्या डोहाजवळ गरुड येऊ शकत नाही, हे फक्त कालिया नागाला माहीत झालं होतं. म्हणून तो आपला सगळा परिवार घेऊन तिथं येऊन राहिला. सगळ्या नागांची वस्तीच तिथं झाली ना! आणि त्यामुळे ते पाणी विषारी झाले. त्या विषाच्या योगाने त्या पाण्यावरून आलेला वारा जरी कोणाच्या अंगावरून गेला तरी त्याचा प्राण जायचा. एवढे ते विषारी होते. तशी स्थिती आज झाली. सगळ्या गायी व मित्रमंडळी गतप्राण होऊन पडली. मग श्रीकृष्णांनी ठरीवलं आज या कालिया नागाला इथून हाकलून द्यायचं. त्या अगोदर त्यांनी सगळ्या गायी आणि गोपालांना जिवंत केलं. नंतर एका मोठ्या कदंब वृक्षावर चढून त्यांनी त्या डोहामध्ये उडी मारलेली आहे. केवढा नाग असेल वगैरे काही विचार मनामध्ये नाही. आत्मशक्तीवर पूर्ण विश्वास हेच ईश्वर शक्तीचं स्वरूप आहे. संदेह नाही कधी. माझ्या हातून होईल किंवा नाही असं म्हणणारी जी बुद्धी आहे ती जिवाची आहे. इथे तसा विचार कधीच येत नाही. संकल्प झाल्याबरोबर ते कार्य होणार आहे. हे ईश्वर शक्तीचं लक्षण आहे.

म्हणून संतांचा पूर्ण विश्वास त्यांच्यावर आहे. "ठेविले अनंते तैसेची राहावे" असं जे तुकाराम महाराज म्हणतायत, त्यात काही त्यांनी प्रारब्धवाद सांगितला असं समजण्याचं कारण नाही. त्या अनंताची शक्तीच अशी विलक्षण आहे. आमच्या कर्माप्रमाणे आमची योजना, व्यवस्था लावणारी ईश्वरशक्ती आहे. त्याने जशी व्यवस्था लावलेली असेल, त्याला मान्यता दिलीच पाहिजे. तिथे संप चालणार नाही. अतिरेकीपणा चालणार नाही. काही चालणार नाही.

उडी मारली. आणि ते हाताने पाण्यावर प्रहार करू लागले, तो नाग वरती आला पाहिजे म्हणून. आला तो नाग वरती. मोठ्ठा नाग आहे. एकशे एक फणा होत्या त्याला म्हणे. त्यांची मारामारी सुरू झाली. आणि शेवटी कृष्णांच्या सबंध शरीराला त्याने एकदम जखडून टाकले. गोकुळामध्ये अपशकुन व्हायला लागले. सगळे म्हणायला लागले, कृष्ण एकटाच गेलाय. बलराम इथंच गोकुळात राहिलाय. चला लवकर. काय संकट आलंय कृष्णावर कोणास ठाऊक. मग ती सगळी कृष्णांच्या पावलांच्या आधाराने मार्ग शोधीत शोधीत त्या डोहाच्या जवळ आलेली आहेत. आणि पाहताहेत तो कृष्णांच्या शरीराला सबंध वेढून टाकलेलं आहे. त्यांना अतिशय भीती वाटली. नंद, यशोदा म्हणाले, आता आपल्या डोळ्यादेखत याचा प्राण जाणार. मग आपण तरी जिवंत राहून काय करायचंय. त्याचे प्राण जायच्या आधी आपणच डोहात शिरून प्राण देऊ या. बलरामजी त्यांना म्हणाले, थोडं थांबा, पाहू या तरी आपण काय होतंय ते. कशी तरी त्यांची समजूत घातली. सगळी मंडळी अत्यंत भीतीग्रस्त झाली. इतक्यात भगवंतांनी आपलं शरीर थोडं फुगीवलं. त्याबरोबर तो नाग बाजूला झाला. ते फिरले. त्या बरोबर तो नागही फिरला. एकदम गोपालकृष्णांनी उडी मारली आणि त्याच्या फण्यावर जाऊन उभे राहिले. आणि त्या फण्यावर त्यांनी नृत्य करायला सुरुवात केली. गंधर्व वगैरे वाद्य घेऊन आले. ते वाद्य वाजताहेत आणि त्या वाद्याच्या तालावर ह्यांचं नृत्य चाललंय. परंतु कालिया नागाला मात्र ते सहन झाले नाही. संपूर्ण विश्व ज्याच्या उदरामध्ये आहे, त्या श्रीकृष्णांचा भार त्याला कसा सहन होईल? त्याने जी जी फणा वर करावी त्यावर लगेच ह्यांचा पाय पडावा. ती फणा खाली दाबली जावी. असे फिरतायत. एकशे एक फणांवरती सारखं त्यांचं नृत्य चाललंय. शेवटी त्या कालियाच्या मुखातून रक्तस्त्राव सुरू झाला. प्राण जायची वेळ आली. त्या कालियाची पत्नी आपल्या मुलांना घेऊन आली. आम्हाला सौभाग्यदान द्या, अशी तिने श्रीकृष्णांची प्रार्थना केली. मग श्रीकृष्णांनी त्याला पायाने बाजूला ढकलून दिलं.

तो सावध झाला. त्यानेही सांगितलं, देवा आमची सर्पाची जात स्वभावतःच रागीट. आणि ही सगळी तुमचीच सृष्टी आहे. तुम्हीच निर्माण केलेली आहे. क्षमा करा. गोपालकृष्णांनी त्याला सांगितलं, तुला ह्या स्थानात राहता येणार नाही. गायींना आणि माणसांना हे पाणी पिता आलं पाहिजे. आत्ताच्या आत्ता तू तुझ्या स्थानांत निघून जा रमणक द्विपामध्ये. आणि या पुढे तुला गरुडाची भीती राहणार नाही. माझ्या चरणांचं चिन्ह तुझ्या फण्यावर असल्यामुळे गरुडाने ते पाहिल्या बरोबर तुला तो सोडून देईल. मग तो नाग आपला सगळा परिवार घेऊन तिथून निघून गेलेला आहे. आणि तो यमुनेचा विषारी डोह शुद्ध झालेला आहे. हे मोठं कार्य केलेलं आहे. सगळ्या गोकुळातल्या मंडळींच्या देखत हे घडलं. एवढा मोठा कालिया नाग, पण त्यालासुद्धा श्रीकृष्णांनी तिथून घालवून दिलं. आपली शक्ती गुप्तही ठेवायची नाही, प्रगटही करायची नाही. दाखीवण्याकरता काही नाही. त्या त्या वेळेला गरजेप्रमाणे त्या शक्तीचं कार्य करून टाकायचं. खळांच दमन करायचं. सर्व मंडळींचा रात्रभर तिथं डोहाजवळ मुक्काम झाला आणि नंतर सगळी मंडळी गोकुळामध्ये परत गेलेली आहेत.

बलरामजी श्रीकृष्णांची शक्ती जाणत होते. ते स्वतःही शेषाचे अंशावतारच होते. अनंताचा अवतार असल्यामुळे श्रीकृष्ण म्हणजे खरे कोण आहेत हे त्यांना माहीत होतं. म्हणून तर त्यांनी सगळ्यांना थांबा आणि पहा, काय होते ते पाहू असं सांगितलं. म्हणून ते सगळे थांबले. आणि त्या वेळेपासून ह्या शक्तीची जाणीव झाली. पण ती जाणीव नेहमी राहत होती की नाही कुणास ठाऊक! प्रत्येक वेळेला ईश्वरशक्तीची जाणीव राहणं हीच खरी स्थिर बुद्धी आहे. पुष्कळ कार्य आपल्या बुद्धिशक्तीच्या बाहेरची घडून येतात. त्या त्या वेळेला ईश्वराने केलं म्हणून तर वाचलो मी, ईश्वराने आपलं संरक्षण केलं, सगळं मानतो आपण. प्रार्थना करतो. ईश्वराची पूजा करतो. परंतु पुन्हा काही असं कार्य घडलं म्हणजे माझ्या बुद्धीनं झालं, आम्ही केलं, असं म्हणायची आमची तयारी आहे. हा स्वभाव काही बदलत नाही. ज्या ज्या घटना घडत असतील त्या सगळ्याही ईश्वराच्या इच्छेने घडताहेत, असं

नेहमी म्हंटलं पाहिजे. दैवीशक्तिसंपन्न, दैवीसंपत्तिसंपन्न भगवत् भक्त महात्मे जे आहेत त्यांना, घडणाऱ्या सगळ्या घटना ईश्वराच्या शक्तीनं घडताहेत, याची नेहमी जाणीव असते. म्हणून ते निश्चिंत असतात. संसाराची काळजी त्यांना नसते ना! आम्हाला संसाराची काळजी वाटती. आमच्या मुलांचं कसं होईल? आमच्या ह्याचं कसं होईल? हे जे वाटतंय, ही काळजी वाटतीय, याचा अर्थ ईश्वरशक्ती वरती आमचा पूर्ण विश्वास नाही. काही काही वेळेपुरता बसतो पुन्हा कमी कमी होत जातो. अशा रीतीने हे कार्य आणखी चालू आहे.

पुढे कात्यायनी व्रताची एक कथा सांगतायत. सगळ्या गोपकन्या पहाटे अगदी लवकर उठून नदीवर स्नानाला जात होत्या. मार्गशीर्ष महिन्यामध्ये ते व्रत करतात. विदर्भात गुलाबराव महाराज म्हणून जे होऊन गेले ते कात्यायनी व्रत करत होते. गोपीभाव धारण करून राहत होते. आपण एक गोपी आहोत; ह्याच भावनेने ध्यान करायचं आणि कृष्णाची पूजा करायची. त्या तर प्रत्यक्षच गोपी होत्या त्या कात्यायनी देवीची त्यांनी पूजा करावी आणि नंद गोपाचा पुत्र आम्हाला पती म्हणून प्राप्त व्हावा असे आशीर्वाद त्या देवीजवळ मागावेत. एके दिवशी गोपालकृष्ण तिथे आले. त्या गोपींची सगळी वस्त्र त्यांनी गोळा केली आणि ते झाडावर जाऊन बसले. थंडीचे दिवस. पाण्यातून त्या गोपी त्यांना सांगतायत, "आमची वस्त्र आम्हाला द्या नाही तर आम्ही नंदराजाला जाऊन सांगू. आम्ही तुमच्या दासी आहोत तुम्ही सांगाल तसं ऐकायला आम्ही तयार आहोत."

मग गोपालकृष्ण म्हणाले, "माझी आज्ञा तुम्हाला मान्य असेल तर तुमची ही वस्त्र घेऊन जावा. अशा अपरात्री इथं येणं चांगलं नाही. आणि वस्त्र विरहित स्नान करणं तर शास्त्राच्या विरुद्ध आहे. तुमचं जे व्रत आहे ते समजावून घेऊन त्याप्रमाणे वागत चला. अशा अपरात्री कोण राक्षस कोणत्या वेळेला येईल सांगता येत नाही." त्या सर्वही गोपकन्यांची श्रीकृष्णांबरोबर रासक्रीडा करावी अशी इच्छा होती. गुजराथमध्ये हा खेळ टिपऱ्या वगैरे घेऊन खेळतात. गोपालकृष्णांनी सांगितलं, "बरं! काही हरकत नाही, योग्य वेळेला करू म्हणाले." कामेच्छा! भावना कशी आहे? इंद्रियांचा, मनाचा निग्रह कसा आहे? हेही त्यांना त्या रुपाने दाखवायचंय.

नंतर एके दिवशी दुपारी श्रीकृष्ण आणि त्यांची मित्रमंडळी गायी घेऊन गोकुळापासून बरीच दूर गेली. दुपारची वेळ झाल्यावर त्यांना भूक लागली. त्यांनी रामकृष्णांना सांगितलं, "अतिशय भूक लागली आहे, जेवायची खायची काही तरी व्यवस्था करा." तिथे जवळच ऋषींचा एक आश्रम होता. तिथे काही यज्ञ वगैरे चालला होता. गोपालकृष्णांनी सांगितलं, "मित्रांनो!, तुम्ही त्या ऋषींच्या यज्ञमंडपात जाऊन माझं, रामाचं नांव सांगा आणि त्यांच्या जवळ अन्न मागा. तुम्हाला अन्न मिळेल." ते सगळे गोपाल आले बिचारे. सगळ्या ऋषिमंडळींना नमस्कार केला. "इथून जवळच, राम–कृष्ण आलेले आहेत. आम्ही त्यांची मित्र मंडळी आहोत. आम्हाला भूक लागली आहे काही तरी अन्न द्या." असं म्हणाली. गवळ्यांची मुले अन्न मागायला यावीत; काय आश्चर्य आहे! त्या ऋषिमंडळींना काय वाटलं कुणास ठाऊक. त्यांनी ह्या गोपालांबरोबर भाषण सुद्धा केलं नाही. निराश झाले गोपाल. परत आले. सांगितलं – रामकृष्णांना, "बोलायला सुद्धा तयार नाही, तर अन्न काय देणार?"

रामकृष्ण म्हणाले, "बरं जाऊ दे. तुम्हाला दुसरी युक्ती सांगतो. यज्ञमंडपाच्या पाठीमागे पत्निमंडप असतो. तिथे ज्या स्त्रिया असतील त्यांना माझं नांव सांगा, तुम्हाला निश्चित अन्न मिळेल." त्याप्रमाणे ते गोपाल आले. "विप्रपत्नींना आमचा नमस्कार असो! रामकृष्ण जवळ आलेले आहेत. त्यांना अतिशय भूक लागलेली आहे. म्हणून अन्न मागण्याकरता आपल्याकडे त्यांनी आम्हाला पाठीवलेलं आहे." ऐकलं त्या स्त्रियांनी. गोकुळातल्या गोपी मथुरेला जाताना त्या ऋषींच्या आश्रमात थांबायच्या. ऋषिपत्नींना काय दूध, दही वगैरे द्यायचं आणि गोपालकृष्णांच्या लीला त्यांना सांगायच्या. "आज अमुक राक्षसाचा नाश केला. कालियाचं दमन झालं. वगैरे!" त्या ऋषिपत्नींनासुद्धा श्रीकृष्णांना पाहायची उत्कंठा लागली होती. आपल्याला गोपालकृष्णांचे दर्शन कधी होईल? याची त्या वाट पाहत होत्या. आणि आता गोपाल सांगत आले की "रामकृष्ण इथे जवळच आलेत. त्यांना भूक लागली आहे." ह्या ऋषिपत्नी सगळ्या उठल्या, पात्रात अन्न भरून घेतलं आणि रामकृष्णांच्या दर्शनाकरता निघाल्या. आता तिथं यज्ञ चाललेला आहे. यज्ञामध्ये आणखी पत्नी जवळ पाहिजे ना! कोणच्या वेळेला काय लागेल याचा नेम नाही. पण त्या स्त्रियांनी त्या कर्माकडेही लक्ष दिलं नाही.

धर्माचासुद्धा जर अभिमान उत्पन्न झालेला असेल तर खरी भक्ती उत्पन्न होत नाही. खरी भक्ती उत्पन्न झाल्यावर धर्माचाही अभिमान कमी होतो. कमी–जास्ती तो परमात्मा पाहून घेईल म्हणतात. प्रत्यक्ष यज्ञ ज्याच्याकरता दर्शनाकरता करता करताय, तो भगवान स्वतः इथे आला असताना यज्ञयाग कसले करत बसलात? म्हणाल्या. त्यांनी कुणाचंही ऐकलं नाही. त्यांना गोपालकृष्णांच दर्शन झालं. आनंद झालेला आहे. मग गोपालकृष्णांनी त्यांना सांगितलं, तुमची ऋषिमंडळी यज्ञ करताहेत, तिथे तुम्ही लवकर परत जा. तुम्हाला हाक मारल्यावर तुम्ही जागेवर नसलात तर त्यांचा यज्ञ कसा होईल? आणि तिथं घरात बसून माझं चिंतन करा. जास्त निकटच सान्निध्य असल्यानंतर प्रेम टिकत नाही असा सिद्धान्त आहे. म्हणून प्रेम टिकवण्याकरता दूर राहिलं पाहिजे. सगळ्या गोपींना दूर मुद्दाम ठेवलंय भगवंतांनी. समर्थांनी कल्याण स्वामींना अगोदरच डोंगरावर पाठवून दिलं. तू तिथं जाऊन रहा म्हणाले. केवढा शिष्य केवढा त्यागी भक्त आहे. पण नाही त्याला बाजूला ठेवलं. अंतःकरणामध्ये अखंड स्मरण राहण्याकरता दूर राहिलं पाहिजे, म्हणून त्यांनी सांगितलं. तसंच ह्या सगळ्याही ऋषिपत्नींना श्रीकृष्णांनी सांगितलं. त्यांनाही पाठवून दिलं. त्या म्हणाल्या, आम्हाला घरात घेतलं नाही तर? भगवान म्हणाले, "काही नाही. कोणीही रागावणार नाही. जा तुम्ही." त्याप्रमाणे घडून आलेलं आहे. यज्ञ पार पडला त्या ऋषींचा. रामकृष्णांनीही सर्व गोपालांना जेवू घातलं. आपणही जेवण केलं आणि मग तिथून निघून गेले.

आणि त्या ऋषिमंडळींना नंतर पश्चात्ताप झाला. गोपालकृष्णांच्या लीला त्यांच्या कानावर गेलेल्या होत्या. निदान येऊन पाहायचं तरी होतं कोण आहेत गोपालकृष्ण? ज्ञानसंपन्न मंडळी आहेत ना! वेदशास्त्राचा सगळा अभ्यास केलेला आहे. विवेकसंपन्न बुद्धी वापरून जर त्यांनी प्रयत्न केला असता तर कृष्णांच ज्ञान त्यांना झालं असतं. पण उपेक्षाच त्यांनी केली. आणि नंतर पश्चात्ताप करण्याची पाळी त्यांच्यावर आली. ऋषिपत्नींना दर्शन झालेलं आहे, त्यांच्या बरोबर संभाषण झाले. ते ऋषी म्हणाले, "आम्ही इतका अभ्यास करून इतकं ज्ञान मिळवून काही उपयोग नाही. त्या अधोक्षजापासून आम्ही विन्मुख झालो; पराङ्मुख झालो. आणि ह्या आमच्या स्त्रिया किती श्रेष्ठ आहेत. काही संस्कार नाहीत, अध्ययन नाही, काही नाही. तरी सुद्धा ह्यांच्या अंतःकरणामध्ये नैसर्गिक ईश्वरभक्ती उत्पन्न झालेली आहे. स्वाभाविक आहे म्हणा. कधीतरी ह्यांच्या संगतीने आमचा उद्धार देवाला करायचा असेल तर करू दे."

एकदा वाटलं त्यांना की आपण जाऊया गोकुळामध्ये, जाऊनच दर्शन करून येऊ. परंतु कंसाची मूर्ती त्यांच्या दृष्टीसमोर उभी राहिली. कदाचित कंसाला जर समजलं की ह्या ऋषींचा संबंध कृष्णाशी आहे तर आमचं आश्रम काही राहणार नाही; जाळून टाकेल म्हणाले. म्हणजे अजून संसारवासना आहे. सगळी संसारवासना टाकून त्या ऋषिपत्नी गेल्यामुळे त्यांच्यावर कृपा झालेली आहे, भगवंतांची. हे ऋषी जरी मोठे होते तरी अहंकारामध्येच–राहिल्यामुळे त्यांना श्रीकृष्ण दर्शन झालेले नाही.

अद्यापि बालचरित्रच चालू आहे. भगवान मथुरेमध्ये राहायला आल्यानंतर पुढचं प्रौढ चरित्र झालंय.

तशीच समाधीअवस्था आहे. कर्म म्हणून जी आहेत, ती सगळीही कर्म समाधीलाही प्रतिबंधक आहेत. पूर्ण समाधीअवस्था ज्याला मिळालेली आहे, सातव्या भूमिकेवरती जो गेला आहे, त्याला कधीही व्युत्थान नाही. तो एक महात्मा आहे. त्याचं मन समाधीअवस्थेतून कधीही बाहेर येत नाही. बाहेरची संवेदना, दुःखाचा काही संबंध नाही, काही नाही. तर अशा साधनांनी दुःखशांती कायमची होऊ शकत नाही. त्या करता जन्म संपला पाहिजे. नवीन देहाचा संबंध म्हणजे जन्म आहे. आणि धारण केलेल्या देहाचा संबंध सुटणं म्हणजे मृत्यू आहे. ही जन्म–मृत्यूची व्याख्या आहे.

नवीन देहाचा संबंध सुरू झाल्याबरोबर सगळीच सुख–दुःख सुरू झाली. तहान आणि भूक हे पहिले दुःख आहे. लहान मूल जन्माला आल्यानंतर त्याला तहान भूक लागतेच आहे. बाकीचीही पुष्कळ दुःख आहेत. तर देहाचा संबंधच जर आपल्याला आला नाही, तर देहाच्या संबंधामुळे उत्पन्न होणारी दुःखही संपून जातील. पण आपला जो देहाचा संबंध येतो, त्याला कारण काय आहे? शास्त्रकारांनी ह्याचा विचार केलेला आहे. आपण केलेल्या पूर्वकर्मांचं फल भोगण्याकरता देह धारण करावा लागतो. म्हणजे पुन्हा जन्म घ्यावा लागतो. जर पुन्हा जन्म नको असेल, तर कर्म संपली पाहिजेत. पण कर्म संपवणे अतिशय कठीण आहे. कर्मांचा इतका संचय कितीतरी जन्मामध्ये झालेला आहे, की त्याचा क्षय होणे फार कठीण आहे. शिवाय नवीन नवीन क्रियमाण कर्म आपल्या हातून होतात आणि तो संचय वाढतच जातो. ती सगळी कर्म संपल्याशिवाय कर्मांचा फल म्हणून येणारा नवीन जन्म हा बंद होणं शक्य नाही. ह्यासाठी जे उपाय आहेत, त्यांचं आचरण करणं हे अतिशय कठीण आहे.

भगवान सांगतात, "मी कसा आहे? अज आहे आणि अव्यय आहे." जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. ही ईश्वरस्वरुपाची स्थिती आहे. जिवाला मात्र जन्मही आहे आणि मृत्यूही आहे. किती जन्म आहेत? आणि किती मृत्यू आहेत? याची गणना करता येणार नाही. किती कर्म आहेत? याची संख्या गणना जशी करता येणार नाही, तशी कर्मफल म्हणून जन्म आणि मृत्यू यांचीही संख्या मोजता येणार नाही. तेव्हा ह्या द्वंद्वामध्ये सापडलेला जिवात्मा आहे आणि ज्याला या द्वंद्वाचा काहीच संबंध नाही; असा परमात्मा आहे. ह्या परमात्म्याचा श्रीकृष्ण हा अवतार झालेला आहे. ह्या अवतारामध्ये झालेली जी चरित्र आहेत, ती वेदव्यासांसारख्यांनी मुद्दाम सर्व जिवांची बुद्धी शुद्ध व्हावी, त्यांच्या बुद्धीची योग्यता वाढावी, म्हणून लिहून ठेवली आहेत. शुकाचार्य महाराजांनी त्याचा अभ्यास केलेला आहे आणि त्याचं अखंड चिंतन चालू ठेवलं आहे. त्यांचं या अठरा हजार श्लोकांचं चिंतनपूर्वक अखंड पठण चाललेलं आहे म्हणतात.

परिक्षित राजासारखा अधिकारी श्रोता त्यांना भेटलेला आहे. सर्व गोपींची इच्छा आहे की भगवान गोपालकृष्णांबरोबर रासक्रीडा करावी. श्रीकृष्णांच्याबद्दल त्यांच्या मनामध्ये प्रेम आणि आदरबुद्धी आहे. आता ती ज्ञानपूर्वक आहे, की याचा विचार सर्वांना नाहीये. त्यांनी केलेली स्तुती जेव्हा आपण वाचू, त्यावेळेला आपल्याला समजतं की त्यांना कृष्ण म्हणजे खरा कोण आहे? ह्याचं ज्ञान होतं. आणि त्या ज्ञानपूर्वक प्रेम करत होत्या हे त्यावरून सिद्ध होतं. तर हे अद्भुत चरित्र शुकाचार्यमहाराज सांगायला सुरुवात करताहेत.

प्रवृत्ती आणि निवृत्ती हे जे सर्व कार्य चाललेलं आहे, ही मायाशक्ती आहे. सर्वही विषयांकडे प्रवृत्ती आणि सर्वही विषयांपासून निवृत्ती असे दोन विभाग झाले. प्रवृत्ती असतानासुद्धा आणखी अंतःनिवृत्ती – बाह्य दिसणारी जरी प्रवृत्ती असली तरी अंतःकरणामध्ये निवृत्ती असू शकते. हाही एक मार्ग आहे. ही स्थिती गुणातीत बुद्धी ज्यांची झालेली आहे, अशांनाच साध्य होऊ शकते. म्हणून जरी बाह्यतः प्रवृत्ती दिसली तरी आत मात्र निवृत्ती कायम आहे. असंही आपल्याला दिसून येतं. श्रीकृष्णांनी योगमायेचा आश्रय करून हे चरित्र करायचं ठरीवलं. शरद ऋतूतल्या पौर्णिमेच्या दिवशी रात्रीच्या वेळेस भगवान यमुनातीरावर गेले. आणि गायन करायला आरंभ केला. गायनकला, वेणुवादन कला, ही विलक्षण त्यांच्याजवळ होती. कालियाचं दमन वर्णन करताना त्यांच्या नृत्यकलेचंही वर्णन केललं आहे. त्यावेळी सगळे गंधर्वादि मृदंग वाजवत होते आणि ह्यांचं नृत्य चालू होतं म्हणतात. तर ह्या सर्व विद्या, कला, त्यांची प्रवृत्ती ज्याच्यापासून प्रगट झाली आहे, त्याना शिक्षण वगैरे घेण्याची आवश्यकता नाही.

सर्वज्ञ असू शकतो की नाही? हा मोठा वाद आहे. पूर्वीपासून आहे. मीमांसाकारांनी ईश्वराला असा प्रत्यक्ष निषेध केलेला नाही. पण जगामध्ये सर्वज्ञ कोणीही असू शकत नाही; ज्ञान हे एकापेक्षा एक जास्त आहे. म्हणून पूर्णज्ञानी, सर्वज्ञानी अशाप्रकारचा कोणी संभवनीय नाही, एवढंच त्यांनी सांगितलेलं आहे. अर्थात ईश्वर हा सर्वज्ञ आहे असे जे कोणी मानतात, तो ह्यांच्या दृष्टीने सर्वज्ञ नसतो असं ह्यांनी मुद्दाम मांडलंय. त्याचं कारण, हेतू हा की वेद हे स्वतः प्रमाण आहेत. वेदांचं प्रामाण्य, ईश्वराने वेद व्यक्त केले म्हणून ईश्वर सर्वज्ञ आहे. त्या सर्वज्ञाने वेदांचा उपदेश केला म्हणून वेद प्रमाण आहेत. असे नैय्यायिक, न्यायशास्त्रकार मानतात. सर्वज्ञाने केलेलं शास्त्र किंवा वेद हे प्रमाण आहे, तर सर्वज्ञाने केलेलं दुसरं प्रमाण का होऊ नये? बुद्धसुद्धा सर्वज्ञ आहे, असं त्याचे अनुयायी सांगतात. म्हणून मीमांसाकारांनी हा एक निराळा मार्ग दाखीवला आहे. युक्तिपूर्वक आहे. युक्तिवादाने वेदांचं स्वतःचं प्रामाण्य आहे, इतरांवर त्यांचं प्रामाण्य अवलंबून नाही. हा त्यांचा हेतू आहे. ईश्वराचं सर्वज्ञत्व इतर पुष्कळ श्रुतीवाक्यांवरुनही सिद्ध होतंय. शब्दप्रमाणाने. ज्या प्रमाणाने ईश्वराचं अस्तित्व सिद्ध होतं, त्याच प्रमाणाने तो सर्वज्ञ व शक्तिसंपन्न आहे. हे ही सिद्ध होतं. हे ही त्याच प्रमाणाने सिद्ध होतंय. तर परमेश्वराला सर्व योगशास्त्र, योगप्रक्रिया माहिती आहे. प्रवृत्ती दाखवायची आहे. रासलीला ही बाह्यप्रवृत्ती आहे. ह्या बाह्यप्रवृत्तीनेसुद्धा आणखी गोपींच्या मनाचं समाधान होणार आहे. त्यातही वृत्तीशास्त्रकारांनी पुष्कळ विचार केलेला आहे. गोपी या मूळ कोण होत्या? एकाच जन्मामध्ये सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळू शकत नाहीत. मागं काही नाही, पुढंही काही नाही. त्यालाही आचार्य वगैरेंनी पुष्कळ उत्तरे दिली आहेत. तर हे सर्व ज्ञान, सर्व शक्ती भगवंतांची आहे. त्यामुळे आपल्या योगमायेचा आश्रय करून संपूर्ण सृष्टी ज्याने निर्माण केली, त्या योगमायाशक्तीचा आश्रय करून ही रासक्रीडा करायचं भगवंतांनी ठरीवलं आहे. परिक्षित राजाला संपूर्ण कृष्णचरित्र सांगताना हेही त्यांना सांगावं लागलं.

यमुनातीरावर भगवंतांचं गायन सुरू झालं. सगळ्या गोपांच्या कानावर तो ध्वनी गेलेला आहे. आणि त्यांचं अंतःकरण आकर्षित झालं. सर्वही गोपी आपापले उद्योग सोडून नदीतीरावर आलेल्या आहेत. कोणी गायीचे दूध काढत होत्या, कोणी स्वयंपाक करत होत्या, कोणी वाढत होत्या. सगळे काम–धाम सोडून त्यांचं अंतःकरण कृष्णाकडे गेलेलं आहे. त्या रात्रीच्यावेळीसुध्दा आपलं काम–धाम सोडून त्या नदीतीरावर आल्या. श्रीकृष्णांना त्या गोपींची वृत्ती काय आहे पाहायचंय. पूर्वी कात्यायनी व्रताच्या वेळी त्यांनी आपला अभिप्राय गोपींना सांगितला होता. गोपींनी रासक्रीडेची इच्छा सांगितली होती. श्रीकृष्णांनीही त्यांना त्या वेळी आश्वासन दिलं होतं. तरीही आत्ता त्यांनी गोपींना विचारलं, "घरदार सोडून अशा अपरात्री या ठिकाणी कशा आलात? तुमच्या घरी शोधाशोध चालू असेल. असं रात्री बाहेर जाणं चांगलं नाही. हा स्त्रियांचा धर्म नाही. वगैरे सगळा त्यांना उपदेश केला."

परंतु त्या गोपींनी सांगितलं की, "संसारामध्ये आमचं अंतःकरण नाही. आपण गोकुळमध्ये राहायला आल्यापासून संसार आमच्या मनातून गेलेला आहे. बाह्यदृष्टीने आम्ही सांसारिक कर्तव्यकर्म करतो, तो सोडलेला नाही, परंतु आपल्या सान्निध्यात येऊन सेवा करावी, क्रीडा करावी, अशा इच्छेने आम्ही आलेलो आहोत. असा त्या गोपींनी आपला अभिप्राय सांगितला. मग पुष्कळ वेळ रासक्रीडा झाली म्हणतात. त्यातही त्यांच्या मनामध्ये किंचित अहंकार उत्पन्न झाला. एकंदर सर्व स्त्रियांमध्ये आपणच श्रेष्ठ आहोत, असं त्यांना वाटायला लागलं. भगवान गोपालकृष्ण आपल्या इच्छेप्रमाणे रासक्रीडा करताहेत.

गोपालकृष्णांना हे समजताच ते एकदम अदृश्य झाले. पण गोपींच्या मनामध्ये जे प्रेम आहे, ते निस्सीम आहे, ते सहेतुक नाहीये. शुकाचार्य महाराजांनी असा एक सिद्धान्त सांगितला आहे की ज्या साधनाभ्यासाने भगवंताविषयी अंतःकरणामध्ये भक्ती उत्पन्न होईल, ते साधन श्रेष्ठ आहे. तर भक्ती म्हणजे कशी पाहिजे? – अहेतुकी आणि अप्रतिहत. ही दोन विशेषणे सांगितली आहेत. निर्हेतुक भक्ती पाहिजे. व्यवहारामध्ये दिसून येणार प्रेम हे निर्हेतुक नाहीये. एखादा कोणी असला तर असेल महात्मा. उच्च कोटीवर गेलेला जो महात्मा आहे त्याला काहीच हेतू मनात नाहीये. सर्व संकल्प संन्यासी अशी ज्याने भूमिका मिळीवलीये, तो भगवंताची कशाला सकाम भक्ती करेल? भगवंताचं सामर्थ्य जाणून तो भक्ती करीत असतो.

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ।
भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ।। ९.१३ ।।

हे भगवान सांगताहेत, दैवी प्रकृती ज्याला मिळालेली आहे, त्याच्या मनामध्ये ईश्वरावाचून दुसरं काहीही नाहीये. "अनन्य मनसः" हे महत्त्वाचे विशेषण आहे. त्यांच्या मनामध्ये ईश्वरावाचून दुसरे काहीही नाहीये. आणखी "ज्ञात्वाभूतादिमव्ययम्", पंचमहाभूतांची सगळी सृष्टी आहे, हे सगळेही मान्य करतात. परंतु त्या भुतांचाही 'तो' आदि आहे, हे त्यांनी जाणलेलं आहे. 'ओम् नमोजी आद्या' म्हणून ज्ञानेश्वरांनी हेच मांडलंय. सर्वांचा आद्य तो आहे. सर्वांचा हेतू तो आहे. त्याच्यापासून सर्व विश्व निर्माण झालेलं आहे. महात्मे जे आहेत, ते हे जाणून त्याची भक्ती करतात. सर्वांचा कारण तो आहे. त्याची शक्ती केवढी आहे? तो किती दयाळू आहे? हे सगळं जाणून ईश्वराची भक्ती करणारे दैवीप्रकृतीसंपन्न असे महात्मे असतात. तर निर्हेतुक भक्ती मनामध्ये उत्पन्न व्हायला पाहिजे. मनामध्ये देवाजवळ मागण्याकरता काहीही मागणं नाहीये. ईश्वराचं अखंड स्मरण होण्याकरता, राहण्याकरता सर्व आयुष्यभर त्यांचा प्रयत्न चाललेला आहे. आणि अप्रतिहत भक्ती हे एक म्हटलं आहे. काही दिवस उत्सवाच्या वेळेपुरतं आपण पुष्कळ उत्सव करतो, भजन करतो, सगळं चालतं. पण ती भक्ती अप्रतिहत नाहीये. पुन्हा वर्षानंतर उत्सव येईपर्यंत भक्ती घडते की नाही कोणास ठाऊक. स्मरणभक्ती सगळ्यात श्रेष्ठ आहे असे सांगतात. पण ते स्मरण निर्हेतुक आणि अप्रतिहत पाहिजे. मध्ये मध्ये त्यात खंड पडून उपयोगी नाही. अशी अखंड भक्ती ज्याच्या अंतःकरणात उत्पन्न झाली आहे, ती भक्तीची पराकाष्ठा म्हणून सांगतात.

गोपींच्या भक्तीचं वर्णन नारदांनी पराभक्ती म्हणून केलं आहे. त्यांच्या अंतःकरणामध्ये संसार नाहीये. संसारात राहूनसुद्धा. प्रवृत्ती असून निवृत्ती आहे. प्रवृत्ती असून निवृत्ती असू शकते याचं उदाहरण म्हणजे गोपिका आहेत. अंतःकरणामध्ये जी निवृत्ती आहे, ती ईश्वराच्या प्रेमामुळे, भक्तीमुळे उत्पन्न झालेली आहे. त्यांच्या अंतःकरणात अखंड गोपालकृष्णांचं प्रेम आहे. त्याच ते दिव्यरूप समोर आहे. त्याच्या लीला समोर आहेत. त्या लीलांचं चिंतन त्या करताहेत. त्यामुळे त्यांच्या अंतःकरणामध्ये अखंड स्मरणभक्ती आहे. पण तिथंही थोडासा अहंकार उत्पन्न झाल्याबरोबर देव अदृश्य झाले. झालं. गोपालकृष्णावरच्या विलक्षण प्रेमाने भारावलेल्या गोपी म्हणे प्रत्येक झाडाला विचारायला लागल्या – गोपालकृष्ण कुठे गेला माहिती आहे का तुला? कालिदासाने म्हटल्याप्रमाणे प्रेमाने भारावलेल्या मनात चेतन–अचेतन हा भेद राहत नाहीये. प्रेमाचा उन्माद त्यांच्या मनामध्ये उत्पन्न झालेला आहे. त्यामुळे कोणाला विचारावं आणि कोणाला विचारू नये हा तर्कभाव राहिलेला नाही. बराच वेळ पुष्कळ शोध करूनही गोपालकृष्ण कुठे दिसेनात. मग नदीतीरावर येऊन त्यांनी श्रीकृष्णांची पुष्कळ स्तुती केली. गोपीसुधा म्हणून ती प्रसिद्ध आहे. त्या गोपींनी केलेल्या स्तुतीचा वेदव्यास महर्षिंनी एक स्वतंत्र अध्याय घातला आहे. कृष्णांच फक्त बाह्यरूप पाहून त्यांच्यावर गोपींचं प्रेम होतं, असं दिसत नाही त्या स्तुतीवरून. त्या गोपींची प्रार्थना, स्तुती अशी आहे की, "हे गोपालकृष्णा, तू यशोदानंदन आहेस असं नाही. ब्रह्मदेवांच्या प्रार्थनेनुसार विश्वाच्या संरक्षणासाठी तू जन्म घेतला आहेस. म्हणजे गोपालकृष्ण काही यशोदा–नंदाचा सुंदर मुलगा एवढीच कल्पना गोपींची नाहीये. गोपालकृष्णाच्या ईश्वरी स्वरुपाचं ज्ञान त्यांना आहे. त्यांची ज्ञानपूर्वक भक्ती आहे. ज्ञानोत्तर भक्ती किंवा ज्ञानसमकाल भक्ती असंही म्हणता येईल. ज्ञानोत्तर का म्हणायचं? तर त्यांना ईश्वरस्वरुपाचं ज्ञान असून त्या भक्ती, प्रेम करताहेत. त्या प्रेमामुळे ईश्वरस्वरुपाचं ज्ञान, ईश्वरभक्ती आणि पूर्ण प्रेम अंतःकरणात असल्याने तिथे संसार राहीलच कशाला? महात्मे भजन करीत असताना अनन्य मनसः होऊन भजन करतात. हे विशेष महत्त्वाचे आहे. अनन्य मनसः झाल्याशिवाय अप्रतिहत भक्ती, निर्हेतुक भक्ती होऊच शकत नाही. बाह्य विषयाकडे, संसाराकडे जर मन असेल, तर तो हेतू मनामध्ये येणारच आणि त्या करता आपण काही तरी करा अशी मागणी केली जाणार. "हेची दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा" अशी तुकाराम महाराजांप्रमाणे मागणी अन्य ठिकाणी मन असेपर्यंत शक्य नाही. निर्हेतुक भक्ती होणे शक्य नाही. तेव्हा गोपींची भक्ती, प्रेम, हे निर्हेतुक आहे. त्यामुळे शुकाचार्य महाराजांसारख्या ब्रह्मज्ञानी, विरक्त महात्मेसुद्धा गोपींच्या ज्ञानपूर्वक भक्तीचं वर्णन करतात. गोपींना पुष्कळ दुःख झाल्यानंतर भगवान प्रगट झालेले आहेत. मग त्यांची रासक्रीडा झाली.

मग नदीतीरावर येऊन बसल्यानंतर त्या गोपी कृष्णांना उद्देशून म्हणाल्या, जगामध्ये दुसऱ्याने प्रेम

केलं तर आपण प्रेम करणारा एक वर्ग आहे. दुसरा वर्ग म्हणजे दुसरा आपल्यावर प्रेम करो अगर न करो आपण त्याच्यावर प्रेम करणाऱ्यांचा. त्याच्या उपयोगी पडणाऱ्यांचा. तिसरा वर्ग यांच्यापेक्षा विलक्षण आहे. आपल्यावर कोणी प्रेम करो अगर न करो; लक्षच द्यायचं नाही. जगाकडे लक्ष न देता उपेक्षा वृत्तीने राहणाऱ्यांचा. गोपालकृष्णांनी हे ऐकून त्याचा आणखी थोडा खुलासा केला. ते म्हणाले, परस्पर प्रेम करणारी मंडळी दोघेही स्वार्थी आहेत. त्याने प्रेम केलं तर आपण प्रेम करायचं, तो उपयोगी पडला तर आपण उपयोगी पडायचं, यात कोणाचंच शुद्ध प्रेम नाही. दुसरा आपल्यावर प्रेम करो अगर न करो उपयोगी पडो अगर न पडो आपण आपलं प्रेम करायचं, उपयोगी पडायचं कर्तव्य करायचं अशी मातापित्यांसारखी मंडळी आहेत. ह्यांचं प्रेम निर्हेतुक आहे. संत महात्म्यांचं प्रेम दुसऱ्याने आपल्यावर प्रेम करो अगर न करो तिकडे लक्ष न देणाऱ्यांसारखं असतं. आत्मसमाधीमध्ये निमग्न लोक आहेत, त्यांचं कुठेही लक्ष नाहीये. त्या आनंद समाधीमध्येच ते निमग्न आहेत. आत्मकाम जे आहेत, मुमूक्षु, यांचंही जगाकडे लक्ष नाही. सगळं टाकल्याशिवाय आणि पूर्ण विचार, श्रवण, मनन, निदिध्यासन आपल्याकडून होणार नाही म्हणून पूर्ण वैराग्यसंपन्न होऊन त्या मार्गाकडे जातात. त्यांचंही कुणाकडे लक्ष नाही. आणखी नेहमी क्रूर कर्म करणारे खाटीक वगैरे म्हणा, किंवा अकृतज्ञ अशा प्रकारचे कृतघ्न ते ही कोणाकडे लक्ष देत नाहीत. यांच्यापैकी कोणच्या वर्गात मला तुम्ही घातलं आहे? असा प्रश्न गोपालकृष्णांनी त्या गोपींना विचारला. ते पुढे म्हणाले, मी काही आत्माराम नाही, आत्मकाम नाही, गुणद्रोही नाही, कृतघ्न नाही, काही नाही. तुमच्या अंतःकरणामध्ये जे काही निरपेक्ष प्रेम आहे, ते प्रेम कसं आहे? हे सगळं गुप्तरुपाने पाहिलं आहे. म्हणून मी तुमचा उतराई होऊ शकत नाही. संसारबंधन, शृंखला सोडून द्यायचं म्हणजे घरदार सोडायचं नाहीये. बाहेरची सगळी प्रवृत्ती कायम ठेवून संसार सोडणाऱ्या तुम्ही आहात. तुमच्या अंतःकरणात मात्र निवृत्ती असल्यामुळे जे शुद्ध प्रेम आहे, त्या प्रेमाचा मी उतराई होऊ शकत नाही. तुमच्या प्रेमाची आणखी माझ्यावर परतफेड करण्याची वेळ येऊ नये. म्हणून जे रामचंद्रांनी मारुतिरायांना सांगितलं प्रत्युपकारासंबंधी, तेच गोपालकृष्णांनीही ह्या गोपींना सांगून त्यांचं समाधान केलं. असं हे रासक्रीडेचं चरित्र शुकाचार्य महाराजांनी परिक्षित राजाला सांगितलं.

या पुढची हकीकत अशी आहे की, परिक्षित राजानेच शुकाचार्य महाराजांना प्रश्न विचारला आहे. आपल्यासारख्या ज्यांना हे रासक्रीडेचं रहस्य समजत नाही ते तर प्रश्न विचारतीलच, परंतु इथे प्रत्यक्ष परिक्षित राजा विचारतो, गोपालकृष्ण हा परमेश्वराचा अवतार झालेला आहे. परमेश्वराचा अवतार हा धर्मसंरक्षणासाठी असतो. असं असताना हे जे रासक्रीडेचे कर्म झालं ते धर्म की अधर्म? त्याने आपली स्पष्ट शंका विचारली. गोपी या सगळ्या परस्त्रिया आहेत. त्यांच्याबरोबर रात्रीच्या वेळी रासक्रीडा त्यांनी केली. हे काय झालं? याचं रहस्य काय?

शुकाचार्य महाराज म्हणाले, तुझ्या मनामध्ये अश्रद्धा निर्माण झालेली आहे. त्यांच्याकडून हे जे कर्म झालं याचं कर्तृत्व त्यांच्याकडे आहे की नाही? हा एक विचार आहे. ज्ञानी पुरुषांची वृत्ती कशी असते हे तुला आरंभालाच सांगितलं आहे. त्या भूमिकेवर राहणारे जे महात्मे आहेत, त्यांची अंतःनिवृत्ती पूर्ण राहून बाहेर प्रवृत्ती झालेली आहे. त्या कर्मामुळे ते सदोष होतात की काय? हा एक प्रश्न आहे. दुसऱ्या लोकांना काही दोष लागण्याचा संभव आहे की काय? म्हणून त्यांनी चांगलं वागलं पाहिजे? हा एक आग्रह आहे. म्हणजे गुणातीत, द्वंद्वातीत अवस्थेला पोहोचलेल्या महात्म्याकडून प्रारब्धकर्मानुसार हा देह असेपर्यंत चांगली कर्म होतील. वाईटही कर्म होतील. परंतु चांगली कर्म होतील, वाईटही कर्म होतील, परंतु त्या कर्मांचा संबंध त्यांना होतो का?

व्यासमहर्षिंनी याच्याबद्दल खुलासा केलेला आहे. पूर्णज्ञान असलेल्या महात्म्यांना त्यांच्याकडून घडणाऱ्या क्रियमाण कर्मांचा संबंध पोहोचत नाही. ज्ञानामुळे पूर्वी होऊन गेलेल्या कर्मांचा विनाश झालेला असतो. ते जीवनमुक्त असल्याने त्यांच्याकडून कदाचित धर्मांचं अतिक्रमण झालेलं दिसलं तरी त्याचा दोष नाहीये. त्यांनी जे ज्ञानरुपी तप केलेलं असतं त्यामुळे त्यांचे पूर्वीचेही दोष गेलेले असतात व पुढचेही दोष त्यांना लागत नाहीत. श्रीकृष्णांचा आविर्भाव हा जगाच्या रक्षणाकरता झालेला आहे. सर्व गोपींच्या अंतःकरणात जी प्रेमवृत्ती आहे, तिला अनुसरून भगवंतांनी ही लीला केली आहे. परंतु त्या लीलेचा संबंध त्यांच्याशी नाही. श्रीकृष्णांच्या हातून मृत्यू आल्यामुळे शिशुपालांसारखे मुक्त होऊन गेले ना! शिशुपालाचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या शरीरातून एक दिव्य तेज बाहेर पडलं आणि ते

श्रीकृष्णांच्या शरीरात शिरले. तर शिशुपालांसारख्या द्वेष करणाऱ्याला जिथे श्रीकृष्णांनी मुक्त केले, मग इथे तर त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या गोपी आहेत. प्रेम हे माध्यम आहे. द्वेष हेही माध्यम आहे. ईश्वराची समदृष्टी असते, हे दाखीवण्याकरता त्यांनी शिशुपालाचे चरित्र वर्णन केले आहे. कंसाचं अंतःकरण भीतीमुळे श्रीकृष्णांकडे गेलेलं होतं तर श्रीकृष्णांच्या सौंदर्याच्या ठिकाणी गोपींचं अंतःकरण स्थिर झाल होत.

चित्ताची प्रथम एका स्वरुपाच्या ठिकाणी धारणा होणं, त्यानंतर त्या स्वरुपाचे होणारे ध्यान आणि मग समाधी असा क्रम योगशास्त्रकारांनी सांगितलेला आहे. त्या धारणेचा जो विषय आहे, ती धारणा जर अत्यंत शुद्ध स्वरुपाच्या ठिकाणी झालेली असेल तर त्या धारणेमुळे धारणा करणाऱ्याला दोष लागत नाही. कारण तो योगी, महात्मा हा द्वंद्वातीत अवस्थेला पोहोचलेला असतो. मग इथं तर प्रत्यक्ष ईश्वरच आहे. ज्याच्या भक्तीमुळे, स्मरणामुळे मोठ-मोठे ऋषिमुनी, राजे, भगवद्भक्त पापमुक्त झाले, जीवनमुक्त झाले. मग इथं तर स्वतः भगवंतांना तो दोष कसा लागेल?

मग त्या ऋषी (शुकाचार्यांनी) राजाला विचारले, "राजा!, तू वरील प्रश्न विचारलास. परंतु असा प्रश्न का विचारला नाहीस? की सगळ्या गोपी जेव्हा रासक्रीडेसाठी घर सोडून रात्रीच्या वेळेस नदीतीरावर आल्या तेव्हा सगळे गोपाल त्यांचा शोध घेण्यासाठी का आहे नाहीत? हाही प्रश्न आहे की नाही? विचारायला पाहिजे की नको? कृष्णांच्या आकर्षणामुळे सगळ्या गोपी घरातून निघून गेल्यानंतर गोपालांनी त्या कुठे गेल्या ते येऊन का पाहिलं नाही? आणि पाहिलं असलं तर त्यांना त्यांचा राग का आला नाही? हाही प्रश्न आहे.

त्याचही उत्तर त्यांनीच दिलंय – गोपालांना गोपी घरातच आहेत व आपापली कामे करताहेत. असंच जाणवलं. त्या घर सोडून बाहेर गेल्याचे जाणवलेच नाही, भगवंतांच्या योगमायाशक्तीमुळे.

परंतु गोपींच्या अंतःकरणात असलेली प्रेमाची जास्ती जास्ती वाढ व्हायला पाहिजे. गोपींना सोडून भगवान एकदा जे मथुरेमध्ये आले, ते पुन्हा गोकुळामध्ये गेले नाहीत. बलरामजी फक्त एकदा जाऊन आले. पण गोपालकृष्ण पुन्हा गेले नाहीत. शेवटी केव्हा तरी ग्रहणाच्या वेळी भेट झाली त्यांची. ज्ञानपूर्वक प्रेम होते त्या गोपींच्या अंतःकरणात.

शेवटी शुकाचार्य महाराज सांगतात, की या रासक्रीडेचे श्रद्धायुक्त अंतःकरणाने जो श्रवण किंवा वर्णन करतो, त्याच्या अंतःकरणामध्ये पराभक्ती उत्पन्न होते. कामवासनात्मक संस्कार आहेत, त्यांचा नाश होतो. अशी या रासक्रीडा चरित्राची फलश्रुती आहे.

शास्त्रकारांनी याचा पुष्कळ विचार केला आहे. आणखी यात प्रेम हे एक माध्यम आहे. असा विचार केला म्हणजे गोपींचा दोष नाही आणि परमेश्वराचा तर काहीच दोष नाही. श्रीकृष्णांचं सौंदर्य फक्त दिसतंय. या काममाध्यमातून या गोपींचं अंतःकरण तिकडे इतकं गेलंय की त्यामुळे अप्रतिहत भक्ती कायम राहिली आहे. शास्त्राचा विचार नाही, लोक काय म्हणतील हा विचार नाही, काही नाही. ज्ञानमिश्र भक्ती उपयोगी नाही, कर्ममिश्रही भक्ती उपयोगी नाही. केवल भक्ती म्हणून जे वर्णन केलेलं आहे, ती केवल भक्ती – उत्तम भक्ती, या भूमिकेवरती त्या गोपी होत्या. या दृष्टीने शुकाचार्य महाराजांनी या चरित्राचं वर्णन परिक्षित राजाला मुद्दाम केलं आहे.

शक्तिपात सांप्रदाय हा किती महत्वपूर्ण आहे! त्या सांप्रदायाचे जे सिद्ध पुरुष म्हणून जे आहेत, त्यांचा हा सांप्रदाय सर्व ठिकाणी नेण्यासाठी (सर्वत्र प्रसार करण्यासाठी) नित्य प्रयत्न चालू आहे. जिवांच्या कल्याणासाठी सतत प्रयत्न चालू आहे. अशा महापुरुषांमध्येच महाराजांची गणना होते.

तेव्हा सुरुवातीला परिक्षित राजाला श्रीकृष्ण हे दोषी आहेत; असं वाटलं तरी त्याचं समाधान शुकाचार्य महाराजांनी वेगळ्या पद्धतीने केले आहे. त्यांनी असा एक दृष्टान्त दिला आहे की लहान मुलगा प्रत्येक आरशामध्ये आपलं प्रतिबिंब पाहतो आहे. त्या प्रतिबिंबाबरोबर त्याचे खेळ चाललेत. इकडे तोंड करतो, हे करतो, ते करतो. लोकांना काय वाटतं, हा असं का करतो? प्रत्येक

प्रतिबिंबाबरोबर त्याचे खेळ चाललेले आहेत. तसं संपूर्ण विश्व हे ईश्वराचं प्रतिबिंब आहे. स्त्री असो, पुरुष असो, सगळेही जीव त्या ईश्वराचे प्रतिबिंब आहेत. या बुद्धीनं प्रतिबिंबाबरोबर खेळ चाललेला आहे. हा सुद्धा एक विचार पुष्कळ सांगितला जातो. तेव्हा संपूर्ण विश्व हे प्रतिबिंबरुप आहे. या भावनेने हा सिद्धान्त मांडून शास्त्रकारांनी याचं पुष्कळ समर्थन केलेलं आहे.

या नंतर अजून पुष्कळ कार्य व्हायचंय. गोकुळामध्ये येणारे जाणारे पुष्कळ राक्षस मारले श्रीकृष्णांनी. गोकुळाजवळ एक वन होते. त्या वनामध्ये धेनुकासूर म्हणून एक राक्षस राहत होता. त्याच्या भीतीमुळे पशू, मनुष्य कोणालाही तिकडून जाता येत नव्हतं. तो राक्षस आपल्या सैन्यासकट राहत होता. श्रीकृष्णांचे विलक्षण सामर्थ्य पाहून बाकीच्या गोपालांची खात्री पटली की श्रीकृष्णाच ह्या राक्षसाचा नाश करु शकेल. आणि त्या ठिकाणची फळं, फुलं, चारा वगैरे मिळेल आपल्याला. सहेतुक भक्ती वाटते आपल्याला, परंतु सख्य भक्तीच्या भूमिकेवरुन तिला सहेतुक म्हणता येत नाही. अधिकार आहे. प्रेमाने आपल्या मित्राला सांगू शकतो मित्र. श्रीकृष्ण आणि बलराम त्या वनामध्ये गेले. धेनुकासुराच्या सर्व अनुयायांचा त्यांनी प्रथम नाश केला, मग धेनुकासुराला. त्या वनामध्ये सर्व गोपाल संचार करु लागले. गायी चरायला जाऊ लागल्या. ते वन निर्भय केले. याप्रमाणे क्रमाक्रमाने सर्वही असुरांचा त्यांना नाश करायचा आहे. भूमीवर अनेक असुर जन्माला आले आहेत. निरनिराळे वेष धारण करुन येतात. असुरी शक्तीचा त्यांनी विकास करुन घेतला आहे. धर्मानुकूल वृत्ती सर्वांची बनावी म्हणून गोपालकृष्णांचा प्रयत्न आहे.

पुढे अरिष्टासुर नावाचा असुर बैलाचा वेष घेऊन गोकुळात आला. सगळीकडे फिरु लागला. सर्व मंडळी घाबरली. गोपालकृष्ण बाहेर आले. त्या बैलाला बोलावले, त्यांना कशाला भीती दाखवतोस? काय तुझं कर्म आहे? बळाचा गर्व झाला असला तर माझ्याकडे ये. तो धिप्पाड मोठा बैल शिंगाने मारण्याकरता आला. श्रीकृष्णांनी त्याची दोन्ही शिंगे धरुन त्याला मागे ढकलला. बराच पाठीमागे जाऊन तो पडला. पुन्हा उठला आणि मारायला धावत आला. मग मात्र श्रीकृष्णांनी त्याच्या दोन्ही शिंगाला धरुन खाली पाडला आणि एखादे वस्त्र पिळावे तसं त्याचे शरीर पिळून टाकले. आणि तो गतप्राण होऊन पडला.

नंतर केशी नावाचा एक दैत्य घोड्याच्या रुपाने आला. आपण खरे कोण आहोत हे लोकांना समजू न देता लोकांचा नाश करायचा एवढंच त्यांचं कार्य आहे. पण श्रीकृष्णांची संरक्षण शक्ती इथेही आहे. त्यांनी ह्या केशी दैत्याचाही नाश केला.

हे सगळं पाहिल्यानंतर नारदमुनी एकदा मथुरेमध्ये आले. त्यांना वाटलं, 'कंसाचाही नंबर आता लवकर लागला पाहिजे. सगळी असुर मंडळी जायला लागली आणि हा तर त्यांचा नेता.' म्हणून ते कंसाला भेटून म्हणाले, "कंसा!, कृष्ण हा देवकीचा आठवा मुलगा. तू त्याचा शोध करतो आहेस. तिची सगळी मुलं मारलीस त्याप्रमाणे आठवा मुलगाही मेला; या भ्रमात तू आहेस. पण तुझा प्रयत्नवाद चुकलेला आहे. तुझा शत्रू जन्माला आला. तो जिवंत आहे. इतकेच नव्हे तर त्याने तुझे अनेक राक्षस आजपर्यंत मारलेत. वसुदेवाने आपला हा एक मुलगा व दुसरा राम नावाचा मुलगा गोकुळामध्ये नंदराजाजवळ नेऊन ठेवले. तिथं ते वाढताहेत. त्या दोघांचं नंदाने संरक्षण केलं आहे."

नारदांच्या सांगण्यावरती कंसाचा विश्वास बसला. अशा गोष्टींवर विश्वास बसतो माणसाचा. बाकीच्या गोष्टी नारदांनी सांगितल्या असत्या तर त्यावर त्याचा विश्वास बसला असता की नाही कोणास ठाऊक? रामकृष्ण ही वसुदेवाची मुलं आहेत; हे कंसाला आज समजलं. तो लगेच उठला. वसुदेवाला ठार मारतो म्हणून निघाला. नारद म्हणाले, "काय शहाण्या!, वसुदेवाला मारुन काय करणारेस? तुझा शत्रू काही वसुदेव नाही. शत्रू राम-कृष्ण आहेत. तुझ्यात सामर्थ्य असेल तर त्यांचा नाश करण्याचा प्रयत्न कर की!" असं सांगून नारद निघून गेले. आणि वसुदेव-देवकीच्या नशिबी पुन्हा तुरुंगवास आला. या दोघांनी ती मुलं गोकुळात नेऊन ठेवली. अर्थात त्यांना तुरुंगवासाची शिक्षा झाली. राहिले बिचारे, काय करणार? ईश्वराचा किंवा चांगल्या महात्म्यांचा अवतार व्हायचा म्हणजे कष्ट पडतातच. तप आहे ना ते! तपाशिवाय असे अवतार जन्माला कसे येतील?

बुद्धिवाद हा प्रयत्नवादाशी अनुकूल आहे. प्रयत्नांनी सगळं होऊ शकतं. बुद्धिपूर्वक, आपल्या बुद्धीनं प्रयत्न करायचा. त्या प्रयत्नांमध्ये सत् किंवा असत् ह्याचा विचार केला जात नाही. केवळ प्रयत्न करायचा. असुरी प्रवृत्ती असल्या कारणानं आपलं संरक्षण होण्याकरता आपण प्रयत्न करायचा आणि त्या प्रयत्नांनी आपण सुखी असा एक विश्वास मनात असतो. दैवी शक्ती मानायची की नाही? या बद्दल त्यांची मनाची स्थिती आंदोलित आहे. दैवी शक्ती मान्य नाहीच त्यांना. आणि मान्य असली तरी आपलाच प्रयत्न ते श्रेष्ठ मानतात. आमच्या प्रयत्नांनी आम्ही त्या दैवी शक्तिचा सुद्धा निरास करू शकू असा अहंकार त्यांच्या मनामध्ये उत्पन्न झालेला आहे.

आरंभाला कंसाने वसुदेवाची सगळी मुलं मारायचा प्रयत्न केला. म्हणजे आठवा मुलगा (आपला शत्रू) जरी जन्माला आला, तरी तो त्या सगळ्यांबरोबर मारला जाईल. त्या वेळेला प्रत्यक्ष काय झालं हे नारदांनी आत्ता येऊन सांगितलं. ते म्हणाले, तुझा सगळा प्रयत्न फसला. तुझा शत्रू जिवंत आहे पण सगळ्या मुलांना मारण्याचं पाप मात्र मस्तकावर बसलं. कंसाने त्या दोघांचा आता नाश करायचं ठरीवलं. अक्रूरजी यादवांपैकीच पण चांगले सत्शील होते. कंसाला अनुसरून वागत होते म्हणून मथुरेमध्ये ते राहू शकले. नाहीतर पुष्कळ यादव घरदार सोडून गेलेले होते. अक्रूरजी मात्र कंस म्हणेल तसं, त्याला सल्ला मसलत देऊन, "बरंय बाबा!" काही वेळेला स्पष्टपणे बोलायचे, काही वेळेला ऐकून घ्यायचे असं राहत होते. त्या अक्रूरजींना कंसाने बोलावून आणले राजवाड्यामध्ये. आले अक्रूरजी. आणि कंसाने त्यांना सांगितलं, "नारदांची भेट आत्ता झाली आणि त्यांनी सांगितलं की तुझे शत्रू राम–कृष्ण, वसुदेवाची मुलं ही नंदाजवळ गोकुळामध्ये आहेत. आता मी त्या दोघांना राजधानीत बोलावून आणायचं ठरीवलंय. ते काम तुम्ही करा. तुम्ही माझा रथ घेऊन चला. तुमच्या मामांनी तुम्हाला मथुरा राजधानी पाहायला बोलावलंय, इंद्रयाग होणार आहे. म्हणून मुद्दाम मामांनी तुम्हाला बोलावणं पाठवलंय असं सांगून त्या दोघांना इथे घेऊन या." आणि मग पुढं आपण काय करणार आहोत ते ही मूर्खासारखं तो बोलून गेला. अक्रूरजी आता गोकुळात जाणार आहेत. त्यांच्या जवळ आपण आपलं खरं मनोगत व्यक्त करायचं की नाही ह्याचंही त्याला भान राहीलं नाही.

कंसाने पुढे सांगितलं, "माझ्याजवळ कुवलयापीड नावाचा एक मोठा हत्ती आहे. एक हजार हत्तींचं बळ त्याला आहे. ते दोघे इथे आले, म्हणजे या हत्तीकडून त्यांचा नाश करण्याचा माझा पहिला प्रयत्न राहील. त्यातून जर ते वाचले तर माझ्याजवळ मोठमोठे मल्ल आहेत. या मल्लांच्याकडून मी त्यांचा नाश करणार आहे. रामकृष्णांना मारलं की वसुदेव आणि माझा पिता उग्रसेन ह्यांनाही मी मारणार आहे. सगळं राज्य माझ्या ताब्यात येणार. अशारीतीने एकदा निष्कंटक पृथ्वी झाली आणि सगळी सत्ता माझ्या ताब्यात आली, की मग मला कोण मारणार आहे? कोण शत्रू आहे?" म्हणजे सगळं मनोगत बोलून दाखवतोय हा. आपण स्वतः अजरामर आहोत ही एक भ्रांति आहे. आपण रामकृष्णांना मारण्याचा प्रयत्न करणार आहोत व त्यात निश्चित यश मिळणार; ही सुद्धा एक भ्रांतीच आहे. इतकी मुलं मारली. तो प्रयत्न जरी यशस्वी झाला नाही, तरी हा यशस्वी होईल. त्या सगळ्यांचा नाश करून मी अजरामर होणार आहे. असं बोलून गेला तो अक्रूरजींजवळ.

अक्रूरजींनी मात्र सांगितलं त्यावेळेला, "राजेसाहेब, मनोरथ सगळेच करत असतात, आपण आपलं तसं करू नये. काय करायचं ते करा राजनीतीला अनुसरून. राजनीतीला सगळं क्षम्य आहे. शत्रूचा नाश करण्याकरता पापपुण्याचा विचार राजनीतीशास्त्रामध्ये केलेला नाही. उद्या मी त्या दोघांना घेऊन येतो.

दुसऱ्या दिवशी कंसाने केशी नावाच्या दैत्याजवळ घोड्याच्या रुपाने कृष्णाला मारण्यासाठी. गोकुळात येऊन तो धावत आला कृष्णांना चावण्यासाठी. अगोदर त्याने कृष्णांना लाथ मारण्याचा प्रयत्न केला. ते एकदम बाजूला झाले. चुकली त्याची लाथ. मग दातांनी चावून मारण्यासाठी जवळ आला असता, श्रीकृष्णांनी आपला डावा हात त्याच्या तोंडात घातला. तो हात इतका वाढला की सबंध तोंड भरून गेलं. श्वासोच्छ्वास कोंडला गेला. मृत्यू यायला किती वेळ लागणार? लगेच त्याचे प्राणोत्क्रमण झालेलं आहे. अशारीतीने जे जे राक्षस कंसाने पाठीवले, त्या बहुतेकांचा त्यांनी गोकुळात नाश केला. सर्वही गोपालांचं आणि गायींचं संरक्षण केलं. इंद्रापासून रक्षण केलं, ब्रह्मदेवापासून केलं. म्हणजे

इंद्रासारखे देवयोनीत जन्माला आलेलेही मानवांना काही करू शकणार नाहीत, हे सुद्धा त्यांनी शिकीवलेलं आहे. याप्रमाणे सर्व गोपालांच्या मनात निर्भयता उत्पन्न झाली. गोपालकृष्ण आपला संरक्षक आहे. अशी बुद्धी आणि भक्ती त्या गोपालांच्या मनामध्ये उत्पन्न झाल्यामुळे ते सुरक्षित राहिले.

अक्रूरजी गोकुळात आलेले आहेत. अक्रूरजी, उद्धवजी वगैरे मोठे कृष्णभक्त होते. ईश्वरभक्ती अंतःकरणात असल्यामुळे आणि कृष्णांच्या लीला श्रवण केल्यामुळे ती भक्ती आणखीनच वाढली. संध्याकाळच्या वेळेला ते गोकुळामध्ये येऊन पोहोचले. रामकृष्ण हे त्या वेळेला गायींची धार काढत होते. लगेच बलरामजींनी अक्रूरजींची पूजा केली. गृहस्थाश्रमी पुरुषांचे अतिथी सत्कार हे मोठं कर्तव्य सांगितलेलं आहे. अक्रूरजींची बलरामजींनी मधुपर्क पूजा केली, त्यांना गोदान दिलं. जेवण झालं. सगळेजण बोलत बसले. श्रीकृष्णांनी त्यांना विचारलं, काय अक्रूरजी आमची सगळी यादव मंडळी मथुरेमध्ये कुशल आहेत ना? पण तो आमचा मामा जो पर्यंत आहे, तोपर्यंत कुणाचं क्षेम असणार नाही. काय करायचं. पण आपण कशाला आलात? काय काम काढलात? काही सांगण्यासारखं असेल तर सांगा.

मग अक्रूरजींनी त्यांना सर्व सांगितलं. कंसाने निमंत्रण केलंय. पण त्याचा खरा उद्देश तुम्हाला तिथे बोलावून मारायचा आहे. त्याने स्वतःच तसं बोलून दाखवलंय. श्रीकृष्ण म्हणाले, असू दे. जाऊ या आपण उद्या. ठरलं. प्रातःकालच्या वेळेस सगळी मंडळी जागी झाली. अक्रूरजी रामकृष्णांना नेण्यासाठी मथुरेहून आलेत; हे त्या गोपींनाही समजलं. अतिशय दुःखी झाल्या त्या. आतापर्यंत रोज गोपालकृष्णांचं दर्शन होत होतं. ते जरी रानात गायी चरायला घेऊन गेले तरी गोपींना घरकाम करताना त्यांचं चरित्र वर्णन करावं. धर्मशील वृत्ती आहे. पराकोटीची भगवद्‌भक्ती अनेक जन्मानंतर त्यांना मिळालेली आहे. उध्दवजींनीसुद्धा त्यांच्याबद्दल प्रशंसोद्‌गार काढले आहेत. उद्धवजी मोठे नीतीशास्त्रज्ञ आणि भगवद्‌भक्त होते. त्यांनी गोपींच्या कृष्णभक्तीची प्रत्यक्ष परीक्षा केलेली आहे. अशा गोपींना उद्यापासून गोपालकृष्णांचे दर्शन होणार नाही, याचं फार दुःख झाले. इकडे नंदराजाने सर्व गोपालांना सांगितलं, राजेसाहेबांचे बोलावणे आले आहे, कोणाजवळ गोरस वगैरे काय असेल तो घेऊन जाऊ राजेसाहेबांना द्यायला. त्या गोपी आता काय सांगणार? राजाचं बोलावणं म्हणाल्यानंतर तुम्ही जाऊ नका असं कसं म्हणू शकतील? सगळ्या गोपी एकत्र येऊन उभ्या राहिल्या. रथामध्ये रामकृष्ण येऊन बसलेले आहेत. गोपींनी कोणाच्या तरी मार्फत आपला निरोप त्यांच्याकडे पाठवला. गोपालकृष्ण काही बोलले नाहीत की तुम्ही जाऊन त्या गोपींना सांगा आम्ही लवकरच भेटायला येऊ वगैरे. भेट आपली. समाधान करून लवकर रथ हाक म्हणाले. काय त्या गोपींच्या मनाची अवस्था झाली असेल, सांगता येत नाही. अक्रूरजींनी घोड्यांना इशारा करताच तो रथ निघालेला आहे. नंदादिक गोपालांच्या गाड्या पुढं गेल्या आणि मथुरेच्या बाहेरच्या उपवनात येऊन त्या थांबल्या. सगळ्यांनी विश्रांती घेतली.

इकडे अक्रूरजींनी यमुनेच्या तीरावर मध्येच रथ थांबीवला. रामकृष्ण पाणी पिऊन पुन्हा रथामध्ये येऊन बसले. अक्रूरजी माध्यान्ह कालचे स्नान, संध्या करून येतो म्हणाले. आणि ते स्नानाकरता नदीवर निघाले. स्नान करताना एकदम पाण्यात बुडी मारल्यावर त्या जलात त्यांना रामकृष्ण दिसू लागले. त्यांना वाटलं रामकृष्ण जलात कसे दिसतात? ते तर वर रथात बसलेले आहेत. तिथं तरी आहेत की नाही पाहू या. म्हणून पाण्याबाहेर डोकं काढून पाहिलं तर तिथंही बोलत बसलेले आहेत. पाण्यात दिसले हे तरी खरं का म्हणून पुन्हा बुडी मारली. मग त्यांना महाकालाचं स्वरूप दिसलं. सहस्त्रफणांचा शेषनाग आहे. त्याच्या उत्संगावरती श्यामवर्ण भगवान श्रीहरी बसलेले आहेत. नारदादिक सर्व मंडळी जवळ आहेत. असं दर्शन अक्रूरजींना पाण्यात झालेले आहे. स्नान वगैरे आटोपून अक्रूरजी लवकर रथात आले. गोपालकृष्णांनी विचारलं, "काय अक्रूरजी? काय अद्‌भुत असं काही पाहिलं का? कुठं पाण्यात अंतरिक्षात दिसलं की भूमीवर? कुठं काय पाहिलं?"

अक्रूरजी मोठे अधिकारी भक्त होते. ते म्हणाले, "तुमचंच स्वरूप पाहिलं मी. चला जाऊ या आपण." म्हणून निघाले आणि सायंकालच्या वेळेला म्हणजे अपरान्हकाळी मथुरेत येऊन पोहोचले. सायंकाल म्हणजे साधारण ३–४ वाजायची वेळ होती. दोघेही रामकृष्ण रथातून खाली उतरले. आणि

अक्रूरजींना म्हणाले, "तुमच्या राजाला जाऊन फक्त सांगा दोघा मुलांना आणलेलं आहे." अक्रूरजी म्हणाले, "इथे कशाला उतरता? तुम्ही आमच्या घरीच उतरायला या." गोपालकृष्ण म्हणाले, "आज मला तुमच्या वाड्यात येता येणार नाही. कंसाचा तुमच्यावर विश्वास आहे तो कायम राहू दे. मी जर तुमच्या घरी आलो राहायला, तर कंसाचा तुमच्यावर तो विश्वास राहील का? तेव्हा आता ऐका. कंसाचा नाश झाल्यावर आम्ही तुमच्या घरी येऊ."

नंतर अक्रूरजींनी राजवाड्यामध्ये जाऊन कंसाला ही बातमी सांगितली. थोडी विश्रांती घेऊन भगवान गोपालकृष्ण हे मथुरा राजधानी पाहण्याकरता निघाले. नंदादिक गोपालही निघालेले आहेत. आता राजधानीमध्ये आल्यानंतर राजवेष पाहिजे ना! आतापर्यंत जो वेष होता तो वनातला वेष होता. गुंजांच्या माळा गळ्यात घातलेल्या आहेत, मोरपिसे लावली आहेत. इतक्यात त्यांना कंसाचा परीट त्याचे कपडे घेऊन जाताना दिसला. त्याला ह्यांनी हाक मारली, "अरे!, ती गाठोडी सोड पाहू. आम्हाला हे कपडे घ्यायचे आहेत." तो परीट मोठा उर्मट होता. कंसाचाच दूत तो. तो म्हणाला, तुमच्यासारख्या गवळ्यांचे हे कपडे नाहीयेत. हे राजाचे कपडे आहेत. तुम्हाला यातलं काही मिळणार नाही. हे ऐकताच श्रीकृष्णांनी एकदम त्याच्या थोबाडीत मारली. रस्त्यातच तो गतप्राण होऊन पडलेला आहे. त्याचे अनुचर पळून गेले. ती गाठोडी सोडली त्यातून आपल्याला योग्य असा वेष काढून घेतला. एक शिंपी त्या ठिकाणी आला. त्याने ह्यांच्या अंगाला बसतील असे सगळे कपडे व्यवस्थित करून दिलेले आहेत. राजवेष धारण करून हे निघाले. इतक्यात एक कंसाची दासी चांगले चंदन तयार करून राजवाड्याकडे निघाली होती. ती उत्तम चंदनाची उटी तयार करीत असे. उन्हाळ्यामध्ये चंदनाची उटी लावणं हे शरीराला आरोग्य प्राप्त होण्याच्या दृष्टीने चांगला उपचार पूर्वी होता. उष्णतेचे शमन करण्याकरता त्यात इतरही काही पदार्थ घालीत. गोपालकृष्ण तिला म्हणाले, "बाई, आम्ही उन्हातून आता प्रवास करून आलो. तुमच्याजवळची ही चंदनाची उटी दिलीत तर बरं होईल. अंगाला लावून शांतता मिळेल." "बरंय!" तीही बिचारी भाविक होती. "घ्या, म्हणाली. काही हरकत नाही." ती चंदनाची उटी त्यांनी लावली आपल्या अंगाला. बलरामजींनीही लावली.

त्या त्रिवक्रा दासीचं शरीर तीन ठिकाणी वाकडं होतं. "हृदिविंकर्तुमनश्चक्रे" यांचा संकल्प झाला. हिचं शरीर चांगलं केलं पाहिजे. यांनी तिच्या दोन्ही हातांना धरलेलं आहे. पायावर एक पाय आपला ठेवला आणि नुसतं सरळ केल्यासारखं उचलल्याप्रमाणे केलं. तिचं शरीर सुंदर झालेलं आहे. कितीही मोठा सर्जन असला तरी इतक्या अत्यल्प वेळात असं शरीर तयार करू शकणार नाही. हे सामर्थ्य काही वेगळं आहे ना! ती म्हणाली, "महाराज!, माझ्या वाड्यामध्ये राहायला या." श्रीकृष्ण म्हणाले, "नको!, आम्ही प्रवासीच आहोत. कुठं तरी उतरायचं. आज आम्हाला सवड नाही. येऊ केव्हा तरी."

नंतर ते जे इंद्रधनुष्य होतं, ज्या धनुष्याकरता यज्ञ होणार होता. त्या धनुष्याची जागा विचारत विचारत हे दोघे भाऊ गेले. त्या धनुष्याच्या संरक्षणाकरता पुष्कळ सैन्य कंसाने ठेवलं होतं. तरीही ते धनुष्य कसं आहे हे पाहण्याकरता हे दोघे आत गेले. कृष्णांनी ते धनुष्य हातामध्ये घेतलं, थोडंसं, थोडंसं वाकीवण्याचा प्रयत्न केला आणि त्याचे दोन तुकडे झाले. त्या बरोबर ते सगळं सैन्य त्यांच्या अंगावर धावून आलं. ह्या दोघा बंधुंनी धनुष्याचे दोन तुकडे घेऊन सर्व सैन्य त्या वेळेला मारून टाकलं आहे. राजधानीमध्ये कंसाची शक्ती श्रेष्ठ आहे? की कंसापेक्षाही दुसरी कोणती आहे? हे त्यांनी दाखवून दिलेलं आहे. कंसाचं सैन्य असेल पुष्कळ. आजपर्यंत कंसाच्या राजधानीमध्ये त्याच्या विरुद्ध बोलणंही अशक्य होतं, त्या ठिकाणी येऊन यांनी त्याचा तो परीट मारला. त्याचं सैन्य मारलं, धनुष्य मोडून टाकलं. सगळी राजधानी पाहिली. सगळ्या व्यापारी लोकांनी आपापल्या दुकानात, प्रजाजनांनी घरात बोलावून त्यांचा सत्कार केला. आणि सायंकाळी आपल्या स्थानामध्ये, उपवनामध्ये जिथे गाड्या सोडल्या होत्या तिथे येऊन राहिले.

दुसरे दिवशी सकाळी सगळी तयारी झाली होती. कुस्त्या होणार होत्या मोठ्या. चाणुर–मुष्टिक. तो चाणुर काय आंध्र प्रदेशातील होता की काय कोणास ठाऊक. विष्णुसहस्त्रनामामध्ये "चाणुरांध्रनिषुदनः" असा एक पाठ आहे. "चाणुर आंध्रि निषुदनः असाही एक पाठ आहे. पण "चाणुर

आंध्रनिषुदनः" असा पाठ असेल तर तो चाणुर आंध्र प्रदेशातला असला पाहिजे. तो सगळ्यात मोठा व मुख्य मल्ल. मुष्टिक, तोशल असे मोठे मोठे मल्ल होते. त्या राजे लोकांना शोक असायचा. मल्लांना बाळगायचं आणि कुस्त्या करायच्या. म्हणजे जो पडला त्याचा पराजय आणि ज्याने पाडला त्याचा विजय अशी त्या वेळची स्थिती होती. मल्लयुद्धच ते आहे. जो जिवंत राहिला त्याचा विजय आणि मेला त्याचा पराजय असं ते युद्ध व्हायचं.

तेव्हा श्रीकृष्णांना अक्रूरजींनी अगोदरच सगळी कल्पना दिली होती. कंस काय आणखी त्याचं कारस्थान काय आहे? हे सगळं त्यांनी त्यांच्या कानावर घातलं होतं. दुसरे दिवशी सकाळी दूध वगैरे पिऊन राजवेष घालून निघाले. कुवलयापीड नावाच्या हत्तीच्या माहुताला, "हत्तीला तू दारामध्ये उभा कर आणि हे दोघे आले म्हणजे तुझ्या हत्तीकडून ह्या दोघांचाही तू नाश कर." असे सांगितले होते कंसाने. ह्यांना ही बातमी अगोदरच समजली होती. हे आले आणि त्या माहुताला म्हणाले, "अरे!, आम्हाला आत जायचंय कुस्त्या पाहायला. तुझा हत्ती बाजूला कर. आणि जर तू हत्ती बाजूला केला नाहीस तर तू आणि तुझा हत्ती जिवंत राहणार नाही." आता त्याला राजाची आज्ञा आहे. हत्तीकडून मारायचंय त्यांना. त्यानेही हत्तीला अंकुशाने प्रेरणा केली. हत्ती अंगावर धावून येतो आहे. हे इकडे तिकडे पाठीमागे जाताहेत. त्याचं शेपूट धरून त्याला मागे ओढताहेत. त्यालाही पुढं जाता येईना. असा थोडा वेळ खेळ झाला त्यांचा. आणि एकदम पुढे येऊन त्याचा तो दात जो आहे तो दात एकदम उपटून त्यांनी हातामध्ये घेतला आणि त्या दाताचे तडाखे मारून तो हत्ती आणि त्याचा माहूत दोघांनाही त्यांनी ठार मारलेलं आहे. हत्ती खाली पडलेला आहे. बलरामजींनी एक दात उपटून घेतला. खांद्यावर घेऊन आत निघालेत. अंगावर रक्त सांडलेलं आहे.

आत सगळी मंडळी बसली होती. देशोदेशीचे लोक प्रेक्षक म्हणून युद्ध पाहण्याकरता आलेले आहेत. रामकृष्णांच्याबरोबर युद्ध होणार ही कल्पना त्यांनाही नाही. कारण कंसाचं कारस्थान फक्त अक्रूरजींनाच माहीत होतं. आणखी अक्रूरजींकडून श्रीकृष्णांना फक्त समजलं होतं. रामालासुद्धा समजलं होतं की नाही कोणास ठाऊक. नंदादिकांच्या जवळ तर ते अक्रूरजी बोललेच नव्हते. म्हणून बाकीची मंडळी कुस्त्या होणार आहेत मोठ्या. पाहायला जाऊ या म्हणून आली. रामकृष्णांची कीर्ती ही तर सर्व ठिकाणी पसरलेली होती. अनेक राक्षस मारलेले आहेत. कालियाचं दमन केलेलं आहे. गोवर्धनपर्वत धारण करून सर्वांचं सात दिवसपर्यंत संरक्षण केलेलं आहे. आणि आज मथुरेमध्ये प्रवेश केल्याबरोबर कंसाचे हजार सैनिक त्यांनी मारून टाकलेले आहेत. अशा अनेक कृष्णलीला त्यांनी ऐकल्या होत्या. पुन्हा निर्भयपणाने आलेले आहेत. सर्वांनाही ती रामकृष्णांची मूर्ती पाहून समाधान झालेलं आहे.

मुख्य मल्ल जो चाणुर, तो आलेला आहे. त्याने कृष्णांना सांगितले, "कृष्णा!, रामा!, तुम्ही अरण्यात राहणारे लोक. कुस्ती खेळण्यामध्ये चांगले आहात असं राजे साहेबांना वाटतंय. राजेसाहेब मोठे कुस्तीचे शौकिन आहेत. तर तुम्ही तुमचं काय कौशल्य आहे ते दाखवा. राजेसाहेबांनाही आनंद होईल." चाणुर–मुष्टिकालाही कंसाने सांगून ठेवलं होतं, कुवलयापीड हत्तीला मारून जर हे आत आले, तर त्या दोघांना तुम्ही मारा. श्रीकृष्ण म्हणाले, "काही हरकत नाही. राजेसाहेबांना जर कुस्तीची आवड असेल तर आमच्या बरोबरीच्या मंडळींबरोबर आम्ही कुस्ती करायला तयार आहोत. आम्ही लहान आहोत." तो चाणुर म्हणाला, "तू काय लहान आहेस काय? आत्ता एक हजार हत्तींचं सामर्थ्य असलेल्या हत्तीला तूच मारलंस ना! आणि स्वतःला लहान म्हणवतोस? माझ्या बरोबर तुला युद्ध करावं लागेल. बलरामजींच्याबरोबर हा मुष्टिक नावाचा दुसरा योद्धा आहे तो युद्ध करील." कबूल केलं त्यांनी. आणि त्या आखाड्यामध्ये रामकृष्ण आणि चाणुर–मुष्टिक यांचं युद्ध सुरू झालं. कंसाला रात्रभर झोप नाहीये. कृष्णाने राजधानीमध्ये येऊन सैन्य मारलं, धनुष्य मोडून टाकलं ही बातमी त्याच्याकडे गेली होतीच की नाही. म्हणजे नुसतंच त्याने सैन्य मारले असं नाही. इथेही तो मारण्याकरताच आला आहे. आपलीसुद्धा आणखी वाट लावतो की काय? काळजीत होता तो. आणि तशी त्याना स्वप्नही पडली म्हणतात. मृत्युकाळ जवळ आलेला आहे. हे समजण्याकरता शास्त्रकारांनी काही चिन्ह सांगितलेली आहेत. फक्त महिना मृत्यू राहिला, पंधरा दिवस राहिला. एक रात्र मृत्यू यायला काळ राहिला. हे कोणी पाहू नये आणि त्याप्रमाणे घाबरून जायचं कारण नाही. सगळ्यांचंच असं नाही. पण त्या कंसाला मात्र तो अनुभव आला. आरशामध्ये फक्त आपलं मस्तक,

मुख दिसत नाही. बाकी सगळं दिसतं. म्हणजे अगदी जवळ मृत्यू आला आहे. "प्राणघोषः नृप श्रुतिः" कान झाकल्यानंतर प्राणवायू जो संचार करीत असतो त्याचा आवाज आपल्याला ऐकायला येतो. आतल्या आत तो आवाज ऐकायला येईनासा झाला. म्हणजे मृत्यू अगदी जवळ आलेला आहे. त्या कंसाला हे सगळे अनुभव आले. मृत्यूची भीती निर्माण झाली. उद्या काय होतंय कोणाला ठाऊक. तरी पण आपण ठरीवल्याप्रमाणे हत्तीकडून ते दोघे मारले जातील. त्यातून सुटले तरीसुध्दा आपले पुष्कळ मोठे मल्ल आहेत ते ह्यांना मारतील. ही पुन्हा खात्री बाळगतोच आहे. कसंतरी मनाचं समाधान करून घेतो आहे.

आले. हत्तीला मारून ते दोघे आलेले आहेत. आणि चाणूराबरोबर श्रीकृष्णांचं आणि मुष्टिकाबरोबर बलरामांचं युद्ध सुरू झालं. वस्तुतः कृष्ण शरीराने लहान होते आणि चाणूर धिप्पाड, मोठा होता. कुस्त्यांची आवड असेल. त्यामध्ये कौशल्य असेल पुष्कळ. त्या ठिकाणी प्रेक्षक म्हणून जी निःपक्षपाती मंडळी होती त्यांना वाटलं की हे काही बरोबर नाही. अन्याय आहे. एक लहान आणि एक मोठा धिप्पाड मल्ल, हे कसलं युद्ध सुरू केलं कंसाने? राजाचं हे काही न्याय्य नाही. अन्याय दिसतोय हा. असं ते बोलायला लागले. बराच वेळ ते युद्ध झालं. तो चाणुर शेवटी दमला. शेवटचा प्रयत्न म्हणून तो आला धावत आणि त्याने कृष्णांच्या छातीवर जोराने मूठ मारली. कृष्णांनीही लगेच त्याला दोन्ही हातांना धरून वर उचलला आणि खाली मातीमध्ये जोरात आपटला. त्याबरोबर त्याचे प्राण गेले. बलरामजींनीही त्या मुष्टिकाला मारून टाकलं. आणखीही एक दोन मल्ल आहे त्यांनाही बलरामजींनी मारून टाकल्यावर बाकीचे मल्ल तिथून पळूनच गेले. उगीच आपण यांच्या बरोबर युद्ध करून मरण्यापेक्षा इथून निघूनच जाऊ या, म्हणाले.

सगळे लोक टाळ्या वाजवायला लागले. कृष्णांची स्तुती करायला लागले. वाद्ये वाजायला लागली. कंसाने रागावून सांगितले. वाद्ये बंद करा आणि आताच्या आता या रामकृष्णांना हद्दपार करा. वसुदेव, उग्रसेन यांना ठार मारा. आता जवळच आलेलं आहे त्याचं मरण. बडबड करायला लागला. कृष्ण खाली आखाड्यात होते आणि कंस वरच्या बाजूला सिंहासनावर बसला होता. भगवान गोपालकृष्णांनी एकदम उडी मारली त्या सिंहासनावर. कंसही उठला आणि त्याने आपली तलवार उपसलेली आहे. परंतु ह्यांनी त्याला एकदम उचललं आणि खाली आखाड्यामध्ये फेकून दिलेलं आहे आणि पाठोपाठ आपणही त्याच्या अंगावर उडी मारलेली आहे. प्राण जायला किती वेळ लागणार कंसाचे. त्याचे प्राण लगेच निघून गेले. त्याला आठ बंधू होते ते कृष्णांना मारण्याकरता शस्त्र घेऊन आले असताना, बलरामजीही तिथं होते. त्यांनी लगेच एक शस्त्र घेऊन त्या आठही बंधूंना ठार मारून टाकलेले आहे. प्रतिकार संपला सगळा. कृष्णांचं सामर्थ्यही सगळ्यांच्या लक्षात आलेलं आहे. सगळीच मंडळी कंसाला खरोखर अनुकूल होती असं नव्हतं. त्याची दहशत म्हणा, त्याची एकंदर सत्ता त्यामुळे अनुकूलता दाखवली असेल. पण ती खरी अनुकूलता नाही. बाह्य प्रतिकार सगळा संपला.

उग्रसेन राजाला कंसाने बंदीखान्यात टाकलं होतं. श्रीकृष्णांनी त्याला सोडवून आणलेलं आहे. आणखी त्याला सांगितले. "आपण आता यादवांचं राज्य करा. मी तुम्हाला सहाय्य करायला तयार आहे. देवसुद्धा तुम्हाला सहाय्य करतील. पुष्कळ तुम्हाला नजराणे वगैरे देतील. काही काळजी करू नका." असं म्हणून लगेच कंसाच्या पित्याला त्यांनी राज्य दिलेलं आहे. वसुदेव देवकी दोघही तुरुंगात होते. त्यांनाही मुक्त केलेलं आहे. जन्मल्याबरोबर कृष्णाला नेऊन ठेवलं होतं त्यांनी गोकुळामध्ये. जन्मापासून आतापर्यंत रामकृष्ण दोघांनाही ह्यांचं दर्शन झाल नव्हतं. कृष्णांचं सामर्थ्य काय आहे? हे त्यांच्या आत्ता अनुभवाला आलं. कंसाला ठार मारलं. कुवलयापीडाला मारलं.

सैन्य मारलं. अनेक राक्षस मारले. हे त्यांच्या कानावरही आलं होतं. काय बोलावं सुचेना. दोघेही मातापिता येऊन बसल्यावर गोपालकृष्णांनी नमस्कार करून प्रार्थना केली, "पिताजी, आईसाहेब, आजपर्यंत आम्ही आमच्या संरक्षणाकरता गोकुळामध्ये जाऊन राहिलो. तुमच्याकडे काहीही लक्ष दिलं नाही. तुमची काही सेवा घडली नाही. या आमच्या अपराधाची क्षमा करा." त्यामुळे त्यांच्या डोळ्यातून आणखीनच अश्रुधारा वाहू लागल्या. जवळ घेतलं त्या दोघांनी, रामकृष्णांना. पण काही बोलू शकले नाहीत, प्रेमाच्या अवस्थेमध्ये. त्यांनाही आपल्या वाड्यामध्ये पाठवून दिलं गोपालकृष्णांनी. राज्याची व्यवस्था केली आणि कंसाच्या भीतीने जे जे यादव राजधानी सोडून गेले होते त्यांना श्रीकृष्णांनी निरोप पाठवला, "आता तुमच्या घरात येऊन खुशाल रहा. काही तुम्हाला भीतीच कारण नाही." कोणाला काय सहाय्य करायचं ते सगळ्यांना केलेलं आहे आणि सगळ्या यादवांची संघटना पुन्हा त्यांनी उभी केली. सगळे यादव पुन्हा मथुरा राजधानीमध्ये येऊन राहिलेले आहेत.

रामकृष्णांचं उपनयन व्हायचं होतं अद्यापि. वसुदेवांनी सर्व तपस्वी ब्राह्मणांना वगैरे बोलावलं आणि त्यांनी रामकृष्णांचा उपनयन संस्कार केलेला आहे. अवंति क्षेत्रामध्ये सांदिपनी म्हणून मोठे ज्ञानी महात्मा राहत होते. सर्व विद्या आणि सर्व कला यांचं ज्ञान त्यांना होतं. ब्राह्मणाने ज्ञान मिळवायला पाहिजे. सगळं ज्ञान पाहिजे. राजेश्वरशास्त्री सांगत असत, वहाणा कशा शिवाव्यात याचेही ब्राह्मणास ज्ञान हवे. ते ज्ञान पाहिजे. प्रत्यक्ष तो धंदा करायचा नाही. कुणी आला तर त्याला मार्गदर्शन करायला सर्व ज्ञान पाहिजे. तसे सांदिपनी गुरुमहाराजांनी चतुर्दश विद्या, चौसष्ट कला या सर्वांचं ज्ञान मिळीवलेले आहे. आणखी तपस्वी आहेत. आयाचित वृत्तीने राहणारे आहेत. अशी त्यांची प्रसिद्धी असल्यामुळे उपनयन झाल्या बरोबर विद्याभ्यास करण्याकरता रामकृष्ण हे त्यांच्या आश्रमामध्ये गेलेले आहेत. गुरुभक्ती, गुरुसेवा करताहेत. विद्याभ्यासही चाललेला आहे. त्या दोघांची विलक्षण बुद्धिमत्ता सांदिपनी गुरुमहाराजांच्या लक्षामध्ये आलेली आहे. ते म्हणाले, "हे काही सामान्य मानव नाहीत. कुणीतरी ईश्वरी अंश आहेत." विद्याभ्यास करताना त्यांनी एकदा सांगितलं की ह्यांना सर्व ज्ञान व्हायचं. त्याच्या करता काही प्रयत्न नाही काही नाही. चौसष्ट कलांची नावंसुद्धा सध्या आपल्याला माहीत नाहीत. फुलांची माळ कशी तयार करावी ही सुद्धा कला आहे. ती द्रौपदी सगळं ज्ञान शिकली होती म्हणे. त्या अज्ञातवासामध्ये असताना तिच्या ह्या कलांचा तिथे उपयोग झाला. त्या राणीची दासी म्हणून ती राहिली होती.

सर्वही कलांचं शिक्षण ज्ञान प्राप्त करून घेतल्यानंतर रामकृष्णांनी गुरुमहाराजांना विचारले, "महाराज, आपल्या कृपेने आम्हाला विद्या, ज्ञान प्राप्त झालेलं आहे. आता काही गुरुदक्षिणा देणं कर्तव्य आहे आमचं." पूर्वीच्या वेळेला ही पद्धत होती. गुरूंनी सर्वही विद्या शिष्याला शिकवायची आणि नंतर शिष्याने देणं द्यायची. अगोदर डोनेशन द्या आणि नंतर प्रवेश ही काही परिस्थिती त्या वेळेला नव्हती. अगोदर विद्येकडे लक्ष द्यायचं. विद्यार्थ्यांचं पूर्ण कल्याण करायचं. ते कृतज्ञता बुद्धीनं जे काही देतील ते घ्यायचं. सांदिपनी गुरुमहाराजांनी त्यांचं सामर्थ्य पाहिलं होतं. त्यांनी आपल्या पत्नीला विचारलं, "काय मागावं ह्यांच्याजवळ?" तिने सांगितले, "आपला एकुलता मुलगा जो समुद्रात बुडून गेला तो तेवढा परत आणून द्यायला सांगा." गुरुमहाराजांनी श्रीकृष्णांना येऊन पत्नीचं म्हणणं सांगितलं.

लगेच गोपालकृष्ण यमलोकामध्ये गेले. यमधर्म तिथं आहे. गोपालकृष्णांचा सत्कार केला आणि विचारलं, "काय आज्ञा आहे, महाराज?" त्यांनी सांगितलं, "आमच्या गुरुजींचा मुलगा इथं आलेला आहे. आता तो आपल्या कर्मामुळे आलेला आहे. तरी तो मुलगा आमच्या गुरुजींना पाहिजे. ही स्पेशल केस आहे. त्या मुलाला आणून द्या." आणून दिला यमधर्मांनी. काय करणार! श्रीकृष्ण घेऊन आले त्याला. गुरुमहाराजांना, गुरुपत्नींना वंदन केलं आणि म्हणाले, "हा आणलेला आहे. आणखी काय मागायचं ते मागा." गुरुमहाराजांना आनंद झाला. त्यांनी आशीर्वाद दिलेला आहे, "तुमची विद्या तेजस्वी राहील. तुमची कीर्ती सगळ्या जगामध्ये प्रसिद्ध होईल. सर्वांचं कल्याण तुमच्या हातून होईल. वगैरे वगैरे."

त्यांची अनुज्ञा घेऊन रामकृष्ण हे पुन्हा मथुरा राजधानीमध्ये आले. मथुरेमध्ये आल्यानंतर एके दिवशी उद्धवजी बरोबर बोलत बसले होते. उद्धवजी नेहमी त्यांच्या बरोबर राहायचे. मोठे हरिभक्त होते

पहिल्यापासून, लहानपणापासूनच उद्धवजी हरिभक्ती करीत होते. पाच वर्षांचे असताना काही दगड म्हणा मूर्ती म्हणा मांडून त्यांची पूजा चालली होती. सकाळची वेळ. दहा वाजले अकरा वाजले, उद्धव काही आले नाहीत. त्यांची आई पाहायला गेली. पाहते तो हा पूजा करतोय. डोळे झाकून बसलेला आहे. "अरे उद्धवा, किती वेळ झाला. जेवायची वेळ झाली काही लक्ष आहे की नाही?" तरीसुद्धा तिकडं लक्ष नाही. म्हणजे लहानपणापासूनच हरिभक्तिचे संस्कार त्यांच्या अंतःकरणात आहेत, पूर्वसंस्कारानुसार वागताहेत. मोठे बृहस्पतीचे शिष्य होते ते. नीतिशास्त्राचा अभ्यास बृहस्पतींपासून त्यांनी केला होता. मथुरा राजधानीमध्ये मंत्री म्हणून होते ते. त्यांना एके दिवशी गोपालकृष्णांनी सांगितलं, "तुम्ही गोकुळामध्ये एकदा जाऊन या. त्या गोपींना अत्यंत दुःख झालेले आहे मी इथे निघून आल्यामुळे. माझा संदेश मी सांगतो, तो त्यांना सांगा. त्यांचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करा. काही दिवस तिथं रहा. आणि नंतर इकडे या." गोपींची भक्ती काय आहे ती उद्धवजींच्या नजरेस पडावी अशी भगवंतांची इच्छा आहे. उद्धवजी मोठे ज्ञानसंपन्न आहेत, भक्तही आहेत. भक्तिमार्गात सुद्धा ते काही अनभिज्ञ नाहीयेत. परंतु केवल भक्ती किंवा शुद्ध भक्तीचं स्वरूप काय आहे हे श्रीकृष्णांना त्यांना दाखवून द्यायचंय.

उद्धवजी आले गोकुळामध्ये. सर्वांच्या गाठी–भेटी झाल्या. श्रीकृष्णांचा संदेश उद्धवजींनी सांगितला. नंदजींनी त्यांना विचारले, "केव्हा पुन्हा गोकुळात येणारेत राम–कृष्ण?" इ. मग त्यांचं समाधान उद्धवजींनी केले, नंदाला ते म्हणाले, "तुमचे पुण्य मोठं आहे म्हणाले. म्हणून गोपालकृष्णांची बाळलीला जी सख्ख्या आईबापांना पाहायला मिळाली नाही ती तुम्हाला पाहायला मिळाली. यशोदेने बांधून काय टाकलं. सगळं सहन केलं त्यांनी. हे तुमचं पूर्वपुण्य मोठं आहे. श्रीकृष्णांनी कबूल केलंय त्याप्रमाणे ते केव्हातरी येऊन भेटून जातील."

दुसरे दिवशी सकाळी त्या गोपींना ही बातमी समजली. कारण उद्धवजींचा रथ उभा होता नंदाच्या दरवाजामध्ये. त्या सगळ्या गोपी जमल्या, म्हणाल्या, कोणाचा रथ आलाय? पुन्हा अक्रूर आलाय का? तो येऊन गेला आणि कृष्णाला घेऊन गेला. आता कोण आलंय?

इतक्यात उद्धवजी आपलं सगळं आन्हिक वगैरे आटोपून त्यांना भेटण्याकरता म्हणून राजवाड्यातून बाहेर पडलेले आहेत. हे अजानुबाहू कृष्णदास, कृष्णभक्त आहेत अशी कल्पना गोपींची झाली. सगळ्या गोपी आल्या, उद्धवजींना नमस्कार केला. उद्धवजी बसलेले आहेत सगळ्या गोपी बसलेल्या आहेत आणि त्यांनी बोलायला सुरुवात केली. उद्धवजी जरी मोठे ज्ञानी, भक्त होते, राजनीतिज्ञ होते तरी गोपींच्या पुढे त्यांचे काही चालले नाही. काही गोपी म्हणाल्या, "काय हो उद्धवजी तुम्ही मथुरा राजधानीतून गोकुळामध्ये कशा करता आला आहात? काय काम आहे तुमचं?" दुसऱ्या काही गोपी म्हणाल्या, "त्यांचं काय काम असायचंय, त्यांच्या मालकाने आपल्या आईबापांना काहीतरी निरोप सांगण्याकरता यांना पाठवलं असेल. त्या कृष्णाचं किंवा रामाचं दुसरं कोण आहे या ठिकाणी. आईबापांची पोरं आहेत. (म्हणजे त्या मुद्दाम म्हणताहेत). त्या करताच आलात ना उद्धवजी? आईबापांना निरोप सांगितलात ना? आता परत केव्हा जाणार आहात?" असंच त्या बोलू लागल्या. पण उद्धवजी त्यांचं ते सात्त्विक प्रेम पाहून म्हणाले, "कृष्णांचा संदेश सांगतो. तो संदेश एवढाच आहे की, "गोपी हो!, तुमचा आणि माझा वियोग कसा झाला तर मी सर्वव्यापी आहे. सर्वत्र मी आहे. परमात्मा हा सर्वत्र असल्या कारणाने वियोग संभवतच नाही; हा ही तुम्ही विचार करा." पण त्या गोपींना हे तत्त्वज्ञान ऐकायचं नव्हतं. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने परमेश्वर सर्वव्यापी आहे. परंतु गोपींची सगुणभक्ती आहे. रासक्रीडेच्या वेळी कृष्ण गुप्त झाल्यानंतर अतिशय दुःखी झाल्या त्या. मग विष्णुरूप धारण करून कृष्णांनी त्यांना दर्शन दिलं. त्या वेळी त्या म्हणाल्या, "हे रूप पाहायची आमची इच्छा नाही, या करता आम्ही दुःखी नाही" अशा रीतीनं विष्णुरूप पाहूनही त्यांच्या मनाचे समाधान झाले नाही. अशा त्या सगुण भक्तीमध्ये रंगून गेलेल्या गोपींना, मी सर्वव्यापी आहे, माझ्या करता दुःख कशाला करता वगैरे संदेश त्यांना कसा पटेल? दुसरा संदेश श्रीकृष्णांचा असा की बाह्यदृष्टीनं, व्यक्तदृष्टीनं मी जो एवढा दूर आलोय तो या साठीच की आपल्या प्रेमाचा, आत्मीय माणूस जितका दूर असेल, तितकं त्याच्या बद्दलचं प्रेम हे नेहमी राहतं. तो जर जवळ असेल तर त्याला विसरून जातात मंडळी. तुमच्या अंतःकरणामध्ये माझं अखंड स्मरण राहण्याकरता मी दूर आलेलो आहे. तुम्ही तिथेच राहून आपलं कर्तव्यकर्म करीत चला. अवसर मिळेल तेव्हा माझं चिंतन,

स्मरण करा म्हणजे तुम्हाला पूर्ण समाधान मिळेल.

उद्धवजी बरेच दिवस तिथे राहिले. कृष्णलीलाही त्यांनी पुष्कळ वर्णन केल्या. गोपींच्या मनाचं समाधान करण्याचा प्रयत्न केला पण त्यांच्या मनाचं काही समाधान झालं नाही. उद्धवजी समाधान करू शकले नाहीत. निघाले उद्धवजी अनुज्ञा घेऊन. त्या वेळी सर्व गोपींनी त्यांना सांगितलं, "उद्धवजी भगवंतांचा संदेश तुम्ही आम्हाला सांगितलात. त्यांचं दर्शन आता आम्हाला होणार नाही. आता कशाला येईल तो गोकुळामध्ये? राजकन्यांबरोबर त्यांचा विवाह होईल आणि ते तर साक्षात लक्ष्मीपती आहेत. त्यांना कशाचीच इच्छा नाही. आमच्याकडे कशाला येतील. पिंगला वेश्येने सिद्धान्त सांगितला आहे ना, मनातल्या सगळ्या आशा, वासना सोडून देण्यात खरं सुख आहे. ते आज आमच्या नशिबी आलेलं आहे. तुम्ही आमचं कितीही समाधान करण्याचा प्रयत्न केला तरी ते होऊ शकणार नाही. सांगा जाऊन तुमच्या मालकाला. कृष्णाला विसरण्याचा आम्ही प्रयत्न करतो पण कसं विसरावं? या झाडाखाली तो तिथं उभा होता, असं तो बोलला, अशी त्याने बासरी वाजवली, इकडे गेला, तिकडे गेला, ज्या ज्या ठिकाणी आम्ही पाहतो त्या त्या स्थानाचं दर्शन झाल्याबरोबर कृष्णलीला आमच्या डोळ्यासमोर उभी राहते. आत्मज्ञानाचा काय उपयोग आहे उद्धवजी? आम्ही आपलं आमचं नशीब असेल त्याप्रमाणे जीवन काढणार. भगवंताचं स्मरण हे अखंड आम्हाला राहो एवढीच आमची इच्छा आहे.

उद्धवजींच्या मनावर मोठा परिणाम झालेला आहे. गोपींच्या बद्दल त्यांच्या मनांत आदरभाव निर्माण झालेला आहे. आणि जाता जाता त्यांनी उद्‌गार काढलेले आहेत, "तुम्हाला ही जी भक्ती मिळालेली आहे, अनेक जन्मामध्ये पुण्यकर्म करून ती भक्ती तुम्ही मिळवलेली आहे.

येषां त्वन्तगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ।
ते द्वन्द्वमोहनिर्मुक्ता भजन्ते मां दृढव्रताः ।। ७.२८

भगवंतांनी भगवद्‌गीतेमध्ये सांगितलेलं आहे. भक्तिमार्ग हा वाटतो तितका सुलभ नाहीये. आपल्याला भक्तिमार्ग फार सुलभ आहे असं वाटतं. पुण्यकर्माचं आचरण अनेक जन्म करून आपला पापक्षय झाल्यानंतर भक्तीला सुरुवात होते. ही भक्ती तुम्हाला मिळालेली आहे. अत्यंत पुण्यशील तुम्ही आहात." असं म्हणून उद्धवजींनी त्यांना नमस्कार केला. "नंदाच्या गोकुळामध्ये राहणाऱ्या स्त्रियांना नमस्कार असो." असं म्हणाले नाहीत तर, "व्रजस्त्रीणाम् पादरेणुम् वंदे। – त्यांच्या चरणकमलांच्या धुरळ्याला मी नमस्कार करतो." इतक्या पवित्र आहेत गोपी. त्यांनी अत्यंत प्रेमाने हरिकथा, गायनाला आरंभ केल्या बरोबर संपूर्ण वातावरण हे पुण्यमय होऊन जातंय. इतकं सामर्थ्य ह्यांच्या मनात असलेल्या प्रेमामध्ये, वाणीमध्ये आहे. असा आदरभाव व्यक्त करून ते उद्धवजी पुन्हा मथुरेमध्ये आलेले आहेत.

गोपींच्या भक्तीचंच वर्णन मुख्यतः त्यांनी कृष्णांच्या जवळ केलेलं आहे. समाधान त्यांनी व्यक्त केलेलं आहे. आता पुढचं सगळं राजकारण करायचं आहे ना! कुणी तरी निमित्त पाहिजे आहे. गोपालकृष्णांना प्रत्यक्ष कौरवांना शासन करता येत नव्हतं. तेव्हा एके दिवशी अक्रूरजींच्या वाड्यामध्ये गोपालकृष्ण गेले. पुष्कळ दिवसांची त्यांची ही इच्छा पूर्ण करता आली. त्यांनीही गोपालकृष्णांचा मोठा आदरसत्कार केला. यांनीही सांगितलं तुम्ही चांगली वडील मंडळी आहात, आमच्याकडे लक्ष ठेवा वगैरे त्यांची स्तुती केली. आणि त्यांना सांगितलं, "अक्रूरजी, तुम्ही एकदा हस्तिनापुरात जाऊन या. ते कौरव आणि त्यांचा पिता हे काही पांडवांबरोबर चांगल्या रीतीने वागत नाहीत असं माझ्या कानावर आलंय. तुम्ही काही दिवस तिथे रहा. काय कौरवांचं एकंदर वर्तन आहे ते पाहून या. प्रजाजनांची वृत्ती कशी आहे. पांडव गुणी आहेत म्हणून प्रजाजन त्यांच्यावर प्रेम करतात का? ते खरोखरच गुणी आहेत का? ते तुम्ही बघून या. असं सांगून अक्रूरजींना पाठवलं.

पांडवांना निमित्त करून सर्व भूभार हरण करायचा आहे ना! पांडवांच्या कडून युद्ध करवूनही पुष्कळ संहार करवलेला आहे. अक्रूरजी आले हस्तिनापुरामध्ये. आल्यानंतर सगळी मंडळी भेटली त्यांना. त्यांचाही आदर सत्कार केला. कुंतीला तर अत्यंत वाईट वाटले. कुंतीने आपली सगळी कहाणी

सांगितली त्यांना. म्हणाली, काय आम्ही इथे राहिलो. आम्हाला बाहेरही जाता येत नाही. अन्नामध्ये विष काय घातलं त्या भीमाच्या. नंतर त्याला नदीमध्ये काय फेकून दिलं. असे अनेक प्रयत्न आमच्या नाशाकरता चालले आहेत. लाक्षागृहात राहण्याची आमच्यावर पाळी आली. एकदम त्याला अग्नी लावावा आणि सगळ्यांना जाळून टाकावं अशा रीतीने आमची राहण्याची व्यवस्था तिथे करण्यात आली. हे बाहेर आम्हाला बोलता येत नाही. आणि सगळं सहन करावं लागतं. केव्हा आमचं जीवित राहतंय किंवा नाही याची काही शाश्वती नाही. गोपालकृष्णाला सांगा, म्हणाली, ही हकीकत. त्याचं लक्ष जर आमच्याकडे असेल, तर आम्ही जिवंत राहू.

काही महिने अक्रूरजींनी तिथे मुक्काम केला. सगळ्याही हस्तिनापुरातल्या प्रजाजनांचे पांडवांवर प्रेम का आहे? याच कारण त्यांना सापडलं. पांडव गुणी आहेत, धर्मशील आहेत. भगवद्भक्त आहेत. प्रजाजनांच्या विषयी त्यांच्या अंतःकरणात आत्मीयता आहे. म्हणून सगळ्या प्रजाजनांचं त्यांच्यावर प्रेम आहे. आणि हे प्रेम कौरवांना सहन होत नाही. मत्सर उत्पन्न झालेला आहे. त्यांच्यासारखं आपणही गुणी व्हावं म्हणजे आपल्यावरही प्रजाजन प्रेम करतील. पण तिकडे लक्ष नाही. श्रेष्ठ पुरुषांशी निष्कारण वैर दुर्जन करीत असतात असं सुभाषितकार सांगतात. काही कारण नाही. ते आपल्या गुणांनी प्रसिद्ध असतात. श्रेष्ठ पुरुष. तर हे सगळं अक्रूरजींना दिवशी राजसभेमध्ये जाऊन त्या धृतराष्ट्राला उपदेश केला. त्याची सगळी मुलं तिथे होती. अक्रूरजी म्हणाले, "तुझा बंधू पांडुराजा हा मृत झाल्यामुळे तू आता राजा झालेला आहेस. सर्वही मुले तुझीच आहेत. कौरव काय पांडव काय त्या सर्वांच्या बद्दल सारखं प्रेम ठेवून समदृष्टीने तू वाग म्हणजे तुझी कीर्ती जगात होईल. तेव्हा अशा यःकश्चित लोभामध्ये तू सापडू नकोस. इथे जिवात्मा एकटाच जन्माला येतो. एकट्यालाच इथून जावं लागतं. आपल्या कर्माचं फल त्याला एकट्यालाच भोगावं लागत. देहसुद्धा स्वतः इथं ठेवून जावं लागतं याचा विचार तू कर. हा विचार करून पांडवांच्याशी सुद्धा आपल्या पुत्रांप्रमाणे वाग. तर तुझी जगामध्ये कीर्ती होईल."

धृतराष्ट्र म्हणाला, "अक्रूरजी, तुमचा उपदेश मला पटतोय पण तसं वागणं होत नाही. हा माझा मुलगा माझ्याजवळ आला आणि हे करा म्हणाला, की लगेच मी त्याला संमती देतो. परमेश्वराने भूभार हलका करण्याकरता अवतार घेतलाय असं मी ऐकलंय. त्याची इच्छा काय असेल तसं होईल" असंच बोलून दाखवलं. मी कौरवांना सांगतो वगैरे असं काही बोलला नाही. कौरवांचा मत्सर वेळेवर आवरण्याचा प्रयत्न धृतराष्ट्राकडूनही झालेला नाही त्यामुळे तो आणखीनच वाढलेला आहे.

अक्रूरजींनी मथुरेमध्ये परत येऊन ही सगळी हकीकत श्रीकृष्णांना सांगितली. इथे आता बालचरित्र संपलेलं आहे.

कंसाला मारल्यानंतर कंसाचे अनुयायी राजे कृष्णांचा द्वेष करू लागले. त्यात कंसाचा सासरा जरासंध मुख्य होता. या यादवांचं राज्य शिल्लक ठेवायचं नाही असा त्या सर्वांचा प्रयत्न सुरू झाला. उलट रामकृष्णांचा प्रयत्न हे राज्य सुरक्षित कसं राहील या करता चालू आहे. अनेक ऋषी मंडळी वारंवार मथुरेमध्ये येताहेत. धर्मकार्य, पुण्यकर्म चालू आहे. या धार्मिक दृष्टीनेही सर्वांना उत्तेजन मिळत आहे. परंतु बाकीच्या विरोधी राजे लोकांना काय शासन करायचं हा विचार भगवान गोपालकृष्णांचा झालेला आहे.

(तिसरा दिवस)

असुरी प्रवृत्तींच्या राजेलोकांबरोबर युद्ध करणं, आणि सज्जनांना सहाय्य करणं (पांडवांसारख्या) अशाच कार्यामध्ये भगवंतांचं पुढचं सगळं जीवन गेलेलं आहे. कंसाला मारल्यानंतर त्याच्या बापाला म्हणजे उग्रसेनाला राज्य दिलं. आपल्याकडे राज्य ठेवले नाही. म्हणजे पुष्कळांचा विरोध कमी करणं हा त्यात उद्देश आहे. कंस अत्यंत दुर्जन होता. त्यामुळे बरेचसे लोक त्याच्या राज्यकारभाराला कंटाळलेले होते. त्रस्त झाले होते. त्याचा नाश झाल्यावर पुष्कळांना आणखी बरं वाटलंय. परंतु त्याचे सहाय्य करणारे जे काही लोक होते त्यांना ही बातमी समजली आणि त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

कंसाच्या दोन स्त्रिया जरासंधाच्या मुली होत्या. त्यांनी जाऊन ही बातमी आपल्या पित्याला सांगितली. जरासंध म्हणजे मगध देशाचा राजा. तो त्या वेळेला मोठा अजिंक्य ठरलेला होता. त्याने एकट्याने संपूर्ण पृथ्वीवर दिग्विजय यात्रा करून जवळ जवळ २०,८०० लहान-मोठे राजे लोक आपल्या किल्ल्यामध्ये तुरुंगात टाकले होते. त्याचाही बंदोबस्त भगवंतांनी शेवटी केला आहे. पण आज तो मोठा विरोधी म्हणून सैन्याची जमवाजमव करून मथुरा राजधानीवर हल्ला करण्याकरता आलेला आहे. पहिला हा युद्धाचा प्रसंग आहे. आतापर्यंत एखाद्या राक्षस यायचा त्याला मारून टाकले की काम झाले अशी परिस्थिती गोकुळामध्ये असेपर्यंत होती. या वेळेला आता तो सैन्यासह आलेला आहे जरासंध. रामकृष्णांनी दोघांनी विचार केला, सैन्य मात्र जिवंत ठेवायचं नाही. जरासंधाला सोडून द्यायचं. तो पुन्हा सैन्य घेऊन येईल आणि पुन्हा त्या सैन्याचा आपल्याला नाश करता येईल. जे जे अशा प्रकारचे असुरी प्रवृत्तीचे भूमीला भार झालेले लोक आहेत त्या सर्वांचा नाश करायचा असं भगवंतांनी ठरीवलेलं आहे.

त्याप्रमाणे रामकृष्ण हे मथुरेतून बाहेर पडणार इतक्यात आकाशातून दोन रथ खाली आलेले आहेत. त्या रथाला उत्तम अश्व जोडलेले आहेत. त्यात सगळी आयुधेही आलेली आहेत. त्यांच्या धनुष्याचं नांव शारंग धनुष्य असं आहे. कौमुदी नावाची गदा आहे. अशी सगळी शस्त्र आली आहेत. बलरामजींना श्रीकृष्णांनी सांगितली, की आता आपण युद्धाला सुरुवात करू या. हे सगळं सैन्य मारायचं. पण जरासंधाला मात्र सोडून द्यायचं. दोघे बंधू रथात बसून बाहेर आले. जरासंधाने प्रतिज्ञा केली होती, कृष्ण हा यादव आहे. वसुदेवाचा मुलगा. या यादवाने आपल्या जावयाला मारलेलं आहे. तेव्हा एकही यादव जिवंत ठेवायचा नाही. अशी प्रतिज्ञा करून तो युद्धाला आलेला आहे. २३ अक्षौहिणी सैन्य त्याने एकट्याने जमा केलेलं आहे. भारतीय युद्धामध्ये दोन्ही पक्षांचं मिळून १८ अक्षौहिणी सैन्य होतं. ह्या युद्धात जरासंधाने एकट्याने २३ अक्षौहिणी सैन्य आणले आहे. जरासंधाने कृष्णांना सांगितलं, "तुझ्या बरोबर मी काही युद्ध करणार नाही. एक तर प्रत्यक्ष मामाला मारणारा तू आहेस दुसरं म्हणजे तू मित्रा आहेस." बलरामाला मात्र त्याने आव्हान केलेले आहे, "तुझी जर इच्छा, शक्ती असेल तर तू मला मार किंवा मी तुला मारीन. गोपालकृष्ण म्हणाले, "जरासंधा, उगीच बडबड कशाला करतोस? काय तुला पौरुष दाखवायचंय ते दाखीव की!" आणि युद्धाला सुरुवात झाली आहे.

रामकृष्णांचं अध्ययन झालेलं आहे. सर्व विद्या ज्यांच्यापासून आणखी प्रवृत्त झालेल्या आहेत, सर्व विद्यांचे भगवान गोपालकृष्ण स्वतः प्रवर्तक आहेत. पण नुकतेच सांदिपनी गुरुमहाराजांच्या आश्रमात जाऊन आणखी सर्व विद्या शिकून आलेले आहेत. धनुर्वेदाचं शिक्षण सांदिपनी गुरुमहाराजांनीच त्यांना दिलं आहे. सांदिपनी गुरुमहाराज प्रत्यक्ष युद्ध जरी करीत नसले तरी युद्ध करण्याची तयारी व्यवस्थित करून घेत होते. त्यांना सगळं अस्त्रज्ञान, मंत्रज्ञान आहे. आणि दोघांचं युद्ध सुरू झालेलं आहे. आणखी तेवढ्या सैन्याचा नाश करायला त्यांना काही विशेष विलंब लागला नाही. सर्व सैन्य मारलं. बलरामजींनी जरासंधाचे घोडे मारले. त्याला धरलं आणि बांधून घेऊन मथुरेमध्ये जायला निघाले. इतक्यात श्रीकृष्ण युद्ध आटोपून तिथे जवळ आले. "त्याला सोडून द्या." म्हणाले. "जा, तुला जीवदान दिलं आहे. तुझं पौरुष काय ते आता समजलं." काहीतरी बोलला आणि गेला निघून. त्यालाही पश्चात्ताप झाला आहे. हिमालयात निघून जावेसे वाटले. पण त्याची मित्रमंडळी राजेलोक होतेच. त्यांनी त्याला धीर दिला. आपण आणखी सैन्य जमा करू, पुन्हा या यादवांचा समाचार घेऊ वगैरे वगैरे बोलून पुन्हा त्यांनी सैन्याची जमवाजमव केली. पुन्हा आलेला आहे तो युद्धाला. असा सतरा वेळा युद्धाला आला. त्याने यादवांचा पिच्छा सोडला नाही. रामकृष्ण आणि सगळे यादव मारायचे. सतराही वेळेला सर्व सैन्य मारलं गेलं. त्याला पराजीत होऊन जावे लागले.

त्या वेळी एक कालयवन नावाचा यवनपती होता. म्हणजे त्या वेळेपासून हे यवन आहेत. ५००० वर्षांचा काळ होऊन गेलेला आहे. त्यांच्यातले वेगवेगळे प्रकार असतील. पण त्या कालयवनाचा उल्लेख मुद्दाम व्यासांनी केला आहे. तो धर्मविरोधी आहे. नारदांनी जाऊन त्याला कल्पना दिली. "अरे!, रामकृष्ण हे दोघे जण फार प्रसिद्ध झाले आहेत. जरासंधासारख्याचा त्यांनी पराभव केला. यादवांचा पराक्रम वाढत चाललेला आहे. कदाचित तुझ्यावरसुद्धा प्रसंग येण्याचा संभव आहे. कुणीकडून त्याला इकडे युद्धाला पाठवायचं आणि त्याचा नाश करायचा ही योजना नारदांनी

असायची. प्रत्येक वेळेला त्यांचा तो उद्देश आहे. त्याला सगळं कृष्णांच वर्णन केलं, कृष्ण कसा आहे, त्याच स्वरूप कसं आहे वगैरे सगळं सांगितलं. आणि तो कालयवन पुष्कळ सैन्य घेऊन युद्धाकरता आलेला आहे. मथुरा राजधानीला त्याने वेढा दिला.

गोपालकृष्ण विचारात पडलेले आहेत. हा तर म्हणाले, यवन नगरीला वेढा देऊन बसलेला आहे, एक दोन दिवसांनी जरासंध येणार म्हणून बातमी आलेली आहे. अठराव्या वेळेला पुन्हा हा तयारी करून आणि येणार. या यवनाबरोबर आम्ही युद्धात जर गुंतलो आणि जरासंध जर आला तर तो एकदम नगरीमध्ये जाईल. यादवांचा नाश करील, धरून घेऊन जाईल. काय करील याचा नेम नाही. म्हणून प्रथम मथुरा राजधानीमध्ये राहणारे सगळेही यादव स्त्री–पुरुष यांचे संरक्षण करण्याची व्यवस्था अगोदर करायची आहे. अस त्यांनी ठरीवले. विश्वकर्मा देवांचा शिल्पकार. त्याना आज्ञा केली, "बाबा!, आम्हाला समुद्रामध्ये एक विस्तीर्ण नगर बांधून दे. विश्वकर्म्याला काय वेळ लागला नाही. त्याने ते लगेच नगर तयार करून दिले." द्वारका नगरी तयार झालेली आहे. अद्यापि मथुरेचा दरवाजा बंदच होता, उघडलेला नाही. बाहेर ते कालयवनाचे सैन्य आहे. बाहेर जायला रस्ता नाहीये. दरवाजा उघडला की सैन्य आत घुसणार आणि युद्धालाच सुरुवात होणार. पुष्कळ यादव मारले जातील. म्हणून आपल्या योगसामर्थ्याने सर्वही मंडळींची रवानगी भगवंतांनी आपल्या ईश्वरीशक्तीने द्वारकेमध्ये केली. कदाचित ईश्वरीशक्ती कोणच्या प्रकारची आहे याची आपल्याला कल्पना येणार नाही. द्वारकानगरीमध्ये सुरक्षित असा तो जलदुर्गच तयार केला. चारही बाजूने समुद्र आहे. देवांच्या जवळ जे जे होतं ते भूमीवर आलेल्या श्रीहरिंना त्यांनी अर्पण केलेलं आहे. सुधर्मा नावाची देवसभा आहे. त्यात असेपर्यंत तहान नाही, भूक नाही, आधी–व्याधी काहीही व्हायची नाही. असा त्या सभेचा गुणधर्म आहे. आता मोठी सभा बांधल्यानंतर पुष्कळ तक्रारी येतात. बोलायला (वक्ता) लागल्यानंतर सर्व ठिकाणी ऐकूच येत नाही. बांधतानाच काही चूक झाली म्हणतात. ऐकून घ्यायचं नुसतं झालं.

तर याप्रमाणे सर्वांच्या संरक्षणाची योजना झाली. सगळी मंडळी बाहेर गेली. राजधानीमध्ये चिटपाखरू नाही. बलरामजींना सांगितलं, तुम्ही आतच थांबा. इतक्यात बाहेर येऊ नका. दरवाजा उघडून श्रीकृष्ण एकटेच बाहेर पडले आणि तो दरवाजा बंद झाला. आणि ते पळायला लागले. कालयवनाने त्यांना पाहिले. नारदांच्या सांगण्याप्रमाणे हाच श्रीकृष्ण आहे हे त्याने ओळखले. पळतो आहे, म्हणाला. श्रीकृष्णही निःशस्त्र, कालयवनही निःशस्त्र आहे. त्याला जाऊन धरावं म्हणून कालयवन त्याच्या पाठीमागे लागला. कृष्णांनी त्याला पुष्कळ लांब नेलेले आहे. आणि डोंगरावरच्या एका गुहेत ते शिरले. हा यवनही रागाने तिथे पळत पळत आलेला आहे.

तिथे एक कोणीतरी मनुष्य निजलेला होता. कालयवनाची कल्पना झाली की श्रीकृष्णच इथे सोंग घेऊन झोपलेला आहे. म्हणून त्याने त्या माणसाला जोराने लाथ मारली. तो एकदम जागा झाला आणि रागाने त्या कालयवनाकडे पाहिल्याबरोबर कालयवनाच्या शरीरात अग्नी उत्पन्न होऊन त्याच सर्व शरीर जळून भस्मसात झालेलं आहे. परिक्षित राजाने विचारले, तो कोण राजा होता? (तो झोपलेला मनुष्य कोण होता?) शुकाचार्य म्हणाले, तो मुचकुंद नावाचा राजा होता. देवांनी त्याची प्रार्थना करून आपल्या संरक्षणासाठी त्याला मुद्दाम स्वर्गलोकामध्ये बोलावून घेतले. तोही राजा पराक्रमी असल्याने दैत्यांना त्याची भीती वाटत होती. पुष्कळ वेळा दैत्यांचा पराजय करून त्यांना बाहेर घालवून दिलेलं आहे. तो जोपर्यंत देवांचा सेनापती होता तो पर्यंत दैत्यांचे सामर्थ्य त्याने वाढू दिले नाही. असा बराच काळ गेला. कार्तिकस्वामी देवांना सेनापती मिळाले.

देवांनी राजाला सांगितलं, "बाबा!, मुचकुंद राजा आता तू विश्रांती घे. भूलोकामध्ये तुझी कोणीही मंडळी शिल्लक राहिलेली नाहीत. इतका काल गेलाय. आप्त, इष्ट, बांधव कोणीही नाही. काय तुला पाहिजे तो वर मागून घे. कैवल्य म्हणजे मोक्ष मात्र मी देऊ शकत नाही. मोक्ष देण्याचं सामर्थ्य भगवान श्रीहरिंचं आहे. (देवांनी कबूल केलं)." राजा म्हणाला, "संरक्षणाचं काम फार कठीण आहे. तेव्हा फार जागरण झाल्यामुळे मला आता झोप घेण्याची इच्छा आहे." मग त्या देवांनी त्याला या गुहेमध्ये जाऊन निजायला सांगितले आणि पुढं म्हणाले, तुझी झोप पूर्ण होण्यापूर्वी जो मनुष्य तुला उठवील त्याच्यावर तुझी दृष्टी पडल्याबरोबर त्याचं शरीर दग्ध होऊन जाईल. आणि तसं आता

झालं. फाट्यानं फाटा फाडायचा तसा कालयवनाचा नाश झाला. गुहेमध्ये अंधारच होता. नंतर भगवान पुढे आहे. राजाने प्रश्न केला, "महाराज आपण कोण आहात? आपलं तेज पाहून वाटतं आपण सूर्यनारायण, अग्निनारायण वगैरे देवांपैकी तर नाही? अथवा साक्षात नारायण तर नाही ना? मला काही आपलं तेज सहन होत नाही." भगवान म्हणाले, "बाबा, माझ्या कोणच्या जन्माचा परिचय तुला द्यायचा? या जन्मामध्ये मी कोण झालेलो आहे एवढा परिचय करुन देतो. यदुकुलामध्ये वसुदेवाचा मी मुलगा आहे. वासुदेव माझं नांव आहे. अनेक दैत्य या ठिकाणी मानवरुपाने जन्माला आले आहेत. त्यापैकी बरेच दैत्य मारले. कंसाचा नाश केला. हा आता जो आला होता, तुझ्या नेत्राच्या तेजाने त्याचाही नाश झालेला आहे. हा त्यांच्यापैकीच एक होता. तुला वर देण्याकरता मी आलेलो आहे. काय पाहिजे तो वर मागून घे." मग त्याची खात्री पटली की हे साक्षात नारायण आहेत, वैकुंठपती. त्याने सांगितलं, "देवा, माझं सगळं आयुष्य आतापर्यंत फुकट गेलं. परोपकार झाला म्हणायचं, समजूत करून घेतो आपण. परंतु परोपकार नाहीये. "आता उरलो उपकारापुरता" हे जे आणखी ठामपणे सांगू शकतात त्यांनी परोपकार करावा. स्वार्थ ज्यांना काहीही राहिलेला नाही त्यांनी उपकार करावा. ती शक्तीही त्यांच्याजवळ असते. तेव्हा मुचकुंद राजा म्हणाला, "देवांना सहाय्य केलं पुष्कळ पण आयुष्य माझं फुकट गेलं. तुमची सेवा काही घडली नाही. तेव्हा आता मला दुसरा काहीही वर नको आहे. आपली कृपा व्हावी, सेवा मिळावी, स्मरण नेहमी घडावं एवढीच माझी इच्छा आहे."

श्रीकृष्णांनी सांगितली, "मुचकुंद राजा, तुझी बुद्धी सावध आहे. ते पाहण्याकरताच तुला मी वर माग म्हणून सांगितलं. माझ्याबद्दल तुझ्या अंतःकरणात भक्ती आहे, प्रेम आहे. त्यामुळे तुझं कल्याण होईल. तुझं कल्याण करण्याकरताच मी मुद्दाम आलेलो आहे. योगशास्त्र हे प्रयोगशास्त्र आहे. अभक्त जे आहेत, ते ईश्वराकडे लक्ष न देता आम्ही योगशास्त्रात सांगितल्याप्रमाणे प्रयोग करू, सर्व इंद्रिय, प्राण वगैरे जिंकू आणि त्यांना जिंकल्या नंतर आम्हाला पूर्ण सुख मिळेल असं म्हणतात. असा प्रयत्न करणारे जे आहेत त्यांचं मन जिंकल्यासारखं वाटलं तरी ते ताब्यात येऊ शकत नाही.

योगशास्त्रकारांनीसुद्धा सांख्यांच्या पंचवीस तत्त्वांमध्ये ईश्वराला स्थान दिलेलं नाहीये. आत्मा म्हणून एक तत्त्व मानलेले आहे. पण जिवात्मा आणि परमात्मा – एक नियम्य आहे आणि एक नियामक आहे. ही दोन तत्त्व मात्र योगशास्त्रकारांनी मुद्दाम मानलेली आहेत. ईश्वराच्याच प्रणिधानाने, ईश्वराच्याच उपासनेने, आणखी समाधीची सिद्धी होऊ शकते ह्याचा त्यांनी मुद्दाम उल्लेख केला आहे. मग त्याना वर दिला. "या जन्मामध्ये पुष्कळ तुझ्या हातून हिंसा झालेली आहे. युद्ध पुष्कळ झाली. पुढच्या जन्मात तू द्विज होशील आणि माझ्या भक्तीनं तुझं कल्याण होईल." असा त्याला आशीर्वाद दिला. आणि तो मुचकुंद राजा बाहेर पडलेला आहे. तो पूर्वीच्या युगातल्या होता. सगळी मंडळी लहान, झाड लहान, सगळी गुरं–ढोरं लहान त्याला दिसू लागली. कलियुग सुरू झालेलं आहे असं त्याला वाटलं. आणि मग तो हिमालयात निघून गेलेला आहे.

गोपालकृष्ण गुहेतून बाहेर पडले. राजधानीमध्ये परत आले. बलरामजी तिथंच थांबले होते. दोघांनी मिळून कालयवनाच्या सैन्यावरती हल्ला केला. ते सगळं सैन्य मारुन टाकलेलं आहे. पुष्कळ धन त्यांना मिळालं. ते धन घेऊन ते निघाले द्वारकेला. इतक्यात शेवटचा आणखी प्रयत्न करण्याकरता अठराव्या वेळेला तो जरासंध सैन्य घेऊन एकदम आलेला आहे. त्याचा तो वेग पाहिल्यावर ते धन वगैरे तिथेच टाकून रथातून रामकृष्ण पळायला लागले म्हणून तो त्यांचा पाठलाग करायला निघालेला आहे. रथातून उतरून एका डोंगरामध्ये वरच्या बाजूला चढून गेले दोघेही बंधू. जरासंधाने आपल्या सैनिकांना सांगितलं, आता कुठं शोध करत बसायचं? चारही बाजूंनी डोंगरच पेटवून द्या. आग लावलेली आहे. ते दुसऱ्या मार्गाने खाली उतरले. आणखी मुकाट्याने द्वारकेत येऊन पोहोचले. जरासंधही सैन्य घेऊन आपल्या देशाला परत गेलेला आहे. विजय मिळाला म्हणून, आनंद मानून आणि अहंकार जास्ती वाढवून गेला. ह्यात काही अहंकार वाढण्यासारखं झालेलं नाहीये. सापडले नाहीत ना शेवटपर्यंत. चारही बाजूने डोंगर पेटीवला; अर्थात ते जळून गेलेले आहेत, मारले म्हणून समजूतच करुन घ्यायचीये. ते जिवंत आहेत की नाही हे माहिती कुठाय? तो गेलेला आहे. त्याची खात्री पटलीच होती.

यानंतर भगवान गोपालकृष्णांचा गृहस्थाश्रम कसा झाला? याबद्दल आणखी पुष्कळ चरित्र शुकाचार्यांनी सांगितलेलं आहे. रुक्मिणी, जांबवती, सत्यभामा, कालिंदी, सूर्यकल्याणी, मित्रविंदा, कैकेयी, सत्या आणि लक्ष्मणा. मद्र देशाची राजाची लक्ष्मणा कन्या होती. म्हणजे कुठं कुठं संबंधी त्यांनी जोडलेले आहेत. पूर्वी हे सगळं स्वयंवर वगैरे असायचे आणि राजे लोकांच्या पराक्रमाची परीक्षा पाहण्याकरता काही विलक्षण पण त्यांनी ठेवलेले असायचे. शौर्य कसं आहे हे मुख्य पाहायचं क्षत्रियाचं. पैशाने आणखी मुली द्यायच्या नाहीत. पैसा आहे की नाही हे पाहून नाही. शौर्य पाहायचं. तशा प्रसंगामध्येही त्यांचे पुष्कळ विवाह व्हायचे. एका असुराने आणखी सर्व राजे लोकांचा पराजय करून त्या सगळ्या राजांच्या कन्या आपल्या बंदिखान्यात ठेऊन दिलेल्या होत्या. भौमासूर किंवा नरकासूर, प्राग्ज्योतिष प्रांताचा अधिपती म्हणजे आताच्या आसाम प्रांताचा अधिपती होता त्या वेळेला आणि मोठा शूर आणि क्रूर होता तो असुर. देवादिकांनासुद्धा त्याची भीती वाटत होती. ह्या सगळ्यांचा बंदोबस्त करून त्या सर्व स्त्रियांबरोबर विवाह झालेला आहे.

पहिला विवाह म्हणजे रुक्मिणी बरोबर विवाह आहे. विदर्भ देशातली ती राजकन्या. रामकृष्णांचा प्रभाव सर्वत्र सर्वांच्या कानावर गेलेला आहे. जरासंधाने कितीही प्रचार केला तरी सतरा वेळा पराजित होऊन तो गेलेला आहे हे ही सगळ्या लोकांना कळलंच होतं. त्याने प्रचार केला म्हणून काय होणार आहे? तेव्हा जरासंधासारख्याला आणखी पराजित करणारा कृष्ण आहे, बलराम आहे ही; त्यांची कीर्ती सर्वत्र पसरलेली आहे. कंसाला मारल्यामुळे जास्तच कीर्ती झाली. कंस आणि त्याचा सासरा, दोघांचाही बंदोबस्त करू शकतो गोपालकृष्ण ही खात्री लोकांची झालेली आहे. तर ह्या विदर्भ राजकन्येचं, रुक्मिणीचं वर्णन नारदांनी मथुरेच्या राजसभेमध्ये येऊन करावं आणि गोपालकृष्णांच्या गुणांचं, कीर्तीचं वर्णन भिष्मक राजाच्या सभेमध्ये येऊन करावं. रुक्मिणीच्या कानावरती ते गुण पडलेले आहेत. तिला वाटलं ह्यांच्या बरोबर विवाह व्हावा. नारदांनी तिकडे द्वारकेत जाऊन वसुदेव, देवकी व इतर वडीलधाऱ्या मंडळींना सांगावं, "अहो तुमच्या कृष्णाचं लग्न करा लवकर. एक उत्तम राजकन्या आहे विदर्भ देशाची." त्या रुक्मिणीच वर्णन तिथं करावं. गोपालकृष्णांनाही वाटलं चांगली आहे राजकन्या, विवाह करावा. ही सगळी पूर्व तयारी झालेली आहे. रुक्मिणीचे मातापिता, इतरही जी काही हितैषी मंडळी होती, त्या सगळ्यांना कृष्ण हा चांगला वर आहे असं वाटलं. पराक्रमी आहे, गुणी आहे, धर्मशील आहे, त्याला ही रुक्मिणी द्यावी म्हणून सर्व मंडळींचा विचार झाला. पण त्या रुक्मिणीचा ज्येष्ठ बंधू कृष्णाच्या विरोधी पक्षापैकी होता. तो पराक्रमीही होता. अतिरथी महारथींमध्ये त्याची गणना करता येण्यासारखी होती. आणि हट्टी होता.

तो म्हणाला, "नाही, कृष्णाला माझी बहीण द्यायची नाही." सगळा राज्य कारभार पाहत होता तो. बापाला अजून काही त्यानं बंदिखान्यात टाकलं नव्हतं. तो म्हणाला, "कृष्णाचं काय राज्य आहे? शिशुपाल माझा मित्र आहे. राजा आहे. त्या शिशुपालाला ही माझी बहीण द्यायची. त्याच्या पुढे कोणाला काही बोलता आलं नाही. आईबापांची इच्छा असून तरी काय करणार? शेवटी आता करायचं काय? रुक्मिणीच्या पुढं मोठा प्रश्न उभा राहिलेला आहे. कोणाजवळही ती बोलू शकत नव्हती ना! इच्छा जरी असली भगवान गोपालकृष्णांच्या बरोबर विवाह व्हावा. विदर्भातली अमरावती कुणीकडं आणि द्वारका कुणीकडं. किती लांब प्रदेश आहे! त्या वेळेला काय फोनची सोय होती? फोन हिला करता आला असता काय? स्वयंवर होईपर्यंत तिला बंदिखान्यातच टाकलं असतं त्याने. म्हणून त्या रुक्मिणीने भगवान गोपालकृष्णांची प्रार्थना करून, ईश्वराचं स्मरण करून रोज राजवाड्यात येणाऱ्या एक विश्वासू ब्राह्मणाला मनातलं वृत्त सांगितलं. आणि एक पत्र लिहून दिलं. म्हणाली, "भूदेवा!, एवढं पत्र गोपालकृष्णांना तुम्ही नेऊन द्या. माझी स्थिती त्यांना सांगा तुम्ही. आणि त्यांना घेऊन या" त्याने कबूल केलं. तो भूदेव गेलेला आहे. त्याच्या स्वतंत्र वाहनाची सोय कोण, राजा करणार होता? आता सध्या राष्ट्रीय कार्य करणाऱ्याला राजशासनाकडून मोटार मिळती. त्याने राजशासनाच्या विरोधी काही बोललं नाही म्हणजे झालं. राष्ट्रीय संतही पुष्कळ आहेत सध्या. त्यांचीही सगळी सोय होते म्हणे. तर तो बिचारा प्रवास करीत गेलेला आहे. द्वारकेमध्ये जाऊन पोहोचला. त्याचा आदर सत्कार झालेला आहे. कोणीही ब्राह्मण आल्यावर त्याचा सत्कार श्रीकृष्ण केल्याशिवाय राहत नसत. जेवण झालेलं आहे. आणि बोलत बसलेले आहेत. "काय भूदेवा?, कोणच्या प्रांतातून आलात? तुमच्या प्रांतामध्ये आणखी धर्माचरणाची व्यवस्था चांगली आहे ना? धर्माचरणाला विरोध करणारा कोणी आहे का, राजा वगैरे? काय तुमचं काम आहे सांगा."

गोपालकृष्णांच्या अंतःकरणामध्ये विप्रांच्या बद्दल किती आदरबुद्धी होती; याचं वर्णन करणारा श्लोक शुकाचार्यांनी मुद्दाम सांगितला आहे –

> विप्राम् स्वलाभ संतुष्टां साधून् भूत सुरुत्तमाम् ।
> निरहंकारमे शांता नमस्ये शिरसा ।।

विप्र कसे आहेत? तर स्वलाभ संतुष्टां – आपल्या कर्तव्याने (कर्तृत्वाने) मिळेल त्याच्यामध्ये संतोषाने राहणारे. साधू वृत्तीचे. सर्वही प्राण्यांशी अत्यंत मैत्रीने वागणारे. कोणाबद्दलही द्वेष नाही. निरहंकारी आणि शांत वृत्तीचे आहेत. त्यांना मी शिरसावंदन करतो म्हणून एक शब्द आहे त्यात. त्याचा अर्थ वारंवार मी त्यांना नमस्कार करतो. श्रीकृष्णांनी त्या ब्राह्मणाला विचारले, "काय काम आहे सांगा. निःशंकपणे सांगा."

ब्राह्मणाने सांगितलं, "आमच्या राजकन्येने आपल्याला पत्र दिलंय. फार संकटात सापडली आहे ती." सध्या म्हणजे एखादे मंडळ पाहिजे. युनियन पाहिजे. त्याशिवाय राजशासन दादच घ्यायला तयार नाहीये ना. युनियनचे पुढारी कसे असतात? काय करतात? कुणास ठाऊक. पण एक युनियन आहे म्हंटलं, की दाद लागते. एका व्यक्तीला कुणीही विचारायला तयार नाहीये. इथं देवाच्या दरबारात तसं नाही. एका रुक्मिणीचं पत्र आलंय. त्याचाही विचार झाला. ब्रह्मादिक देवांचे मंडळ गेले, भूभार फार झालाय वगैरे सांगितलं त्याचाही विचार झाला. परंतु जी खरी व्यक्ती आहे, तिची योग्यता मान्य केली पाहिजे. वैदिक संस्कृतीमध्ये व्यक्तीचंही महत्त्व आहे. आणि समुदायाचंही महत्त्व आहे.

रुक्मिणी लिहते आहे, "हे भुवनसुंदरा!, आपले गुण फक्त मला ऐकायला मिळालेले आहेत, ऋषिमंडळींच्या मुखातून. परंतु ते गुण ऐकल्यानंतरसुद्धा अंतःकरण शांत झालं आहे. समाधान मनाचं झालं आहे. प्रत्यक्ष आपले गुण पाहायला मिळाले नाहीत, ऐकायला मिळाले. आणि आपल्या रुपाबद्दल सुद्धा मी ऐकलंय, कसं आहे ते. हे सगळं ऐकून आणखी माझं अंतःकरण आपल्या ठिकाणी जडलेलं आहे. मी आपल्याला चित्तरमण केलेलं आहे. मला त्याच्याबद्दल पश्चात्ताप काही वाटत नाही. पूर्ण निश्चय मी केलेला आहे. तेव्हा माझं आणखी पाणिग्रहण आपण करावं. माझा स्वीकार आपण करावा. हा देह मी आपल्याला अर्पण केलेला आहे. या देहाला दुसऱ्या कोणत्याही राजाने स्पर्श करू नये अशी माझी इच्छा आहे.

आता कदाचित तुम्ही म्हणाल, "तू अंतःपुरात राहणारी राजकन्या. तुला आपल्यांना म्हणजे तुझे जे आप्त बांधव आहेत त्यांच्याबरोबर युद्ध करून त्यांना मारावं लागेल. हे कसं काय? तुला त्या शिवाय कसं काय नेता येईल?" तर त्या करता तिनं एक युक्ती केलेली आहे. ती म्हणाली आमच्या कुलदेवतेचे अमरावतीमध्ये एक मंदिर आहे. (अद्यापि ते मंदिर दाखीवतात.) आमच्या कुलाचाराप्रमाणे जी नववधू असेल ती राजवाड्याच्या बाहेर पडून, पायी त्या मंदिरात जाऊन, देवीची पूजा करून परत येते. हीच वेळ आहे. एवढं तिने फक्त सुचीवलं. अन् सगळ्या तयारीने या. हे काही सविस्तर नाही. व्यवस्थित तेवढं सुचवून दिलेलं आहे. आणि शेवटी लिहिलंय, "ब्रह्मादिक देवांनासुद्धा आपला प्रसाद व्हावा अशी इच्छा असते. जर माझ्या दुर्भाग्याने माझ्यावर कृपा झाली नाही तर मी हे शरीर ठेवणार नाही. एक जन्म नाही, जितके जन्म येतील, तुमची प्राप्ती होईपर्यंत मी शरीर ठेवणार नाही" असा निग्रह शेवटी व्यक्त केलेला आहे.

ब्राह्मणाने सांगितलं, "महाराज आपण मनावर घ्या. बिचारी फार दुःखी–कष्टी झाली आहे. तिचं दुःख आपण दूर करा." श्रीकृष्ण म्हणाले, "मलासुद्धा रात्री झोप लागत नाही. मला माहीत आहे तिचा थोरला भाऊ माझा द्वेष करतो. त्याने हे लग्न मोडलेले आहे. बरंय! चला. किती वेळ आहे? एक दोन दिवस आहेत. सारथ्याला बोलावून रथ तयार करायला सांगितले. त्या रथामध्ये त्या ब्राह्मणाला बरोबर घेतलं. ते वेगवानच अश्व आहेत. अश्वांचीही पूर्वी परीक्षा करणारी मंडळी होती. अश्वज्ञान त्या नळराजाला होतं म्हणतात. दिसायला अश्व जरी कसे दिसले तरी त्यांचा वेग किती

आहे, लक्षण काय आहेत, हे सगळं जाणणारी मंडळी होती. अशा दिव्य अश्वांची परीक्षा करून त्याचा संग्रहसुद्धा राजाकडे असायचा. हल्ली त्याला काही महत्त्व उरलेलं नाही. पेट्रोलचं सगळं काम चाललेलं आहे. अवकाशयान आहे. अमुक यान आहे. सगळं चाललेलं आहे.

निघाले, श्रीकृष्णांचा रथ निघालेला आहे. बलरामजींना नंतर समजलं. बऱ्याच वेळाने. कुणी तरी एक ब्राह्मण विदर्भ देशातून आला होता. कृष्ण म्हणे एकटाच गेलेला आहे. तिकडची सगळी बातमी हेरांनी आणून दिली होती, बलरामजींच्या जवळ. सगळे राजे तिथं जमलेले आहेत. जरासंध तर मुख्यच आहे त्यांचा. पण विरोधी पक्षाचे शाल्व राजे आहेत, गोंदक राजे आहेत. रुक्मिणीचा ज्येष्ठ बंधू हे लग्न होऊ देणार नाही. असे आत–बाहेर सगळे विरोधी राजे सैन्यासह जमा झालेले आहेत. हे बलरामजींना समजल्यावर त्यांनीही आपली यादवसेना तयार केली. आणि ते ही वेगाने निघाले बंधुला सहाय्य करण्याकरता.

संध्याकाळ झाली. उद्याला आता एक रात्र राहिली. उद्या विवाह होणार. श्रीकृष्णही नाही आणि तो ब्राह्मणही आलेला नाहीये. अत्यंत दुःखी झाली रुक्मिणी. काय करावं म्हणाली. शंकरांची, भूमिदेवीची सगळ्यांची मी पूजा केली आतापर्यंत परंतु माझी इच्छा काही पूर्ण होत नाहीये. अश्रू आले नेत्रातून. इतक्यात तिचा डावा भुज म्हणा डोळा म्हणा स्फुरण पावला. शुभ शकून झालेला आहे. आणि सहज डोळे उघडून ती दरवाजामध्ये पाहते तो ब्राह्मण उभा राहिलेला आहे. द्वारकेला गेलेला, पत्र घेऊन गेलेला ब्राह्मण. प्रसन्न आहे. आलेला आहे खाली पायऱ्या उतरून. आणखी त्याने सांगितलं, "रुक्मिणी, भगवान गोपालकृष्णांच्या रथातून मी आलो आहे. त्यांनी तुला निरोप दिलाय की मी तुला घेऊन जाईन काही चिंता करु नकोस." असं आश्वासन दिलेलं आहे. त्या लक्ष्मीला वाटलं आता या ब्राह्मणाचे केवढे उपकार आहेत! काय द्यावं याला? या ब्राह्मणाला देण्यासारखं काही नाहीये माझ्याजवळ आणि त्या लक्ष्मीदेवीनं ब्राह्मणाच्या पायावर मस्तक ठेवलं आहे. साक्षात भगवंतांची प्राप्ती झाली मला तुमच्यामुळे, म्हणाली.

झालेलं आहे. समाधान झालेलं आहे चित्ताचं. दुसऱ्या दिवशी सकाळी ठरल्याप्रमाणे ही राजकन्या देवीच्या दर्शनाला राजवाड्यातून बाहेर पडलेली आहे. चालत जायचं हा नियम आहे. रस्ता मोकळा आहे. राजकन्या जाऊन येईपर्यंत रस्त्यावर कोणीही फिरकायचं नाहीये. सशस्त्र सैनिक फक्त दोन्ही बाजूला उभे राहिलेले आहेत. मधला रस्ता मोकळा आहे. रुक्मिणीला पाहायला आलेले राजे लोक त्याच रस्त्याच्या बाजूला आपापल्या वाहनात बसलेले आहेत. मैत्रिणींबरोबर बोलत बोलत ती याच रस्त्याने देवीच्या दर्शनाला गेलेली आहे. देवीला तिने शेवटची प्रार्थना केली, "जगदंबे, तुला आणि तुझ्या परिवाराला मी नमस्कार करतेय. भगवान गोपालकृष्ण माझे पती व्हावेत एवढी माझी इच्छा पूर्ण कर. असा मला आशीर्वाद दे." अशी प्रार्थना करून ती बाहेर पडली. आणि आता राजवाड्याकडे जायचंय. कोण कोण राजे लोक आलेत ते पाहत पाहत निघाली. तिच्या मैत्रिणी बरोबर होत्या. हा अमुक राजा आहे, तो तमुक राजा आहे, अशी त्या माहिती देत होत्या. इतक्यात गोपालकृष्णांचा रथ ज्या ठिकाणी उभा होता तिथं त्या येऊन पोहोचल्या.

तिथंच थांबली रुक्मिणी. दोघांची दृष्टादृष्ट झाली. ऐकलेलं होतं रूप आजपर्यंत. पण हेच ते गोपालकृष्ण अशी तिची खात्री झाली. आता एक क्षणाचासुद्धा विलंब होऊन चालणार नाहीये. लगेच गोपालकृष्णांनी आपला हात दिला. तिनंही हात दिलेला आहे. तिला आणखी आपल्या रथामध्ये घेतलं. सारथ्याला सगळं आधीच बजावून ठेवलं होतं, "रुक्मिणीचं पाऊल रथामध्ये पडल्याबरोबर तुझे घोडे वेगाने निघाले पाहिजेत" झालं. त्याने इशारा केला. रस्ता मधून मोकळाच होता. निघाले घोडे गेलासुद्धा रथ भर वेगाने. आणि मग हे लोक म्हणतायत. अरे! अरे!, आपल्या डोळ्यासमोर नेली की रुक्मिणी. तो जरासंध म्हणाला, "चला, आपण त्या कृष्णाबरोबर लढाई करु, पराजय करु, रुक्मिणीला आणू." आणखी नंतर युद्धाला सुरुवात झालेली आहे. तोपर्यंत कृष्णांचा रथ त्यांच्या सैन्यामध्ये येऊन पोहोचलेलाही होता. आता युद्ध सुरु होणार! रुक्मिणीला भीती वाटली. किती मोठमोठे पराक्रमी राजे एका बाजूला होते आणि गोपालकृष्ण, बलरामजी व यादव दुसऱ्या बाजूला. श्रीकृष्णांनी सांगितले, "तुला आता भिण्याचं कारण नाहीये. हे यादवसुद्धा काही कमी पराक्रमी नाहीत. बघ तू आता यांचा काय पराक्रम आहे ते."

श्रीकृष्णांना आता रुक्मिणी मिळाली होती. यादवांचा उत्साह जास्ती वाढलेला आहे. पुष्कळ युद्ध झालेलं आहे. सर्व राजे लोकांचा पराजय झाला. जरासंधाने येऊन शिशुपालाची समजूत काढली. "बाबा!, दैवयोग आहे. यादवांनी आपल्याला जिंकलं आज. जाऊ दे. मलासुद्धा सतरा वेळा या कृष्णाने पराभूत केलं. तरी मी शेवटी एकदा जिंकलो." निर्लज्ज, अहंकारी माणसाचे आपण अहंकार व्यक्त करीत असताना किती निर्लज्जपणा करतोय इकडे लक्ष जात नाही. तो पुढे म्हणाला, "पुन्हा आपल्याला वेळ मिळाला तर सैन्य जमा करून यांचा समाचार घेऊ." सगळे राजे आणि नियुक्त झालेला वर शिशुपालही निघून गेलेला आहे. रुक्मिला हकीकत समजली. की रुक्मिणीला कृष्णाने नेलेलं आहे. तेव्हा तोही सैन्य घेऊन निघालेला आहे. द्वारकेच्या रस्त्यावर त्याने कृष्णांना गाठलं. म्हणाला, "थांबा!, माझ्या बहिणीला मुकाट्याने सोडून दे नाहीतर तुला मी ठार मारीन." त्याच्या सारथ्याला त्याचा रथ एका बाजूला उभा करायला सांगितला. श्रीकृष्णांबरोबर त्याच युद्ध सुरू झालं. त्याला शस्त्र टाकण्यालासुद्धा ते देईनात. हातामध्ये शस्त्र घेतलं की यांच्या बाणाने त्या शस्त्राचे तुकडेच व्हावेत. त्याला शस्त्र टाकताच येईना. घोडे मारले त्याचे, सारथी मारून टाकला. धनुष्य तोडून टाकला. सगळी शस्त्रास्त्र तोडून पडल्यावर मग हातात तलवार उपसून रथातून उडी मारून कृष्णांना मारण्याकरता तो धावत धावत निघालेला आहे. इतक्यात त्यांनी बाणांनी रुक्मिची तलवार आणि ढाल तोडून टाकली. त्यांच्या जवळ तो जाताच त्यांनी तलवार उपसली रुक्मिला धरलं, त्याच्या केसांना, त्याला आता ठार मारणार एवढ्यात रुक्मिणीने पायावर मस्तक ठेवलं. "माझ्या बंधुला जीवदान द्या." अशी प्रार्थना केली. शास्त्रकार सांगतात भगिनी ही दयेची मूर्ती आहे. ते भगिनीप्रेम अशाप्रकारचं विलक्षण आहे. पण आता स्वराज्य मिळाल्यानंतर मात्र ते शिल्लक राहिलेलं नाही. 'हिंदू कोड बिल' पास झालेलं आहे. सगळ्यांना माहीत आहे. आणखी त्यात पुन्हा अशी व्यवस्था केलेली आहे की पित्याचा जो दायभाग आहे तो मुलाप्रमाणे मुलीलाही वाटून दिला पाहिजे. पूर्वी पिता जिवंत असो किंवा नसो भावाची आपल्या बहिणीचं लग्न करून द्यायची, त्यासाठी हवा तेवढा खर्च करायची तयारी होती, प्रेम होत. आता बहीण वाटेकरी झाल्यावर तो कशाला करेल? इतरांचे दावे पूर्वी कोर्टात येत. भाऊ बहिणींचे दावे दाखल करायची सोय मात्र स्वराज्य मिळाल्यानंतर झालेली आहे. ही फार मोठी गोष्ट आहे. असो! काय आपल्याला करायचंय?

तर रुक्मिणी प्रार्थना करतेय, माझ्या भावाला सोडा महाराज. श्रीकृष्ण म्हणाले, "बरंबा, तुझ्याकरता सोडतो म्हणाले. नाहीतर हा जिवंत ठेवायच्या योग्यतेचा नाही. तुला किती त्रास दिलाय माहिती आहे आणि तरी याला जिवंत ठेवायचे? ठीक आहे." त्याचे सगळे केस कापून टाकले. आणि रथाच्या चाकाला त्याला बांधून टाकले. इतक्यात बलरामजीही श्रीकृष्णांच्या रथाजवळ आले आहेत. आता रुक्मिणीला बरं वाटावं म्हणून बोलतायत, "काय हा कृष्ण!, अतिशय रागीट आहे. असाच वागतो. ऐकत नाही, काही नाही." कृष्णांना म्हणाले, "अरे!, हा आपला आता आप्त झालाय. एवढं तुझ्या कसं लक्षात आलं नाही? रुक्मिणीचा हा भाऊ आणि याचा तू अपमान केलास?" रुक्मिला सोडलं बांधलेलं आणि म्हणाले, "तू जा घरी." पुन्हा रुक्मिणीला म्हणतायत, " काय करावं रुक्मिणी!, आमचा क्षत्रियांचा धर्म फार कठोर आहे. सख्खा भाऊ जरी आमच्या समोर युद्धाला उभा राहिला तरीसुद्धा आम्ही त्याला ठार मारतो. काय करणार! आमचा धर्म कठोर असल्याने केलं असेल कृष्णाने. तू काही मनावर घेऊ नकोस." आणि मग निघाली सगळी मंडळी. द्वारकेला येऊन पोहोचली. कन्येचं हरण करून आणून विवाह करणं हा राक्षस विधी आहे. परंतु द्वारकेमध्ये गेल्यावर ब्राह्मविधीप्रमाणे यथाविधी व्यवस्थित विवाह पार पडला सगळा. अनेक राजे लोक वगैरे आले होते विवाहाला. इतर सगळ्याही राजकन्यांच्या कानावर ही बातमी गेलेली आहे की कृष्णाने सर्व राजांचा पराजय करून, रुक्मिणीचं हरण करून आणून तिच्या बरोबर विवाह केला आहे, तिची इच्छा जाणून, पूर्ण करण्याकरता. तर याप्रमाणे पहिला विवाह झाला आहे.

दुसरा विवाह जांबवंतीबरोबर झालेला आहे. सत्यभामा आपण म्हणतो. रुक्मिणीच्या बरोबर सत्यभामेचं नांव येतं ऐकायला. सत्यभामेचा जो पिता सत्राजित नावाचा, तो सूर्याचा भक्त होता. सूर्यनारायणांनी त्याला एक दिव्य मणी दिला होता. त्याने तो दिव्य मणी आपल्या घरात मंदिर बांधून ठेवला होता. त्या मण्याचा प्रकाश जिथे पडेल तिथे सुवर्ण निर्माण व्हायचं. असा पुष्कळ त्याचा प्रभाव होता. तसेच तो मणी जिथे असेल तिथे आधी नाही, व्याधी नाही, कधी दुष्काळ पडणार 'नाही. असा त्याचा प्रभाव होता.

श्रीकृष्णांनी एकदा त्या सत्राजिताला राजसभेमध्ये बोलावलेलं आहे. त्याला सांगितलं, "हा मणी तुझ्याजवळ राहणं म्हणजे धोका आहे. तू तो या यादवांचा राजा उग्रसेन आहे, त्याला दे. राजाच्या भंडारखान्यामध्ये सुरक्षित तो राहील." एवढंच ते बोलले. पण तो सत्राजित पुष्कळ लोभी होता. त्याने काही श्रीकृष्णांचे ऐकलं नाही. एके दिवशी त्याचा बंधू तो मणी कंठामध्ये बांधून शिकारीला गेला. जंगलामध्ये एका सिंहाने त्याच्या भावाला आणि त्याच्या घोड्याला ठार मारलं आणि तो मणी सिंह घेऊन गेला. पुढे त्या सिंहाला जांबवान नावाचा अस्वलांचा राजा होता, त्याने मारले आणि तो मणी घेऊन जांबवान आपल्या गुहेत आला. त्याने तो आपल्या मुलाच्या पाळण्याच्यावर बांधून ठेवला. हा जांबवान राजा रामावतारापासून होता म्हणतात.

इकडे या सत्राजिताने काय केलं, दोन दिवस वाट पाहिली. आपला शिकारीला गेलेला बंधू परत आला नाही आणि तो मणीही नाही. मग प्रत्येकाजवळ सांगायला सुरुवात केली. श्रीकृष्णाने मणी मला उग्रसेन राजाजवळ द्यायला सांगितलं होतं. मी त्याचं ऐकलं नाही म्हणून कृष्णानेच माझ्या भावाला मारलं आणि तो मणी घेतला आहे. अपकीर्ती व्हायला काही वेळ लागत नाही. अत्यंत शुभ्र, शुद्ध, धवल यश ज्याचं आहे त्या धवल यशामध्ये थोडसं खरं–खोटं कोण विचार करतंय. ऐकतायत सगळे लोक. याने त्याच्याजवळ, त्याने त्याच्याजवळ सांगितलं असं करता करता सगळ्यांच्या कानावर ही बातमी गेली. शेवटी श्रीकृष्ण काही मंडळींना घेऊन त्या मण्याचा शोध करण्याकरता बाहेर पडले.

अपकीर्ती दूर करणं हे मोठं कठीण आहे. आणि अपकीर्तीची लज्जा ही उरली नाही म्हणजे राज्यशासन हे अगदी अयोग्य ठरत असं म्हणायला हरकत नाही. बाहेर पडल्यावर त्यांना प्रथम जंगलामध्ये तो सत्रजिताचा बंधू आणि त्याचा घोडा मरून पडलेला दिसला. याला कोणीतरी मारलंय आणि मणी नेलाय म्हणाले. त्याच रस्त्याने पुढे गेले. तो मोठा सिंह मरून पडलेला दिसला. म्हणजे यालाही कोणीतरी मारलंय आणि मणी नेलाय. आणि पुढे जाता जाता एक मोठी गुहा त्यांना लागली. आत उतरायला पायऱ्या आहेत. त्या सगळ्या बरोबरच्या यादवांना दरवाजातच थांबायला सांगितलं. "मी आत जाऊन चौकशी करून येतो." म्हणाले. आत गेले. आत मोठी गुहा आहे; त्यांत एक मोठा प्रासाद आहे. आणि त्यातल्या एका खोलीतल्या पाळण्यात वर तो मणी बांधलेला आहे.

तो मणी घेण्याकरता श्रीकृष्ण जाताच तिथल्या दासीच्या लक्षात आलं कोणीतरी नवीन मनुष्य आला आहे. ती ओरडू लागली. तिचे ओरडणे ऐकून जांबवान राजा धावत आला. त्याचं आणि कृष्णांचं द्वंद्व युद्ध सुरू झालं. सव्वीस–सत्तावीस दिवस अहोरात्र युद्ध झालं. बाहेर गुहेच्या दरवाजाजवळ थांबलेली यादव मंडळी दहा बारा दिवस वाट पाहून द्वारकेला निघून गेली. कृष्ण त्या गुहेत गेलेत; त्यांचा अजून पत्ता नाही; एवढंच म्हणाली. पण आत गुहेत जावं, त्यांचा शोध घ्यावा ही दृष्टीच नाहीये ना! "आत्मीयता कशाला म्हणायची? भूता परस्परे पडो मैत्र जिवांचे" ही प्रार्थना ज्ञानेश्वर महाराजांना देवाजवळ करायची पाळी आलेली आहे. सौहार्द्र नाहीये. आपण कदाचित सापडलो तर काय होईल? आपण जिवंत राहिलो पाहिजे. कृष्णांचं काही का होईना. ही पहिल्यापासून सवय आहे आपल्या बुद्धीला. तो मोठा दोष आहे.

सगळे सावध घाबरले. वसुदेव, देवकी, रुक्मिणी सगळ्यांना आणखी दुःख झालं. दुर्गादेवीची उपासना सुरु झालेली आहे. जांबवान दमला. शेवटी आणि त्याची 'खात्री झाली की हा प्रत्यक्ष राम आहे. कृष्ण जरी असला तरी हे रामांचच रूप आहे. शरण आला तो. म्हणाला, "रामराजा!, त्या वेळेला मी होतो, सुग्रीवाच्या सैन्यामध्ये. आणखी आज इतक्या दिवसांनी आपलं दर्शन मला झालेलं

आहे." श्रीकृष्ण म्हणाले, "बाबा रे, या मण्यामुळे माझी अपकीर्ती झाली. कृष्णाने मणी चोरला असं सगळे म्हणतात. ते दादासाहेब तिकडे जाऊन बसलेत. तोंडावर कोणी बोलत नाही पण त्या मण्यामुळे हे सगळं झालंय. तेव्हा मी त्या मण्याकरता आलोय."
तो जांबवान म्हणाला, "देवा, सध्या मणी माझ्या ताब्यात आहे. तेव्हा माझी कन्या जांबवती मी आपल्याला देतो आणि तो मणीही देतो. म्हणजे लग्नासाठी स्वतंत्र खर्च करायची जरुरी नाही मला." पण तो राजाच होता त्याने केला असेल खर्च. जांबवतीबरोबर श्रीकृष्णांचा विवाह झाला. आणि तो मणी घेऊन परत आले श्रीकृष्ण. राजदरबारामध्ये सगळ्यांना बोलावून तो दाखीवला. आणि तो कसा मिळाला ते सांगितलं. कोणी विचारलं असतं तर ती जांबवती साक्षीदार होतीच. असो! याप्रमाणे तो मणी मिळाला, अपकीर्ती दूर झाली. हे सगळं त्या स्यमंतक मण्याचं आख्यान सांगितल्यावर शुकाचार्य महाराजांनी लिहिलेलं आहे की, "चोरी न करता चोरीचा आळ ज्याच्यावर आला असेल त्याने हे पठण करावं; म्हणजे तो आळ जाईल."

म्हणजे खरोखर चोरी केल्यानंतर याचा उपयोग नाही. जर केली नसताना आळ आला असेल तर याचा उपयोग आहे, असं सांगितलं आहे. याप्रमाणे त्या मण्याच्या बाबतीत इतका त्रास झाला. ते दोघे भाऊ मारले गेले, तो एक यादव मारला गेला. शेवटी कृष्णांना इतके दिवस अपकीर्तीमध्ये काढावे लागले. सगळेच संशय घेतात. यांनीच घेतलाय. पण चौकशी कोण करणार? तेव्हा स्वतः निर्दोष आहोत हे स्वतःच दाखवायला पाहिजे; हे राजांचे तत्त्व आहे. रामांचं तत्त्वही हेच होतं. 'अमुक मनुष्य निर्दोषी आहे.' असा फोन आल्यानंतर न्यायाधिशांनी त्याला सोडून दिलं हे उपयोगी नाहीये. ही निर्दोषीपणाची पद्धती अत्यंत घातक आहे. असं जर व्हायला लागलं तर सगळेच निर्दोष सुटतील. जो दोषी आहे त्याने आपण निर्दोषी आहोत हे स्वतः सिद्ध केलं पाहिजे. याप्रमाणे हा एक प्रसंग मोठा झालेला आहे.

अशारीतीने कोणाचं हरण केलेलं आहे, तर कोणा राजाने आपली बहीण, कन्या, श्रीकृष्णांना दिलेली आहे. अनेक मोठमोठ्या राजांशी संबंध हे जोडले पाहिजेत. मैत्री ती आहे. विरोध जास्ती वाढीवण्यापेक्षा मैत्रीची वृद्धी झाली पाहिजे. राज्य संरक्षणाच्या दृष्टीने तोही एक विचार केला पाहिजे. युद्ध हे शेवटचं आहे अगदी. याबाबत आणखी एक कथा मुद्दाम शुकाचार्य महाराजांनी सांगितली आहे.

त्या वेळेला कोसल देशाचा एक राजा श्रीमंत होता. संपत्ती ही पाहिजे राजाला. त्याचप्रमाणे उत्तर राजाशी संबंधही पाहिजे. म्हणून गोपालकृष्ण आणखी त्या राजाकडे गेले. नग्नजित राजा त्याचं नांव. त्याची कन्या सत्या नावाची होती. गोपालकृष्णांचा सत्कार झाला. त्यांची कीर्ती सगळीकडे पसरलेली होतीच. राजाने सत्कार केला. गोपालकृष्णांनी सांगितलं, "राजेसाहेब, क्षत्रियाने याचना करणं हे शास्त्रविरुद्ध आहे. त्याने याचना कधी करू नये. आपल्या पराक्रमाने काय मिळवायचं ते मिळवावं. परंतु मी तुमची मैत्री मिळावी या करता, तुमच्या कन्येला मागणी घालण्याकरता मी आलो आहे."
राजा म्हणाला, "तुमच्यासारखा श्रेष्ठ वर माझ्या कन्येला मिळतोय हेच माझं भाग्य आहे. परंतु त्यासाठी जामातांची परीक्षा घेण्याचा एक पण मी केलेला आहे. एका मोकळ्या जागेत सात मोठे धिप्पाड बैल, ज्यांना वेसण वगैरे काही नाही, असे मोकळे सोडलेले होते. त्या सात बैलांना वेसण घालून आणखी बांधून ठेवणारा जो राजपुत्र आहे त्याला माझी कन्या मी देणार आहे. आजपर्यंत अनेक राजपुत्र आले. परंतु त्या बैलांना काही कोणाला बांधून ठेवता आलं नाही. उलट त्या बैलांच्या मुळेच कुणाचे हात तुटले. डोकं मोडले, कुणी मरून गेले. अशी स्थिती झाली." कृष्णांनी लगेच सात रुपं धारण केली आणि त्या सात बैलांना बांधून टाकलं आहे. किती वेळ लागणार आहे! आणि मग तो विवाह मोठ्या समारंभाने राजाने केलेला आहे. ज्यांच्या कंठामध्ये सोन्याचे अलंकार आहेत, उत्तम भरजरी वस्त्र नेसल्या आहेत. अशा तीन हजार दासी त्या राजाने आपल्या कन्येबरोबर दिल्या. नऊ हजार हत्ती दिले त्यांनी. म्हणजे जवळचे सगळेच हत्ती दिले नाहीत. हजारो हत्ती असतील त्याच्या जवळ त्यातले नऊ हजार दिले. मुली बरोबर काय सगळेच देऊन टाकतोय काय तो? स्वतःजवळ काही ठेवील की नाही? पण नऊ हजार हत्ती त्याने दिले. हत्ती देणाराही मोठा आणि घेणाराही मोठा आहे. हत्ती पोसणं मोठं कठीण काम आहे. गायीचं दान आम्ही करतो म्हणतात. पण, शहरात राहणाऱ्यांनी गायीचं दान घ्यायचं कुठं? बांधायची कुठं गाय? तिची व्यवस्था कुणी

करायची? म्हणून घेणाऱ्यालाही विचार करावा लागतो.

त्यानंतर पुढची संख्या शुकाचार्यांनी सांगितलेली नाही. नऊ हजार गुणिले शंभर इतके रथ दिले. त्यानंतर रथापेक्षा शतपट नोकर चाकर दिले. वस्त्रे, पात्रे, अलंकार किती दिले याचा तर हिशोबच नाही. इतका नजराणा घेऊन श्रीकृष्ण निघाले आहेत द्वारकेला यायला. राजशासनाला अर्थसंग्रहाची अत्यंत जरुरी आहे. त्या करता आपल्या जवळचा अर्थसंग्रह कमी पडला तर आपले जे मित्र राजे आहेत, त्यांच्याकडून सहाय्य घ्यावं लागलं. तसं घेतलं तर हरकत नाही. कर्ज म्हणूनच घ्यायचं असं नाही. त्यांचे त्यांना पुन्हा देऊन टाकायचं असतं. तर तशा रीतीने अर्थ संग्रहाची जरुरी असल्यामुळेही हा संबंध त्यांनी मुद्दाम जाऊन मागणी घालून जुळवलेला आहे. अशारीतीने या स्त्रियांशी त्यांचा प्रथम संबंध आलेला आहे.

त्यानंतर प्रागज्योतिष प्रांताचा (हल्लीच्या आसाम प्रांताचा) अधिपती नरकासूर जो होता, त्या नरकासुराबरोबरही युद्ध केलं त्यांनी. देवेंद्रालासुद्धा आणखी भीती वाटत होती, त्या नरकासुराची. त्याने स्वर्गलोकात जाऊन देवेंद्राच्या सिंहासनावरच छत्रच त्याने आणलं होतं. देवेंद्राने विनंती केल्यावरून भगवान गोपालकृष्ण गरुडावर बसून आणि त्या नरकासुराबरोबर युद्ध करण्यासाठी गेले. त्याचे असुर सेनापतीही पुष्कळ पराक्रमी होते. पण त्या सर्वांचा गोपालकृष्णांनी नाश केला. शेवटी नरकासुरालाही मारलं आणि नंतर त्याच्या मुलाला राज्याभिषेक केला. त्याही वेळेस त्यांना पुष्कळ धन मिळालं. ऐरावताच्या कुळात उत्पन्न झालेले पांढरे शुभ्र हत्ती मिळाले. प्रत्येकाला म्हणे चार चार दात होते. म्हणजे असे हत्ती आपण ऐकलेसुद्धा नसतील. इतरही पुष्कळ धन मिळालं. सोळा हजार राजकन्या नरकासुराने बंदिशाळेत ठेवल्या होत्या. त्यांची मुक्तता केली. निरनिराळ्या वाहनांतून त्यांना द्वारकेला पाठवून दिलं. शिवाय त्या नरकासुराने जे काही देवलोकातून आणलं होतं, ते देवलोकामध्ये जाऊन इंद्राला दिलेलं आहे. त्याची भीती दूर केली.

सत्यभामा त्यावेळी बरोबर होती म्हणतात. देवलोकातून निघण्याच्या वेळेस, ती म्हणाली, "समुद्रातून उत्पन्न झालेला कल्पवृक्ष – पारिजातक वृक्ष आहे, तो आपल्या वाड्यात लावण्यासाठी घेऊन जाऊ." श्रीकृष्ण म्हणाले, "बरंय, घेऊन चला." पण तो वृक्ष नेण्याच्या वेळेस, सगळ्या देवांनी विरोध केला. नाही न्यायचा चतुर्दश रत्नांपैकी एक रत्न आहे ते आमचं. इंद्रादिक देवांच्यामुळे त्यांची अशी अवस्था झाली. शेवटी देवांबरोबर युद्ध करून त्यांचा पराजय केला.

मग द्वारकेत आल्यावर एकाच मुहूर्तावर सोळा हजार राजकन्यांबरोबर श्रीकृष्णांचा विवाह झाला. इथं कोणाला संशय येईल एक वर आणि सोळा हजार वधू हे कसं काय? तर त्याचं स्पष्टीकरण शुकाचार्यांनी दिलेले आहे. निरनिराळे वाडे आहेत, निरनिराळे मांडव आहेत आणि निरनिराळे गोपालकृष्ण आहेत. साम्यवाद करायचा झाला तर असं करून दाखवावं. नुसतं साम्यवाद साम्यवाद म्हणून काय उपयोग आहे? प्रत्येक घरातले गोपालकृष्ण वेगळे–वेगळे, उपाध्याय निराळे. लाऊड स्पीकरवर उपाध्यायांनी मंत्र म्हणायचे आणि सगळ्यांनी ऐकायचे, असा अर्थ नाहीये. नारदांनासुद्धा आश्चर्य वाटलं. इतका मोठा गृहस्थाश्रम श्रीकृष्ण करतात तरी कसे? म्हणून एके दिवशी त्यांनी मुद्दाम ठरीवलं की आजचा सबंध दिवस यांची परीक्षा करण्यात घालवायचा. प्रत्येक वाड्यात जाऊन तपासणी करायची, गोपालकृष्ण कुठे कुठे आहेत? आता नारदमुनी स्वतः ब्रह्मज्ञानी मोठे योगी. सगळे वाडे हिंडून आले. पण प्रत्येक वाड्यात गोपालकृष्ण कोणत्या ना कोणत्या कामामध्ये निमग्न आहेत हे त्यांना दिसून आले. यासाठी स्वतंत्र एक अध्याय वेदव्यासांनी मुद्दाम घातलेला आहे. नारदांची खात्री झालेली आहे की गोपालकृष्ण प्रत्येक वाड्यात आहेत. त्या लोकांच्या दृष्टीने उपेक्षित, इतके दिवस बंदिशाळेत असणाऱ्या राजकन्यांचाही विवाह झालेला आहे. त्यांच्यावरही देवाने कृपा केली आहे. हे एक कर्म झालं. याच्यानंतर पुष्कळ लीला सांगितल्या आहेत त्यांनी.

मध्ये एक चरित्र प्रसंगाने असं दिलंय की सगळी यादवांची मुलं एकदा खेळण्याकरता बाहेर वनामध्ये गेली होती. द्वारकेच्या बाहेर ते वन होतं. तहान लागल्यामुळे एका विहिरीजवळ आली ती मुलं. तिथं एक मोठा सरडा पडलेला होता. आणल्या, दोऱ्या आणल्या. फास तयार केले. त्याला बांधले. वर ओढायला लागले. तो काही वर आला नाही. गोपालकृष्णांना जाऊन सांगितलं. ते आले लगेच.

त्याला लगेच आणखी डाव्या हाताने उचललं आणि वरच्या बाजूला ठेवलं. लगेच त्या सरड्याचं रूप नाहीसं झालं आणि तो देवाच्या रुपाने प्रगट झाला. त्याला श्रीकृष्णांनी विचारले, "कोण आहेस तू? तुला अशी योनी का मिळाली? असा सरड्याचा जन्म का मिळाला? काय असेल ते सांग." सर्व लोकांना कळण्याकरता म्हणून गोपालकृष्णांनी विचारलं. तो म्हणाला, "आपली आज्ञा आहे म्हणून सांगतो. नृग नावाचा मी राजा आहे. आजपर्यंत अनेक दानशूर जे लोक होऊन गेले त्यांच्यामध्ये माझंही नांव कदाचित तुमच्या कानावर आलं असेल. माझ्या हातून काय काय दान झालेलं आहे, वास्तविक सांगू नये पण तुमची आज्ञा म्हणून सांगतो. भूमीवर जितके वाळूचे कण असतील, आकाशात जितक्या तारका असतील किंवा पर्जन्याच्या जितक्या धारा पडत असतील तितक्या गायींचं दान माझ्याकडून झालेलं आहे. पण त्यासुद्धा अगदी म्हाताऱ्या झालेल्या अशा नाहीयेत. तर पयस्विनी, उत्तम दूध देणाऱ्या, अशा चांगल्यापैकी गायींचं दान. पुन्हा एकच दान नाही. पुष्कळ निरनिराळे रथ दिले आहेत, घर दिलेली आहेत, त्याचप्रमाणे भूमीदान झालेलं आहे, सुवर्णदान. अशी अनेक दान झाली. पुष्कळ यज्ञकर्म मी केली. आणि एक प्रसंग आलेला आहे संकटाचा.

एका ब्राह्मणाला एक गाय मी दिली. ती गाय संध्याकाळच्या वेळेस माझ्या गायींमध्ये पुन्हा केव्हा आली? मला काही माहीत नाही. दुसरे दिवशी तीच गाय दुसऱ्या एका ब्राह्मणाला मी दिली. तो ब्राह्मण ती गाय घेऊन जात असताना आदल्या दिवशीच्या ब्राह्मणाची आणि त्याची रस्त्यात गाठ पडली. तो पहिला ब्राह्मण म्हणाला, "ही गाय माझी आहे." हा दुसरा म्हणाला, "मी आत्ता राजवाड्यातून ही गाय आणली आहे." तो पहिला ब्राह्मण म्हणाला, "असशील. काल मला राजाने हीच गाय दिली होती." मग ते दोघे माझ्याजवळ आले आणि म्हणाले, "काय राजेसाहेब?, तुम्हाला कोणी सांगितलं हे असलं दान करायला? सकाळी गाय दान द्यायची संध्याकाळी तीच गाय चोरून परत आणायची आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तीच गाय परत दान करायची. असा दानधर्म कशाला करता?" स्पष्ट बोलले. मी त्यांना प्रार्थना केली, "बाबांनो, या एका गायीबद्दल एक लक्ष गाई द्यायला मी तयार आहे. पण हे माझ्यावरचं धर्मसंकट काढून टाका. एक लक्ष गाई कोणीतरी घ्या आणि एक ही गाय घेऊन चला तुम्ही." परंतु नाही हीच गाय माझी आहे असा आग्रह काही संपला नाही त्यांचा. माझं दुर्दैव म्हणायचं की तो वाद तसाच अनिर्णित राहीला. शेवटी मला यम लोकात नेलं. यमराजांनी मला विचारलं, "तुला प्रथम पुण्याचं फळ भोगायचंय की पापाचं? पुण्य पुष्कळ आहे. पाप मात्र थोडं आहे. तुला कोणचं भोगायचंय?" मी सांगितलं, "थोडं पाप आहे तर तेवढं अगोदर भोगून घेतो. लगेच मला हा सरड्याचा जन्म आला. आणि मी इथं येऊन पडलो. आपल्या हस्तस्पर्शाने माझा उद्धार झालेला आहे. मी आता स्वर्गलोकाला जातो." अशी गोपालकृष्णांची प्रार्थना करून त्यांना नमस्कार करून तो स्वर्गलोकाला गेलेला आहे.

सगळी मंडळी द्वारकेतली तिथं जमली होती. मुलं तर होतीच. गोपालकृष्णांना त्या सगळ्यांना मार्गदर्शन करायचंय. ते म्हणाले, "या नृग राजाने चोरी काही केलेली नाही. पण दुसऱ्याला दिलेली वस्तू अज्ञानाने का होईना आणली आणि दुसऱ्याला दिली. हा सुद्धा अपराध आहे. कर्माचं ज्ञान बरोबर होणं, कर्माचा निर्णय होणं, हे अतिशय कठीण आहे. मोठमोठ्यांनासुद्धा करता येत नाही. द्रौपदीचे वस्त्र हरण करणे योग्य आहे की अयोग्य याचा निर्णय भीष्म, द्रोण सुद्धा करू शकले नाहीत. (बिचारी कृष्णभक्त होती. भगवान गोपालकृष्णांनीच तिची लज्जा राखली म्हणून त्या संकटातून ती सुटलेली आहे.) तर असे अज्ञानाने किंवा ज्ञानबुद्धिपूर्वक झालेले दोष जास्त आहेत. पण अज्ञानाने झालेला दोष, दुसऱ्याच द्रव्य हरण करणं किंवा आपण घेणं याचंसुद्धा फल भोगावं लागतं. तेव्हा कोणाही तपस्वी पुरुषाचा अपमान करू नका. मी कसं वागतो पहा. सगळ्या एकंदर तपस्वी पुरुषांच्याबद्दल आदर ठेवून रहा." असं त्या वेळेपासून ते सांगत आले पण शेवटी त्यांचं तेच झालं. तोच अपराध त्यांच्या मुलांकडून झाला. सगळ्या यादवकुळाला विप्रशाप झालेला आहे. तर अशीरीतीने कर्मगती कशी असते? कर्मफल कसं असतं? हे दाखीवण्याकरता म्हणून कृष्णचरित्रामध्ये हा उल्लेख आलेला आहे.

बलरामजींच्या एक दोन कथा त्यांनी सांगितल्यात. मुख्य कथा अशी आहे की दुर्योधनाची कन्या लक्ष्मणा, तिचं स्वयंवर होतं. स्वयंवराला अनेक राजेलोक वगैरे आले होते. जांबवतीचा मुलगा सांब हा तिथं आला होता. सर्व राजे लोकांचा पराभव करून ती कन्या बरोबर घेऊन तो निघाला

त्यावेळेला. मग सगळे कौरव रागावले. मग सगळ्यांनी मिळून सांबाच्या बरोबर युद्ध केलं. कोणी त्याचे घोडे मारले. कोणी त्याचा सारथी मारला. कोणी त्याचं धनुष्य तोडलं. आणि त्याला धरलं. बांधून आणून तुरुंगात ठेवलं. ही बातमी द्वारकेत समजली. सगळे रागावले. उग्रसेन राजा रागावला. सैन्य घेऊन चला, कौरवांचा पराजय करून आपल्या मुलाला घेऊन येऊ, म्हणाला.

पण बलरामजी एकदम असं करीत नव्हते. संकर्षण असं त्यांचं एक नांव ठेवलं होतं गर्गाचार्यांनी. संकर्षण म्हणजे आकर्षण. सर्व यादवांची एकी टिकवण्यासाठी त्यांचे नेहमी प्रयत्न चालू असत. म्हणून त्यांनी उग्रसेनाला सांगितलं, "मी स्वतः जातो आणि साममार्गाने मिटवण्याचा प्रयत्न करतो. आपल्या मुलाला घेऊन येतो. बलरामजी निघाले. बरोबर उद्धवजी होते. इतर काही यादव मंडळी बरोबर होती. हस्तिनापूरच्या बाहेर येऊन त्यांनी मुक्काम केला. उद्धवजींना पाठीवलं कौरवांच्याकडे. बलरामजी आलेत असं सांगा म्हणाले.

उद्धवजींचा निरोप गेल्यावर सगळे कौरव स्वागतासाठी आले. उद्धवजींचा व त्यांचा सत्कार केला. बलरामजी कौरवांना म्हणाले, "उग्रसेन राजाने तुम्हाला संदेश पाठवला आहे. तुम्ही सगळ्यांनी मिळून आमच्या एका मुलाला पकडून बांधून ठेवलेलं आहे. परंतू तुम्ही आम्ही मित्र असल्यामुळे मी हा दोष मानवत नाही. तर आमचा मुलगा आमच्या ताब्यात द्या." हे ऐकल्याबरोबर ते उद्धट कौरव बलरामजींनाच बोलायला लागले. "कोण कुठला यादवांचा राजा? यादवांना राज्य करण्याचा अधिकार कुठे आहे अगोदर? आमची उपेक्षा करून आमची सगळी राजचिन्हे धारण करतात आणि वर आम्हाला आज्ञा करतात. पायातली वहाण डोक्यावर चढवायची इच्छा करायला लागली काय?" बलरामजींच्या तोंडावरच असं बोलायला लागले. आणि मग रागाने निघून निघून गेले.

मग मात्र बलरामजींना राग आवरलेला नाही. ते म्हणाले, "पशुजवळ जाऊन त्यांचं सांत्वन करणं चुकीचं आहे. यांना आता शासन करायचं. कृष्ण रागावला होता, उग्रसेन रागावला होता. त्या सगळ्यांचं समाधान करून मी आलो. आज आता एकही कौरव जिवंत ठेवायचा नाही." उठले बलरामजी. तो त्यांचा नांगर आणि मुसळ. नांगर त्यांनी जमिनीत मारला. आणि ते सबंध नगर उलथ–पालथं करायचं ठरवलं. कुठली लढाई करत बसता म्हणाले. एकदमच सगळ्यांचा नाश. सबंध वाडे पडायला लागले. सगळे घाबरले. सगळे कौरव त्या सांबाला आणि दुर्योधनाच्या कन्येला घेऊन आले. पाया पडले. बलरामजी तुम्ही अनंत आहात. शेषावतार आहात. वगैरे शब्दांत स्तुती करून चुकीची कबुली दिली. पण त्यासाठी हे चौदावे रत्न दाखवावे लागले.

नंतर बाणासुराची एक कथा सांगितली आहे. बाणासुर असुरांचा राजा. घोर तपश्चर्या करून त्याने शंकरांना प्रसन्न करून घेतलं. शंकरांनी त्याला वर दिला. हजार हात निर्माण झाले त्याच्या शरीराला. त्यामुळे त्याला जास्तीच गर्व झाला. आणि माझ्याबरोबर युद्ध करणारा कोण आहे? याची चौकशी तो करायला लागला. त्याच्याबरोबर कोण युद्ध? मोठा पराक्रमी तो असल्यामुळे कोणी युद्ध करायला धजावत नसे. शंकरांच्या दर्शनाला तो रोज जात असे. एकदा त्याने शंकरांनाच विचारले, "देवा, तुम्ही मला हजार हात कशाकरता दिलेत? भार झालाय मला. माझ्याबरोबर युद्ध करण्याची कोणाचीही तयारी नाही. सगळे घाबरतात. तेव्हा तुम्ही तेवढे फक्त माझ्याबरोबर युद्ध करू शकाल." म्हणजे आपल्या उपास्य देवतेलाच त्याने युद्धाला आव्हान केलं आहे ; अहंकाराच्या योगाने. रागावले शंकर. "फार उन्मत्त झालायस." म्हणाले. "लवकरच तुला एक वीर भेटेल आणि तुझा गर्व दूर करील." बाणासुर म्हणाला, "बरं झालं. कोणी वीर भेटेल, याचीच वाट पाहतोय मी." गेला घरी निघून.

त्याला उषा नावाची एक कन्या होती. आणि बाणासुराच्या मंत्र्याची मुलगी चित्रलेखा त्या उषेची मैत्रीण होती. चित्रलेखा चित्रकलेत उत्तम, निष्णात होती. आणि उत्तम योगिनी होती. योगाभ्यासही तिचा झाला होता. चित्रकलेतसुद्धा एकाग्रता पाहिजे चित्ताची. म्हणजे योगबल पाहिजे. योगसिद्धी असली म्हणजे चित्ताची एकाग्रता होते. ज्याचं चित्र काढायचं त्याचं रूप मनामध्ये आणून त्या एकाग्र मनाने चित्र काढायचं. म्हैसूरच्या राजवाड्यात राजा रविवर्म्याने काढलेली काही अप्रतिम चित्रं आहेत. सीतादेवीचं चित्र. अप्रतिम चित्र आहेत. सीतादेवीचं चित्र आहे. दमयंतीचे चित्र आहे. त्या स्त्रियांची

चित्र पाहिल्याबरोबर त्या निश्चित पतिव्रता आहेत म्हणून खाली मान घालावी लागते. सौंदर्य आहे पण सौंदर्यामुळे विकार उत्पन्न होत नाहीत. उलट नम्रता उत्पन्न होते. ही इतकी व्यवस्थित उत्कृष्ट चित्र काढणाऱ्याच्या मनाची किती एकाग्रता असली पाहिजे. त्याशिवाय तो चित्र काढू शकणार नाही. तेव्हा ही चित्रलेखा चित्रकलेत निष्णात होती आणि तिने योगाभ्यासही केलेला होता. राजाच्या दरबारात पुष्कळ ऋषिमंडळी असायची. राजवाड्यामध्ये यायची. जिज्ञासू बुद्धी असल्यानंतर ऋषिमंडळींना विचारलं की ते मार्गदर्शन करतात. योगमार्गाचंच काय कोणत्याही मार्गाचे ते दर्शन करू शकतात. तर अनेक ऋषिमंडळींच्या सान्निध्यात राहून या चित्रलेखाने योगाभ्यास केला होता आणि ती त्यात प्रवीणही झाली होती. चित्रलेखा त्या उषेची मैत्रीण होती.

एक दिवस उषेला अस्वस्थ होऊन रडताना पाहून, चित्रलेखाने विचारले, "काय झालं तुला? रडतीस का?" उषा म्हणाली, "आत्ता एका दिव्य पुरुषाचं मला दर्शन झालं. आणि एकाएकी तो अदृश्य झाला. "चित्रलेखा म्हणाली, "थांब, मी सगळ्यांची चित्रं काढते. त्यातला तुला कोण भेटला पाहू" म्हणून देव, गंधर्व, असुर, नाग, मानव यांची मुख्य मुख्य चित्रं काढून ती दाखवतेय. वसुदेवाचं चित्र झालं, कृष्णाचं चित्र झालं, प्रद्युम्नाचे चित्र काढून दाखवलं. अनिरुद्धाचं चित्र काढून दाखवलं. त्या बरोबर ती म्हणाली, "यांचच मला दर्शन झालं." चित्रलेखा म्हणाली, "लागला पत्ता. कृष्णाचा हा नातू आहे. एवढं सांगून ती स्वस्थ बसली नाही. मी आत्ता त्याला घेऊन येते म्हणाली." मध्यरात्रीच्या वेळेला आकाशमार्गाने ती द्वारकेत येऊन पोहोचलेली आहे. आणि अंतःपुरात जाऊन अनिरुद्धाला पलंगासह योगसामर्थ्याने इकडे घेऊन आली. उषेच्या अंतःपुरात तो येऊन राहिलेला आहे. बराच काळ गेलेला आहे. कुणाला काही कल्पना नाही.

बाहेर जे पहारेकरी होते त्यांना काही संशय उत्पन्न झाला. आणि त्यांनी बाणासुराला जाऊन सांगितलं, "राजेसाहेब!, आपल्या कन्येच्या अंतःपुरात कोणीतरी पुरुष मनुष्य असावा असा आम्हाला संशय आलेला आहे. आम्ही प्रत्यक्ष काही तिथं जाऊ शकत नाही. आपण एकदा समक्ष जाऊन चौकशी करावी." वाईट वाटलं बाणासुराला. एकदम आणखी तो आला अंतःपुरामध्ये. सोंगट्यांचा खेळ चाललेला आहे. अनिरुद्ध म्हणजे प्रत्यक्ष मदनाचाच मुलगा तो. अत्यंत सुंदर आहे. ही उषा आहे, तिच्या मैत्रिणी आहेत, सगळ्या बसलेल्या. एकदम आपल्या सैनिकांना या अनिरुद्धाला बांधून तुरुंगात ठेवायची त्याने आज्ञा केली. अनिरुद्धही पराक्रमी होता. तोही उठलेला आहे. पुष्कळ सैन्य मारलं त्याने, पण बाणासुरापुढे त्याचं काय चालणार? बाणासुराने त्याला नागपाशाने बांधून तुरुंगात ठेवून दिलं. ती बिचारी उषा दुःखी झाली.

जवळ जवळ तीन चार महिन्यांनी ही बातमी यादवांना समजली. कुठं गेला अनिरुद्ध काही पत्ता लागलेला नव्हता. नारदांनी जाऊन सांगितलं. बाणासुराच्या तुरुंगामध्ये तुमचा मुलगा आहे. निघाले सगळे सैन्य घेऊन. कृष्ण आहेत, बलराम आहेत, प्रद्युम्न आहे. सगळे मोठमोठे पराक्रमी वीर. बारा औक्षहणी सैन्य घेऊन आले म्हणे, बाणासुराच्या नगराजवळ. बाणासुरानेही युद्धाची तयारी केलेली आहे. आणि बाणासुराला सहाय्य करण्याकरता म्हणून भगवान शंकरही आले तिथं. सगळं गजसैन्य आलेलं आहे. पुष्कळ वेळ युद्ध झालेलं आहे. नंतर शंकर आणि श्रीकृष्ण यांचं युद्ध सुरू झालं. ते पाहण्याकरता सगळे देव तिथल्या आकाशमंडलात आहे. जगत्कार्य करणाऱ्या दोन विलक्षण शक्ती आहेत. भिन्न भिन्न रूपाने राहणाऱ्या. व्यक्त झालेल्या दोन शक्तींचं परस्पर युद्ध आहे. त्या वेळेस शंकरांनी भिन्न भिन्न अस्त्रांचा प्रयोग करावा. कृष्णांनीही त्याच्यावरती विरोधी अस्त्रांचा प्रयोग करावा. असं काही वेळ अस्त्र युद्ध झालेलं आहे. नंतर कृष्णांनी जंभणास्त्राचा प्रयोग केला. शंकरांना त्या वेळेला झोप आल्यासारखं वाटलं. हातातलं शस्त्र खाली पडलं आणि ते त्या वेळेला रणांगणातून निघून गेले. या नंतर बाणासुराचं आणि कृष्णांचं युद्ध झालेलं आहे. बाणासुराला हजार हात असल्यामुळे एका वेळेला पाचशे धनुष्यातून तो बाण सोडायचा. मग श्रीकृष्णांनी सुदर्शन चक्राने त्याचे हात तोडायला सुरुवात केली. आता हा बाणासुर जिवंत राहत नाही; हे पाहिल्यावर भगवान महादेव परत तिथे आले. गोपालकृष्णांना त्यांनी प्रार्थना केली, "देवा!, हा माझा भक्त आहे. याला तुम्ही मारू नका." तोपर्यंत श्रीकृष्णांनी जवळ जवळ सगळे हात बाणासुराचे तोडले होते. चार हात फक्त शिल्लक राहिले होते. गोपालकृष्णांनी सांगितलं, "महादेवा!, मलासुद्धा याला काही मारायचं नाही. मी प्रल्हादाला वर दिलाय ना की तुझ्या वंशातल्या कोणालाही मी मारणार नाही. [illegible]

आहे. बळीराजाचा मुलगा. तेव्हा, याला मीही मारणार नाही. अतिशय उन्मत्त झाला होता. तुम्हालासुद्धा युद्धाला आव्हान दिलं. फार उर्मट झाला होता. त्याचा गर्व दूर करण्याकरता म्हणून हे हात तोडून टाकले. हे चार हात राहू देत."

मग बाणासुर जाऊन आपली कन्या आणि अनिरुद्ध यांना घेऊन आला. त्यांना यादवांच्या स्वाधीन केलं. म्हणजे हा बाणासुर शंकर होते म्हणून वाचला. तसेच तो प्रल्हादाच्या कुळामध्ये जन्माला आला होता, हे ही कारण आहे जीवदान मिळण्याचं. शिवाय शंकरांची इच्छा आहे. भगवंतांच्याबरोबर युद्धाला आलेले कोणीही असुर जिवंत राहिले नाहीत. सगळ्या असुरीशक्तींचा नाश शेवटपर्यंत झाला आहे. विष्णुशक्ती संरक्षणशक्ती आहे ना! तिचा प्रभाव काय आहे! शंकरांची संहारशक्ती आहे. पण तिलासुद्धा कालाची अनुकूलता पाहिजे. अशा बऱ्याच लीला झाल्या आहेत. अजून जरासंधाचा नाश व्हायचा आहे ना! तो करायचाय भगवंतांना. मुद्दाम त्याच्यावर हल्ला करून त्याच्या राजधानीमध्ये जाऊन तसं काही मारलं नाही त्याला भगवंतांनी. तोच सतरा अठरा वेळा आला. त्याचं सैन्य मारलं. त्याला सोडून दिलं. पुन्हा सैन्य घेऊन यावं, पुन्हा सैन्य मारता यावं, याकरता त्याला सोडून दिलं. तो अजिंक्य म्हणून सर्वत्र प्रसिद्ध होता.

या नंतर गोपालकृष्णांची एकंदर दिनचर्या कशी होती? याचे एका अध्यायात वर्णन केले आहे. नारदांनी गोपालकृष्णांची कशी परीक्षा केली याबद्दलही एक स्वतंत्र अध्याय आहे. सकाळपासून नारदमुनी आले. रुक्मिणीच्या वाड्यात गेले. तिथं नारद काय कोणी परिचित असला म्हणून काय झालं? त्याचा उपमर्द कधी करायचा नाही. श्रीकृष्णांनी त्यांचं स्वागत केलं, "या!, या! नारदा. केव्हा आलात? काय आलात?" विचारलं. पूजा केली. सगळं आतिथ्य केलं. आणखी नारदमुनी बाहेर पडले. दुसऱ्या वाड्यामध्ये गेले. त्या ठिकाणी सोंगट्यांचा खेळ चाललेला आहे. तिथंही श्रीकृष्ण आहेत, सत्यभामा आहे, उद्धवजी आहेत. तिथंही श्रीकृष्णांनी त्यांचं स्वागत केलं. विचारपूस केली. पूजा केली. नारदांना वाटलं गोपालकृष्ण काय भुयारातून इथं येऊन पोहोचले की काय? अर्थात गोपालकृष्ण काय निराळे आहेत की काय? ज्ञानदेव निराळे, नामदेव निराळे संशोधन चाललंय आमचं. ते सगळे एक आहेत हे ओळखण्याची शक्ती नाही आमच्या बुद्धीमध्ये. आमच्या बुद्धीची शक्ती अशा रीतीने दाखवतो आम्ही. तर इथे नारदांनासुद्धा भ्रांती झालेली आहे. तिथून तिसऱ्या वाड्यात गेले. तर तिथंही श्रीकृष्ण आहेत. ब्राह्मण मंडळी जेवायला बसलेली आहेत. "या!", म्हणाले, "नारदा!, जेवायला बसा." नारद म्हणाले, "नको! माझं जेवण झालंय. मला काम आहे मी जातो."

तिथून दुसरीकडे गेले. असे अनेक वाड्यांत नारदमुनी गेले. काही ठिकाणी श्रीकृष्णांचा मंत्र्यांबरोबर विचार विनिमय चाललाय. एका ठिकाणी श्रीकृष्णांची शस्त्रांची परीक्षा चाललीये. सगळी शस्त्र चांगली आहेत की नाही? कोणती शस्त्र निकामी झाली आहेत? कुठे अश्वांची परीक्षा चाललीये; तर कुठे हत्तींची. कुठे सैन्याची व्यवस्था पहाताहेत; तर कुठे संधी कोणाबरोबर करायची? युद्ध कोणाबरोबर करायचं? असा सगळा विचार चाललाय. प्रत्येक वाड्यात जिथे जातील नारद, तिथं त्यांना हे दिसतंय. आणि प्रत्येक ठिकाणी श्रीकृष्णांनीसुद्धा नारदांची पूजा करूनच सोडलं, तसं सोडलं नाही. मुली आलेल्या आहेत, कुठून सासरहून. माहेरून जायला निघालेल्या आहेत. 'त्यांची व्यवस्था काय? फराळाचे डबे दिले की नाही? लुगडं दिलं की नाही? अमुक दिलं की नाही?' ही सगळी चौकशी करायची श्रीकृष्णांनी. सगळी व्यवस्था करून त्यांना सासरी पाठवायची व्यवस्था करायची. नाती वगैरे लग्नाला आलेल्या आहेत (उपवर झाल्यात). नारदांना म्हणावं श्रीकृष्णांनी, "या आमच्या नातीला तुमच्या माहितीत एखादा वर असेल चांगला तर सांगा." नारद म्हणत, "आत्ता मला सवड नाही. पुन्हा आलो म्हणजे सांगीन." सगळ्या वाड्यात जाऊन बघायचं होतं ना! अशी कामं चाललेली त्यांना दिसली. प्रत्येक ठिकाणी गोपालकृष्ण आहेत. सोळा हजार स्त्रिया. तिथं कसा प्रपंच चाललेला असेल? काय चाललेलं असेल? काही कल्पना नाहीये नारदांना. प्रत्येक स्त्रिला दहा मुलं आणि एक मुलगी. साम्यवाद म्हणजे बरोबर साम्यवाद. केवढी समृद्धी आहे. ब्रह्मचर्याचं सामर्थ्य आहे. इतकं असूनसुद्धा ब्रह्मचर्य बल आहे. पराक्रम आहे. धैर्य आहे.

याप्रमाणे प्रत्येक वाड्यात नारद जाऊन आले. योगीच होते तो त्यांना काही श्रम झाले नाहीत. 'बाबा!, दमलो आता मी. पुरे.' असं नाही. सगळीकडे चौकशी केली. चिकित्सा करायची तर ती

श्रद्धा ठेवून चिकित्सा झाली पाहिजे. भगवान गोपालकृष्णांची मायाशक्ती कशी आहे? हे एकदा पाहायचं म्हणाले. श्रद्धा पूर्ण आहे. गोपालकृष्ण साक्षात ईश्वर आहेत. हे माहिती आहे. त्यांच्याकडे सामर्थ्य नाही हे सिद्ध करायचं नाहीये. आणि सर्व ठिकाणी फिरून आल्यानंतर त्यांनी कबूल केलेलं आहे. श्रीकृष्णांना म्हणाले, "देवा!, किती विलक्षण शक्ती आहे आपली! प्रत्येक ठिकाणी मला आपले दर्शन झाले." भगवान म्हणाले, "धर्माचं शिक्षण द्यायचं म्हणजे प्रत्यक्ष त्याप्रमाणे वागायला नको का?" सर्वांना आणखी धर्माचं मार्गदर्शन करण्यासाठी मी आलेलो आहे. हे झालं त्यांचं प्रत्येक वाड्यातलं अस्तित्व.

त्यानंतर त्यांची दिनचर्या कशी आहे ते पहा. कर्मयोग म्हणजे सामान्य नाहीये. शास्त्रीय कर्म त्यातल्या त्यात अत्यंत कठीण आहे. कोंबडा आरवल्या बरोबर त्यांनी जागं व्हावं ब्राह्ममुहूर्तावरती. आणखी आत्मचिंतन करावं, प्रथमतः आत्मस्वरूप काय आहे? सर्व विश्वाला अधिष्ठानभूत जे आत्मस्वरूप ते कोणचं आहे? ते मी आहे. जग वगैरे काहीही नाही. ह्या समाधी अवस्थेचा अनुभव प्रत्येक दिवशी भगवान गोपालकृष्ण घेत होते. आत्मचिंतन झाल्यानंतर पुढची सगळी कर्म सुरू. अग्निहोत्र घेतलं होतं त्यांनी. कृष्णांचं अग्निहोत्र निराळं, वसुदेवांचं निराळं, त्यांच्या मुलांचं निराळं. आता अग्निहोत्र म्हणजे काय याची कल्पनाच नाहीये कुणाला. वैश्वदेव म्हणजे काय याचीही कल्पना नाहीये. वैश्वदेवाचं कुंड म्हणजे काय याचीही कल्पना नाहीये. कोषामध्ये पाहिलं तर त्याचा अर्थ सापडणार आहे. तर अशा रीतीने हा सगळा ऱ्हासाचा काळ आहे. तर याप्रमाणे अग्निहोत्र, होम वगैरे सर्व आन्हिक झाल्यावर राजसभेत जायला त्यांनी निघावं. रथ तयारच असायचा. जाताना अत्यंत ज्यांची जरुरीची काम असल्यामुळे भेट घ्यायला आलेला जे लोक आहेत त्यांच्या भेटीगाठी घेऊन तत्काल त्याचा निर्णय करून टाकायचा. आणि नंतर ब्राह्मणांना काही दानधर्म करून, मातापितरांना नमस्कार करून रथामध्ये बसून ते जात होते.

असेच एकदा राजसभेमध्ये येऊन बसलेले आहेत. तिथे पुष्कळ विदूषक मंडळी आहेत. नृत्य–गायन चाललेलं आहे. मोठी सभा ती. एवढ्यात त्या राजसभेमध्ये एक दूत आलेला आहे. भगवान गोपालकृष्णांना भेटायचंय, म्हणाला. आला तो. कृष्णांनी विचारलं, "काय काम आहे तुझं?" तो म्हणाला, "जरासंधाने सर्व पृथ्वीवरती दिग्विजय यात्रेला जाऊन राजेलोकांना धरून आणलंय. २०,८०० राजेलोक आहेत. एका मोठ्या किल्ल्यामध्ये त्यांना बंदिस्त केलेलं आहे. खायला मिळालं; मिळालं. नाही; नाही. असे अगदी बिचारे दुःखी झालेले आहेत. त्यांनी आपल्याला प्रार्थना केलेली आहे की "आमची मुक्तता या जरासंधाच्या बंदिखान्यातून करा." ही विनंती करण्याकरता मी आलेलो आहे." एवढ्यात नारद महर्षि त्या सभेत आकाशमार्गाने येऊन पोहोचले. उठून उभे राहिले गोपालकृष्ण. स्वागत केले. पूजा केली त्यांची. पायावर डोके ठेवले त्यांच्या. आणखी "सध्या पांडवांची परिस्थिती काय आहे?" हा प्रश्न त्यांना केला.

नारद म्हणाले, "त्यांच्याकडूनच मी आलेलो आहे. धृतराष्ट्राने कौरव–पांडवांची भाऊबंदकी सुरू झालेली पाहून सांगितले की तुम्ही इंद्रप्रस्थ नगरामध्ये जाऊन रहा. नगर कसलं काहीतरी खडकाळ भूमी होती म्हणतात ती. हस्तिनापुरामध्ये मात्र आपण आपल्या मुलांबरोबर राहतो आहे. (पुढे मात्र श्रीकृष्णांच्या कृपेने त्या इंद्रप्रस्थ नगराची सुंदर राजधानी तयार झाली.) धर्मराजाकडूनच मी तुम्हाला विनंती करण्याकरता आलो आहे की धर्मराजाला राजसूय यज्ञ करायची इच्छा आहे. हा सर्वात मोठा यज्ञ आहे. ब्रह्मलोकात जाण्याच्या कामनेनं हा यज्ञ शास्त्रात सांगितला आहे. त्याची सगळी अंगं, प्रधान वगैरे सगळी सामुग्री तयार करायची. त्यात अन्नदान मोठं आहे. तेव्हा धर्मराजाची अशी प्रार्थना आहे की गोपालकृष्णा, आपल्या नेतृत्त्वाखाली हा राजसूय यज्ञ माझ्याकडून पार पाडून घ्या. हे तुम्हाला सांगण्याकरता मी आलेलो आहे."

म्हणजे दोन कामे आली आहेत. धर्मराजाची इच्छा राजसूय यज्ञ करण्याकरता तुम्ही लवकर या आणि जरासंधाच्या बंदिखान्यात पडलेले राजेलोक प्रार्थना करताहेत, "आम्हाला या संकटातून मुक्त करा. कोणचं काम प्रथम करायचं?" मग ते उद्धवजी होतेच मंत्री. त्यांना थोडासा मान दिला. काय उद्धवजी या वेळेला आम्ही कोणचं काम प्रथम करावं? तुम्ही सांगा. मोठे नीतीशास्त्रज्ञ तुम्ही आहात. त्या वेळी उद्धवजींनी सांगितलेलं आहे, "राजसूय यज्ञालाही तुमचं सहाय्य पाहिजे. जरासंधाच्या

बंदिखान्यातल्या राजेलोकांनाही तुम्ही मुक्त केलं पाहिजे. पण प्रथम आपण राजसूय यज्ञाची तयारी करण्याकरता म्हणून इंद्रप्रस्थाला चला. आणि ज्या राजाने पूर्ण पृथ्वी जिंकली आहे तोच राजसूय यज्ञ करू शकतो. तेव्हा राजसूय यज्ञाच्या निमित्ताने सगळ्या पृथ्वीला अगोदर जिंकावं लागेल. त्यात तो जरासंध येईल. त्यालाही जिंकावं लागेल, म्हणजे त्याचाही बंदोबस्त होईल. मग आपण राजसूय यज्ञ करा. श्रीकृष्णांनी ते मान्य केलं.

प्रथम बायकामुलांना श्रीकृष्णांनी निरनिराळ्या वाहनातून इंद्रप्रस्थाला पाठवून दिलं. मग बलरामजींना घेऊन स्वतः गोपालकृष्ण इंद्रप्रस्थ नगराला येऊन पोहोचलेले आहेत. धर्मराजाला मोठा आनंद झाला. नंतर त्याच्या इच्छेप्रमाणे आपले चारी बंधू चारी दिशांना पाठवून दिले. सर्व राजेलोकांना जिंकायचं आणि धनही पाहिजे. कितीही मिळालं तरी धन हवेच. चारही बंधूंनी सर्व दिशांना जाऊन सर्व राजेलोकांना जिंकून आणखी पुष्कळ धन आणून दिलं. पण सांगितलं की एकटा जरासंध मात्र अजिंक्य आहे. आम्ही त्याला जिंकू शकलो नाही. उद्धवजींनी त्याकरता योजना सांगितली की भीम, अर्जुन आणि तुम्ही – गोपालकृष्ण, ब्राह्मणाच्या वेषात जरासंधाच्या वाड्यामध्ये चला. तो ब्राह्मणांबद्दल आदर बाळगणारा आहे. बाहेरून तो कसा का असेना, पण ब्राह्मणांना वाटेल ते दान द्यायची त्याची तयारी आहे. त्याचा फायदा तुम्ही घ्या. त्याचा तुम्ही नाश करण्याकरता त्याच्या बरोबर द्वंद्वयुद्ध करायची भिक्षा मागा आणि भीमाचं आणि त्याचं युद्ध करून त्याचा नाश करा. म्हणजे तुमचे सगळे विरोधी संपले.

त्याप्रमाणे तिघांनी ब्राह्मणाचा वेष घेतला. आणि मगध देशाच्या राजधानीमध्ये माध्यान्हकाळी ते येऊन पोहोचलेले आहेत. जरासंधाने येऊन त्यांचे स्वागत केलं. तो पाहतो आहे, "वेष तर ब्राह्मणाचा आहे. भस्म लावलंय, रुद्राक्षाच्या माळा आहेत सगळं आहे. पण ह्यांच्या अंगावर ज्या जखमांच्या खुणा आहेत त्या ब्राह्मणांच्या अंगावर कशा असतील? ज्या अर्थी यांच्या अंगावर जखमांच्या खुणा आहेत त्या अर्थी हे ब्राह्मण नसले पाहिजेत. परंतु म्हणायचं कसं? तुम्ही ब्राह्मण नाही काय म्हणून विचारायचं का? असो!" म्हणाला. "काही हरकत नाही. काय तुमची इच्छा आहे?" त्याने विचारले. "माझं मस्तक जरी तुम्ही मागितलंत तरी मी तोडून द्यायला तयार आहे. काय तुमची इच्छा आहे ती सांगा." म्हणाला. मग गोपालकृष्णांनी आपला परिचय करून दिला. "हा भीमसेन आहे; कुंतीचा मुलगा. त्याचा धाकटा भाऊ हा अर्जुन आणि ह्यांचा मामेभाऊ मी गोपालकृष्ण. तू ज्याला शत्रू समजतोस तो कृष्ण मीच आहे." त्याच्या राजधानीमध्ये जाऊन त्याला त्यांनी स्वतःचा परिचय करून दिला. बरोबर दोघेच आहेत फक्त. बाकी कोणी नाही. जरासंध हसला. "बरंय!", म्हणाला. "पण कृष्णा, तुझ्यासारख्या पळपुट्या, भित्र्या माणसाबरोबर मला युद्ध करायचं नाही." श्रीकृष्ण म्हणाले, "बरं राहू दे. अर्जुन चालेल का? जरासंध म्हणाला, "नाही!, हा किती लहान आहे. हा काय माझ्या बरोबर युद्ध करणार? हा भीमसेन बरोबर आहे. श्रीकृष्ण म्हणाले, "ठीक आहे. करा युद्ध." तेच ठरलं होतं अगोदर. जरासंधाने भीमाला एक गदा दिली, आपण एक गदा घेतली. दोघेही गांवाबाहेरच्या मोकळ्या मैदानात आले. आणि गदायुद्धाला सुरुवात झाली. दोघेही गदायुद्धात निष्णात. भीमाचं सामर्थ्य मात्र जास्त होतं. सकाळपासून संध्याकाळपर्यंत लढाई व्हायची. सात्त्विक धैर्यामुळे तहान भुकेकडे लक्ष नाही. संध्याकाळी युद्ध थांबल्यानंतर जरासंधाने भीमाच्या स्नानाची, मालीश करायची, व्यवस्था करावी. पंच पक्वान्न वाढावं, सगळ्यांनी एकत्र बसून भोजन करावं. पूर्वी असं होतं म्हणतात. आमच्या आज्जी वगैरे सांगत. कर्नाटकात गावाहून शहरातल्या कोर्टात जाताना दोन्ही पक्षाचे लोक एकत्र गाड्यातून जात. कोर्टात गेल्यानंतर मात्र वादी–प्रतिवादी बाजूला जायचे. कोर्टात हा वादी आणि तो प्रतिवादी. पुन्हा आपल्या गावाला येताना दोघांनीही एकाच गाडीत बसून यायचे. तसं इथं भीम–जरासंधाचं चाललं होतं.

सव्वीस, सत्तावीस दिवस झालेले आहेत. भीम दमलेला आहे. त्याने रात्री कृष्णांना सांगितलं की, "मी काही जरासंधाला आता जिंकू शकत नाही. माझी शक्ती कमी झाली." मग आपलं तेज त्याला दिलं गोपालकृष्णांनी आणि सांगितलं, "उद्या तुझ्या हातून त्याचा नाश होतोय. काही काळजी करू नकोस." तो कसा काय करायचं ते त्यांनी सांगितलं. दुसरे दिवशी युद्धाच्या वेळेला भीमाने त्याला खाली पाडलं. त्याच्या एका पायावर आपला एक पाय दाबला आणि दुसरा पाय हातात घेऊन जसं वस्त्र फाडतात तसं त्याच्या शरीराचे दोन तुकडे केले. आणि दोन्ही बाजूंना टाकून दिले. तो

जरासंध जेव्हा जन्मला तेव्हा त्याच्या आईच्या उदरातून दोन तुकडे बाहेर पडले म्हणे. "हा असला कसला मुलगा, म्हणाली. जिवंत नाही काही नाही." ते दोन तुकडे तिनं फेकून दिले वाड्याबाहेर. तिथं त्या वेळेला 'जरा' नावाची एक यक्षिणी आली होती तिने ते दोन तुकडे सांधले आणि एका ठिकाणी जोडले. तो जरासंध जिवंत झाला. जरेने सांधलेला, जोडलेला म्हणून त्याचं नांव जरासंध पडलं होतं. त्याचप्रमाणे त्याचे बरोबर दोन तुकडे करून त्याचा नाश झालेला आहे. कृष्ण, अर्जुनाने भीमाची प्रशंसा केली आहे. जरासंधाचा मुलगा सहदेव म्हणून होता. त्याच्याकडून श्रीकृष्णांनी त्या सगळ्या राजेलोकांची अगोदर मुक्तता केली. सगळे राजे लोक त्या किल्ल्यातून बाहेर पडलेत. अन्न नाही, पाणी नाही, त्यामुळे अगदी कृश शरीर झालेली. भगवान गोपालकृष्णांची त्यांनी स्तुती केली. सगळ्यांचं भोजन झालं. सहदेवाकडून त्या सर्वांचा सत्कार केला. त्यांना परत जायला उत्तम रथ वगैरे दिलेत. सगळे राजेलोक आपापल्या देशात परत गेले. आपल्या प्रजाजनांजवळ गोपालकृष्णांचं औदार्य, सहाय्यक शक्ती काय आहे? याची सगळी वर्णने केली. ही सगळी योजना पांडवांना युद्धाच्या वेळेला कोणीतरी मदतीला पाहिजेत म्हणून अगोदरच श्रीकृष्णांनी करून ठेवली होती; असं म्हणायला हरकत नाही. वनामध्ये पांडव एकाकी गेले आणि राजसत्ता सगळी दुर्योधनाच्या ताब्यात. दुर्योधन तर त्यांना युद्धाशिवाय राज्य परत द्यायला तयार नव्हता. तेरा वर्षानंतर पांडव परत येणार होते त्या वेळेला त्यांना कसलं सैन्य मिळणार. पैसा कुठे आहे. पण ही सगळी योजना करून मित्र राजेलोक जोडलेले आहेत. शिवाय गोपालकृष्ण वगैरे सगळे यादव त्यांच्या बाजूने आहेतच. ही सगळी योजना अगोदर होऊन गेली होती.

जरासंधाचा नाश झालेला पाहून सगळ्यांना आनंद झाला. मग मोठा राजसूय यज्ञ झाला. उत्तम ज्ञानी ऋषिमुनी पौरोहित्य आणि यज्ञकर्माचं मार्गदर्शन करण्यासाठी तिथे उपस्थित होती. सुवर्णाच्या नांगराने ती यज्ञभूमी आधी नांगरली. सगळी कुंड, देवतांचे कट्टे, वेदी, वगैरे तयार झाल्या. सर्व देवदेवता, गंधर्व, सगळे मित्र राजेलोक वगैरे त्या ठिकाणी आलेले आहेत. श्रीकृष्णांनी प्रत्येक कामावर स्वतंत्र व्यक्तीची योजना केली. सबंध पाकगृह भीमाच्या ताब्यात दिलेलं आहे. म्हणजे 'भीम स्वयंपाक करत होता.' असा त्याचा अर्थ नाही. पण हजारो आचारी, स्वयंपाकी इ. वर त्याने लक्ष ठेवायचे. कमी जास्त काही होऊ द्यायचं नाही. उत्तम स्वयंपाक झाला पाहिजे. अन्नदान उत्तम झालं पाहिजे. नंतर खजीनदार त्या दुर्योधनाला केलं होतं. काही सामुद्रिक दृष्टीने त्याची योजना केली होती. पैसा तो मुद्दाम खर्च करायचा. या पांडवांना पैसा कमी पडावा आणि त्यांचा यज्ञ काही पार पडू नये अशीच त्याची बुद्धी होती. तर कृष्णांनी मुद्दाम त्याच कामावर नेमलं. जितका तो पैसा खर्च करायचा त्याच्या दुप्पट पैसा पुन्हा यायचा. शेवटपर्यंत दुर्योधनाला काही समजलं नाही असं का होतंय ते. मोठमोठे श्रेष्ठ पुरुष आले असतील त्यांच्या सेवेची व्यवस्था अर्जुनावर सोपीवली होती. वाढण्याच्या कामावर द्रौपदी देखरेख करत होती. ती काही स्वतः वाढत होती असं नाही. कोणाला काय पाहिजे आणि कोणाला काय नकोय हे पाहिल्याबरोबर ओळखता आलं पाहिजे. तिनं "वाढू का?" म्हणायचं आणि त्याने "नको." म्हणायचं, त्याला पाहिजे असायचं दुसरंच, असं होऊ नये. हा अतृप्त आहे आणि तो तृप्त आहे हे ओळखण्याचं सामर्थ्य द्रौपदीकडे होतं. म्हणजे स्त्रियांनासुद्धा त्या यज्ञाच्या व्यवस्थापनामध्ये घेतलं होतं फक्त पुरुषांचं मंडळ तयार केलं होतं असं नाही.

दान करण्याच्या कामावर कर्णाची नेमणूक केली होती. धर्मराज यज्ञकर्माचा यजमान असला तरी त्याला श्रीकृष्णांनी सांगितलं होतं की "दान करायचं काम तुझ्या हातून होणार नाही. ते कर्णानेच करावं." कर्ण मोठा उदार होता – 'महामनाः'. अशी अनेक लोकांची नियुक्ती त्यांचे त्यांचे गुण पाहून केली होती. त्यामुळे तो यज्ञ उत्तमरीत्या पार पडलेला आहे. दान, मान यांनी सगळी मंडळी तृप्त होऊन आपापल्या स्थानाला निघून गेली. दुर्योधनाचा थोडा अपमान त्या मयसभेमध्ये झाला. सगळे पांडव हसले म्हणे. त्यामुळे तो संताप – रागाने हस्तिनापुराला निघून गेला. त्या वेळेपासून त्याने पांडवांचं ऐश्वर्य हरण करण्याचा निश्चय केला आणि त्याने ते द्यूतात कपट करून घेतलं. ती कथा महाभारतामध्ये आली आहे. याप्रमाणे श्रीकृष्णांच्या कृपेने धर्मराजाची इच्छा पूर्ण झाली.

आपल्या भक्तांबद्दल भगवंतांची दृष्टी कशी होती? ईश्वराची ओळख कशी झाली पाहिजे? हे भगवत् गीतेच्या पाचव्या अध्यायात भगवंतांनी सांगितलं आहे. –

भोक्तारं यज्ञ तपसां सर्व लोक महेश्वरम् ।
सुहृदं सर्व भूतानां ज्ञात्वा मां शांति मृच्छाति ।।

मी कसा आहे? तर सर्व कर्मांचा मी भोक्ता आहे. सर्व एकंदर कर्मांचं फल मला अर्पण केलं म्हणजे त्याचं खरं फल मिळतं. ईश्वर हा सर्वांचा नियामक आहे असं ईश्वराचं ज्ञान झालं पाहिजे. आणि सर्वांचा तो नियामक असूनसुद्धा सर्वांचा तो सुहृद आहे. सुहृद याचा अर्थ आचार्य महाराजांनी सांगितला, "प्रत्युपकार निरपेक्षतया उपकारिणाम्।" आपल्यावर कोणी उपकार केला तर त्याच्यावर उपकार असं ईश्वराचं नाहीये. कोणाच्या उपकाराची अपेक्षा न करता उपकार करणारा. वात्सल्यपूर्ण ज्याची वृत्ती आहे असा परमात्मा आहे. संपूर्ण भक्तिशास्त्र ज्याच्यामुळे प्रवृत्त झालंय असा ईश्वर आहे. हे ज्याला कळलं त्याला पूर्ण शांती प्राप्त होती. तो मुक्त होतो. तर आता भगवान गोपालकृष्णांच्या मनांत भक्ताबद्दल वात्सल्यभाव किती होता! हे सांगणारं आता एकच चरित्र सांगायचंय.

सुदामजींची गोष्ट प्रसिद्ध आहे. अगदी त्यागमय, त्यागपूर्ण आख्यान आहे. रामकृष्णांच्याबरोबर सांदिपनी गुरुमहाराजांच्या आश्रमामध्ये राहून सुदामजींनी अभ्यास केलेला आहे. रामकृष्णांचे ते सहाध्यायी आणि मित्र आहेत. म्हणजे किती बुद्धिमत्ता असली पाहिजे! एकंदर सर्व वेदशास्त्रांचं ज्ञान आहे आणि त्या ज्ञानाचं फल म्हणजे त्यागबुद्धी आहे. काही इच्छा नाही. अयाचित वृत्ती आहे. काही मिळालं तर मिळालं. कोणी आणून दिलं तर त्याच्यावर निर्वाह चाललेला आहे. सुदामजी समाधानी आहेत. पण त्या गृहिणीचं समाधान कसं व्हावं? घरातली सगळी व्यवस्था तिला पाहायची आहे. कुणी अतिथी आला गेला तर तेही पाहायचंय. अगदी खिन्न असायची ती. एकदा तिनं सुदामजींना विनंती केली, द्वारकेमध्ये तुमचे मित्र गोपालकृष्ण राहतात. मोठे उदार आहेत. तुम्ही गेल्यावर तुमची परिस्थिती पाहून पुष्कळ द्रव्य देतील. त्यांना एकदा भेटायला जा. आपलंही जीवन सुखी होईल.

रायगन भक्त आहे तो. पण ही रायगन भक्ती चांगली आहे. दुसऱ्या कोणाकडे जाऊन हात पसरण्यापेक्षा. 'दाता एक रघुनंदन' या उक्तीप्रमाणे रघुनंदनाला मागितलं तर ते योग्य आहे, शोभण्यासारखे आहे. दुसऱ्याकडे नाही मागायचं. त्यानंतर त्या स्त्रिने बऱ्याच वेळा विनंती केल्यावर सुदामजींनी श्रीकृष्णांकडे जायचे ठरविले. परंतु निघायच्या वेळेस, त्यांची वृत्ती कशी होती? हे सांगतायत शुकाचार्य. सुदामजींच्या मनांत विचार आलेला आहे:
अयमही परमोलाभः उत्तमश्लोकदर्शनम्।

"स्त्रिच्या निमित्ताने आज आपल्याला द्वारकेला जायला मिळतंय. हे माझं केवढं भाग्य उदयाला आलंय की त्या उत्तमश्लोक प्रभूंचं मला दर्शन होण्याचा योग आलेला आहे. हा माझा सर्वांत मोठा लाभ आहे." मला पैसा मिळेल हा विचारसुद्धा मनामध्ये नाहीये. 'काही तरी न्यायला पाहिजे. रिक्त हस्ताने कसा जाऊ?' म्हणाले. घरातून काही चार मुठी पोहे आणले. एका फडक्यात बांधून दिलेले आहेत. आणि ते घेऊन सुदामजी निघालेले आहेत.

द्वारकेत नऊ लाख वाडे होते म्हणतात. श्रीकृष्णांचेच वाडे सोळा हजार. पुन्हा नोकर–चाकरांचे वाडे, मुलांचे वाडे, नातवांचे वाडे, वेगळे वेगळे. श्रीकृष्णांची आज्ञा होती द्वारपालांना, 'कोणीही एखादा तपस्वी पुरुष, संन्यासी आला तर त्याला प्रतिबंध करायचा नाही. बाकीच्यांची चौकशी करा.' सुदामजी विरक्त पुरुष आहेत, कृश शरीर आहे, तपस्वी आहेत. त्यांना आत जायला परवानगी मिळाली. आत गेले. दरवाजात उभे राहिले. गोपालकृष्ण आत बसले होते. त्यांची दृष्टी सुदामजींवर पडताच ते एकदम उठून धावत धावत आले. "अरे!, आपला मित्र आलाय म्हणाले. किती दिवसांनी."

ओळख त्यांना पटली. "या, या सुदामजी, किती दिवसांनी तुम्ही भेटलात!" आणलं त्यांना आत. सिंहासनावर बसवून त्यांची देवाप्रमाणे पूजा केली. धूप दीप नैवेद्य सगळं आणखी अर्पण केलं. प्रेमाने जेवण झालेलं आहे. गोष्टी बोलत बसलेले आहेत. आणखी गुरुभक्ती आपल्या हातून झालीये सुदामजी. गुरुंची कृपा झाल्यामुळे आपलं जीवन सुखी झालंय. "गुरुहो अनुग्रहेणैव पुराणपूर्ण प्रशांतये।" हा सिद्धान्त गोपालकृष्णांनी सांगितला. आणि विचारलं, "आमच्या वहिनींनी आमच्या करता काही दिलंय की नाही, काही फराळ–बिराळ?" यांना बिचाऱ्यांना लाज वाटली. एवढं ऐश्वर्य तिथे आणि हे वाळलेले पोहे द्यायचे? निदान चिवडा–बिवडा तरी बरोबर आणला असता तर देता आला असता. नुसते पोहे कसे द्यायचे? श्रीकृष्णांनी विचार केला, "हा ब्राह्मण निरिच्छ आहे. पतिव्रता पत्नीची इच्छा आहे, धन मिळावं. तिच्या आग्रहामुळे हा आलेला आहे. याला काही स्वतःला संपत्ती नकोय." 'याला संपत्ती द्यायची.' असा संकल्प होऊन गेला. आणि तिकडे सुदामनगरी निर्माण झाली. काय आहे? हे पाहण्याकरता श्रीकृष्णांनी स्वतःच सुदामजींजवळचं गाठोडं काढून घेतलं. सुदामजींनी दिलं नाही हां पण यांनी आपण होऊनच घेतलं. "काय आहे, बघू या तरी." म्हणाले. आणि ते पाहिल्या बरोबर आणखी, "अहो, हा माझा आवडता पदार्थ तुम्ही आणलात आणि आतापर्यंत असाच का ठेवलात? ह्याच्या अगोदर का दाखीवला नाही?" एक मूठभर पोहे तसेच तोंडात टाकले आहेत. दुसऱ्यांदा मुठीत पोहे घेताच रुक्मिणीमाता म्हणते, "एक मूठ तुम्ही तोंडात टाकताच तिकडे दुसरी द्वारकानगरी निर्माण झाली. आता दुसरी मूठ घेतल्या नंतर आम्ही तिकडे कामाला जाव अशी इच्छा आहे काय? झाडलोट करायला, काय इच्छा आहे तुमची? आम्हानाही राहू दे प्रसाद."

मग अशा रीतीने सुदामजी रात्रभर श्रीकृष्णांच्या जवळ राहिले. दुसरे दिवशी सकाळी जायला निघाले. कृष्णांनीही काही दिल नाही आणि यांनीही काही मागितल नाही. "न तु याचितवान् स्वयम्" भक्ताचा अहंकारही असावा तर असा. तो आमच्या जवळ नाही. हे द्या. ते द्या असच सांगत बसायच. भगवंतांच आपल्याला दर्शन झालं हाच विचार निघताना सुदामजींच्या मनांत होता. हा मोठा लाभ आहे. या विचारातच ते बाहेर पडले. जाताना कृष्णांनी काही दिल नाही म्हणून काही वाटल नाही त्यांना. सुदामजींनी विचार केला श्रीकृष्णांना कदाचित वाटल असेल कि हा जन्म दरिद्री ब्राह्मण. याला जर द्रव्य मिळाल तर हा उन्मत्त होईल. सुदामजी मला विसरीन जाईल. म्हणून देवाने मला धन दिल नाही. देवाच्या मनामध्ये त्याच स्मरण मला नेहमी रहाव अशी इच्छा आहे आणि माझीही तीच इच्छा आहे. मला नको आहे द्रव्य. देवाला जर धन मिळालेला असताना हा आपल्याला विसरेल अस वाटत असेल तर ते धन मला काय करायचय? ईश्वराच विस्मरण करणार धन मला नको. असेच विचार करीत ते बाहेर आलेले आहेत. बायको काय म्हणेल? बायको काय करील? निंदा करील. कशाला गेलात? हात हालवत परत आलात अस म्हणेल वगैरे काही नाही.

घरी आल्यावर ते सगळ ऐश्वर्य त्यांनी पाहिल. बायको वाटच पहात होती. तिन त्यांच स्वागत केलेल आहे. आणि ते ऐश्वर्य पाहिल्याबरोबर त्या यदुनाथाची ही कृपा आहे हे ते समजले. दुसरा नाथ नाही जगामध्ये. काय म्हणाले, एक मूठ वाळलेले पोहे आपण घेऊन गेलो आणि त्याच्या बदल्यात हे ऐश्वर्याच दान त्यांनी दिलेल आहे. केवढे औदार्य. वात्सल्य आहे. सुहृदम् सर्व भूतानाम् भगवान सांगतायत. ज्याला ही माझी ओळख पटली कि मी सर्वांचा सुहृद आहे त्याला शांति मिळती. त्या वेळेपासून पत्नि, पुत्र, आप्तेष्टांच्या इच्छेकपरता परेच्छा प्रारब्ध म्हणून खाणपिण, सगळ्या विषयांचा भोग घेत होते. परंतु अंतःकरणात मात्र हे सर्व त्या यदुनाथाच आहे माझ नाहीये. मी अकिंचन आहे. मला धर्म नाही, अर्थ नाही, मला काम नाही, माझ्याजवळ काही नाहीये. सगळ परमेश्वराच स्वामित्व आहे ही बुद्धि आहे. अंतःकरणातून त्यागाचा अभ्यास चाललेला आहे. भगवंतांच अखंड स्मरण करतायत. अशा रीतीने त्यांच्यावर कृपा झालीये.

अशा अनंत लीला भगवान् गोपालकृष्णांच्या चरित्रात झालेल्याल्या आहेत. पैकी काही लीलांचा संग्रह वेदव्यास महर्षिंनी या दशम स्कंधामध्ये केला आहे. प्रत्येक चरित्र विचार करण्यासारख आहे. कृष्णाने माती खाल्ली. का माती खाल्ली? खाल्ली कि नाही? प्रत्येक चरित्रावर विस्ताराने विचार करणारे मोठ मोठे भक्त आहेत. कृष्णचरित्र हा भारताचा दायभाग आहे. रामायण हा भारताचा दायभाग आहे. तो आमचा दायभाग संस्कृतमध्ये असल्याने आम्ही त्याच्यापासून दूर गेलो आहोत. पूर्वी स्त्रियासुद्धा

संस्कृत बोलत होत्या. पुरुष तप बोलत होतेच. एकदा जेवायला बसले असता एक पंडित म्हणाले, 'दधीमानय' दधी हा शब्द काही इकारान्त नाहीये. दधीम् आनय असा त्याचा अर्थ झाला. पण त्यांच्या स्त्रीने विचारल "किम् तरिही" म्हणजे दधीम् मा आनय असा त्याचा अर्थ तिने घेतला. दही आणू नकोस मग काय पाहिजे असा अर्थ करुन तिन त्याची सुधारणा करुन घेतली. आपल्या पतिची चूक दाखवली नाही.

तर रामायणापासून, भागवतापासून संस्कृतचे ज्ञान नसल्याने आपण दूर गेलो तरी संत माहात्म्यांनी आमच्या वरती किती तरी कृपा करुन ठेवलेली आहे. संपूर्ण कृष्णचरित्र कृष्णदयार्णवांनी ओवीबद्ध केलेले आहे. ५५००० ओव्या त्यांनी रचलेल्या आहेत. श्रीकृष्णांनी उद्धवर्जीना केलेल्या उपदेशावरती नाथ महाराजांनी भागवत लिहिलेल आहे. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली आहे. त्या चरित्रांच (ग्रंथांच) चिंतन करुन आपल्या मनाच संशोधन होईल. त्या करता आपली तयारी झाली पाहिजे. ती तयारी कशी व्हावी तो बुद्धिविकास कसा व्हावा हे दाखवण्यासाठी शेवटच पसायदान ज्ञानेश्वर महाराजांनी लिहून ठेवल आहे.

तीन दिवस पर्यंत या ठिकाणी यथामती कृष्णचरित्राच चिंतन झालेल आहे. भारतामध्ये जन्म झाल्याने आपल्या चित्तावर भक्तिचे संस्कार आहेतच अस ज्ञानेश्वर महाराजांच मत आहे. तो भक्ति संस्कार व्यक्त होण, त्याच संवर्धन होण या करता प्रयत्न करा. ईश्वराचा भक्त कोणी नाही अस नाहीये. तर या ईश्वराच्या चरित्राच निरंतर चिंतन आपल्याकडून व्हाव हीच त्या परमात्म्याच्या चरणी प्रार्थना.

श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारे ।
हे नाथ नारायण वासुदेव ।
प्रद्युम्न दामोदर विश्वनाथ ।
मुकुंद विष्णो भगवन्नमस्ते ।।

।। अवधूत चिंतन श्रीगुरुदेवदत्त ।।